१८१२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
स. न. २८८

# मानसगीतसरोवर.

## भाग १ ला.

कृष्णाबाई गाडगीळ.

REFBK-0001692

सन १९११ कि० ८ आणे.

REFBK-0001692

# मानसगीतसरोवर.

## स्त्रियांकरितां गाणीं.

संपादक व प्रकाशक
**कृष्णाबाई गाडगीळ,**
१४१ शनवार पेठ, पुणें सिटी.

**मुद्रक**—केशव रावजी गोंधळेकर,
जगद्धितेच्छु प्रेस, ४३२ शनवार पेठ, पुणें.

चतुर्थावृत्ति

सोल एजंट—लक्ष्मण नारायण गोडबोले,
डी. एस. कंपनी बुधवार चौक, पुणें सिटी.

( सर्व हक्क कर्त्यांनें स्वाधीन ठेविले आहेत. )

१६०२

# समर्पण पत्रिका.

जिच्या उदरीं जन्म झाल्यानें व लहानपणीं
दिलेल्या शिक्षणानें वेळोवेळीं वेडेवाकडे
भगवद्गुण गाण्याची इच्छा झाली
त्या माझ्या परमपूज्य मातोश्री

—अंबूमाई—

यांचे चरणीं हें ‘ मानसगीतसरोवर ’
अर्पण करितें.

तिची कन्या.

# प्रस्तावना.

ईशस्तुति ही करितां करितां थकलों सहस्र वदन ह्मणे ।
बघतां होती ज्याला इंद्र ह्मणे तो सहस्र नयन उणे ॥ १ ॥
झाला सेवक नमुनी सहस्रकर तो जया गुणा न गणें ।
तेथें पाड तुझा किति कैसे गाशिल अनंत गुण रसने ॥ २ ॥

प्रिय भगिनी हो !

भगवन्नामाची महती आजपर्यंत अनेक जणानीं अनेक प्रकारें वर्णन केली आहे. निरनिराळ्या कवींनीं त्याच्या लीला, स्वरूप, अवतारकृत्यें व प्रत्येक अवतारांतील अनेकविध प्रसंग यांचीं केलेलीं वर्णनें अत्यंत कर्णमधुर आहेत यात शंका नाही. भगवंताच्या गुणलीलावर कवींप्रमाणेंच अनेक कवयित्रींनींही कविता—गाणीं—केलीं आहेत त्यापैकींच माझाही प्रयत्न आहे.

लहानपणीं मला गाणी ऐकण्याचा अतिशय नाद असे व तीं ऐकून तशा प्रसंगावर र, ट, फ, चार अक्षरें एकत्र करण्याचा नाद लागून तो वयाप्रमाणें थोडथोडा वाढत चालला. मीं अशी बरींच गाणीं केलीं. तीं गाणीं मी आपल्या कित्येक जिवलग मैत्रिणींना व प्रेमळ वडील माणसाना म्हणून दाखवीत असें व त्यांनाही माझी ही कृति पसंत पडत असे. अशा रीतीनें कांहीं गाणीं तयार झाल्यावर तीं छापून प्रसिद्ध करण्याविषयीं मला माझ्या पुष्कळ मैत्रिणींनीं आग्रह केला. यामुळें अनेक अडचणी असूनहि ही माझी प्रथम कृति माझ्या भगिनी-वर्गापुढें मांडण्याचें मी धाडस करीत आहें, तरी या माझ्या प्रथम कृतींत ज्या कोणा चतुर भगि-

नींस दोषस्थलें अढळतील तीं दोषस्थलें त्यांनीं मला निर्भीडपणानें कळविल्यास मी त्याची अत्यंत ऋणी होईन व या त्यांच्या प्रेमळ सूचनेचा फायदा मला दुसऱ्या ठिकाणीं नाहीं का घेतां घेतां येणार?

ग्रंथकर्त्री.

# अनुक्रमणिका.


| अनुक्रमांक. | गाणें. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | श्रीगणपतीची मंगलारती. | १ |
| १–२ | भूपाळी [ गणपतीची ]. | २ |
| ३–६ | गणपतीचीं गाणीं. | ३–५ |
| ७ | सरस्वतीचें गाणें. | ५–६ |
| ८–२० | दत्ताचीं गाणीं. | ६–१५ |
| २१–२६ | विठोबाचीं गाणीं. | १५–१८ |
| २७ | शबरीचें गाणे. | १८–१९ |
| २८–२९ | चंद्रसेनेचीं गाणीं. | १९–२१ |
| ३०–३१ | अहिल्येचीं गाणीं. | २१–२४ |
| ३२ | गुहकाचें गाणें. | २४–२५ |
| ३३ | वाल्मीकीचें गाणे | २५–२७ |
| ३४ | कौसल्येचे डोहाळे. | २७–२८ |
| ३५ | रामाचा पाळणा. | २८–२९ |
| ३६–३७ | मुद्रिकेचीं गाणीं. | २९–३१ |
| ३८ | लक्ष्मणशक्ति. | ३१–३२ |
| ३९ | मथरा. | ३२–३३ |
| ४०–५२ | रामाचीं गाणीं. | ३३–३९ |
| ५३ | कृष्णाचें स्तवन. | ३९ |
| ५४ | संध्येचें ध्यान. | ४० |
| ५५ | मंगलागौरीचें गाणें. | ४१ |
| ५६ | देवीची आरती. | ४१–४२ |
| ५७ | महालक्ष्मीचें गाणे. | ४२–४३ |
| ५८–५९ | देवीचं गाणें | ४३–४५ |
| ६० | हरितालिकेची आरती. | ४५–४६ |
| ६१ | हरितालिकेचें गाणे. | ४६–४७ |

| | | |
|---|---|---|
| ६२ | चिलिया बाळाचें गाणें. | ४७–४९ |
| ६३–६४ | भिल्लिणींचीं गाणीं. | ४९–५२ |
| ६५–६६ | शंकराचीं गाणीं. | ५२–५३ |
| ६७ | कृष्णजन्माचें गाणें. | ५४–५६ |
| ६८ | यशोदेचा राधास्तव. | ५६ |
| ६९–७० | गाऱ्हाणीं. | ५६–५७ |
| ७१–७२ | श्रीकृष्ण प्रबोध. | ५८–५९ |
| ७३–७५ | कृष्णाची मुरली. | ५९–६१ |
| ७६ | राधा–विनोद. | ६१ |
| ७७–७८ | अक्रूराचीं गाणीं. | ६२–६३ |
| ७९ | मथुरा गमन | ६३ |
| ८० | उद्धव. | ६३–६४ |
| ८१ | कुब्जेचें गाणें. | ६४–६५ |
| ८२ | धावा रुक्मिणीचा. | ६५–६६ |
| ८३–८४ | पारिजातक | ६६–६७ |
| ८५ | सुभद्राहरण | ६७–६८ |
| ८६–८९ | द्रौपदीचे धावे. | ६८–७१ |
| ९० | प्रल्हाद. | ७१–७२ |
| ९१ | मुरलीधराचें गाणें. | ७२–७३ |
| ९२ | श्रीविष्णूचें गाणें. | ७३–७५ |
| ९३ | गुरूची भेट. | ७५–७६ |
| ९४ | गुरूचा धावा. | ७६–७७ |
| ९५ | वैद्य. | ७७ |
| ९६ | आरती गुरूची. | ७८ |
| ९७–१११ | बोधविषयक गाणीं. | ७८–८८ |
| ११२ | आरती अश्वत्थाची. | ८८ |
| ११३ | पचायतनाच्या प्रदक्षिणाचे अभग. | ८९–९४ |

१८५२

॥ श्रीगजानन ॥

# मानसगीतसरोवर.

## गाणें १ लें-श्रीगणपतीची मंगलारती.

[ चाल—वैशाख मास० ]

श्री विघ्नहरा करुनि त्वरा भेट सुरवरा ॥ ओवाळितें पचारति भुवनसुंदरा ॥ ध्रु० ॥ प्रार्थिलें मिं प्रारंभीं, शिवसुता तुला ॥ तव अगणित गुण गावयास बुद्धि दे मला ॥ या समयीं ब्रह्मकुमरि तशा अष्ट सिद्धिला ॥ या संगें घेउन तुम्ही साह्य मज करा ॥ श्री० ॥ ॥ १ ॥ मम देहाताटिं पंचप्राणदीप ठेविले ॥ आयुष्यवात ज्ञानघृतासहित उजळिले ॥ त्यजुनि पंच विषय त्रिगुण षड्रिपू भले ॥ अज्ञाना जाळुनियां उजळिं कर्पुरा ॥ श्री० ॥ २ ॥ सद्भक्तिखाद्य नैवेद्यहि तुजसि अर्पितें ॥ त्रयोदश गुणितचि ताबुल तो प्रेमें ठेवितें ॥ अहंभाव सोडुनिया शीर लववितें ॥ शोभियलें सकल भुवन सुख नसे जरा ॥ श्री० ॥ ३ ॥ या संसारीं धरिली बहू अविट ती आशा ॥ तुजविण निस्तरिल कोण स्वजन दुर्दशा ॥ म्हणुनि आस

धरिलि कास श्रीगणाधिशा ॥ नमि कृष्णाबाइ तुला, अभय दे वरा ॥ श्री० ॥ ४ ॥

---

## गाणें २ रें—भूपाळी.

उठिं उठिं बा विनायका ॥ सिद्धिबुद्धीच्या नायका ॥ माता आपुली जगदंबिका ॥ तात त्रिभुवनगोसावी ॥ ध्रु० ॥ रत्नखचित सिंहासनीं ॥ येउनि बैसे चिंतामणी ॥ करीं चामरें घेउनी ॥ अष्टांगना ढाळिती ॥ १ ॥ चौदा विद्यांच्या आगरा ॥ मायबाप मोरेश्वरा ॥ चौदा रत्नाच्या सागरा ॥ खजिनदार चौदाचा ॥ २ ॥ स्नानसंध्या सारुनि आले ॥ द्वारीं भक्त बहु तिष्ठले ॥ ताटें भरुनि आणिले ॥ मोदक लाडू तुजलागीं ॥ ३ ॥ होइं जागृत चिंतामणी॥ सुकवी कृष्णेची काचणी ॥ पुरे प्रपच जाचणी ॥ धावें म्हणीं वरदात्या ॥ ४ ॥

---

## गाणें ३ रें—भूपाळी.

हिमनगजामातनंदना ॥ सत्वर उठा गजानना ॥ उदय झाला विधिजारमणा ॥ भानुबिंब प्रकाशलें ॥ध्रु०॥ मूषक तिष्ठलासे द्वारीं॥ शिष्यमेळा हाका मारी ॥ अध्ययनाची वेळ झाली ॥ शिकवा चौदाचौसष्टी ॥ १ ॥ पिवळा पीतांबर साजिरा ॥ विशाळ भाळ स्थूलोदरा ॥ मुकुट मस्तकीं शिरपेंचतुरा ॥ झळकति कर्णीं कुंडलें ॥२॥ पाशांकुश घेउनि करीं ॥ मोदकावर प्रीती बरी ॥ विलसे विधिजा मांडीवरी ॥ स्कंधीं तिच्या वामभुजा ॥ ३ ॥ अंगीं शेंदुर चर्चिला॥ चंदन उटी गणपतिला ॥ खाद्य नैवेद्य आणिला ॥ दूधसाखर केशरी ॥ ४ ॥ पूजापात्र घेउन हातीं ॥ शमी दुर्वांकुर शोभती ॥

पंचामृत आणि आरती ॥ घेउन तिष्ठति दास तुझे ॥ ५ ॥ होईं जागृत मोरेश्वरा ॥ उठीं पार्वतिकुमरा ॥ बुडे कृष्णा भवसागरा ॥ पैल तिरा नेईं त्वरें ॥ ६ ॥

---

## गाणें ४ थें.

[ चाल—विघ्न योजिलें पाडव आणिले सभेसि जावोनी० ]

गौरिनंदना विघ्ननाशना, नमितें चरणाला ॥ नेइं माहेराला नेइं० ॥ ध्रु० ॥ आनंद पिता शांती माता, याची मी बाला ॥ भाव बंधू भक्ती भगिनी ऐशी ही अबला ॥ मम इतिहासा ऐकें आता सांगतसें तुजला ॥ चाल ॥ तारीं दुहितेला, तारीं कन्येला॥ गौरिनंदना, विघ्ननाशना नमितें चरणाला ॥ १ ॥ प्रपंच श्वशुर हा व्यर्थ गांजितो काय करूं याला ॥ इकडुनि तिकडे घिरट्या घेतां, जीव बहू दमला ॥ लक्ष चौऱ्याशीं फेरे फिरुनी शिणभागाचे झाला ॥ चाल ॥ रक्षीं दीनाला ॥ रक्षीं दासीला ॥ गौरि० ॥ २ ॥ क्रोधदिरानें अवघा बारे सत्यनाश केला ॥ मन्मथ माझ्या सर्वांगाशीं झोंबू लागला ॥ अंधकार तो अज्ञानाचा हटवादी झाला ॥ ॥ चाल ॥ प्रगटविं तेजाला, दाखविं स्वरुपाला ॥गौ०॥३॥ किती कपटि ही दुष्टवासना नणंद हो झाली ॥ दुर्बुद्धि सासुला कशी ही शिकवूं लागली ॥ मायलेकिंनीं मिळुनी मजला भ्रांतिष्ट केली ॥चाल॥ जीव दमुनि गेला ॥ भ्रांतिष्ट झाला ॥ गौरि० ॥ ४ ॥ सोसेना मज जाचणूक ही शरण तुला आलें ॥ सिंहासनिं तव स्वरुप पाहुनी मन तल्लिन झालें ॥ मुगुट मस्तकीं शूर्पकर्णीं कुंडल धरियेलें ॥ ॥ चाल ॥ दे तू ध्यानाला, हृदयीं पान्ह्याला ॥ गौरि० ॥ ५ ॥ सर्वांगा शेंदूर चर्चिला पीतांबर पिवळा ॥ कटीं कसोनी गळा शोभती

मौक्तिकमणिमाळा ॥ पाशांकुश करिं चंद्रकोरसम चंदन भाळाला ॥
॥ चाल ॥ मुषकावरि बसला, नेपुर पदकमला ॥ गौरि० ॥ ६ ॥
माणिकमणिपरि नयन शोभती वक्रतुंड तुजला ॥ एकदंत लंबोदर
म्हणती दाक्षायणि बाळा ॥ शमि दूर्वांकुर वाहती रक्तकुसुममाला॥
॥ चाल ॥ भक्षि मोदकाला, पी पयामृताला ॥ गौरि० ॥ ७ ॥
अष्टनायकासहित विनायक का मजवरि रुसला ॥ संकट माझें
पाहुनि कैसे स्वस्थ तुह्मी बसला ॥ विघ्नहरा हे भक्त गर्जती
पाळ ब्रिदा आपुल्या ॥ चाल ॥ पाव पाव मजला, धावा
मांडियला ॥ गौरि० ॥ ८ ॥ चपलेसम ती ब्रह्मकुमारी वामांकीं
बैसे ॥ मयुरवाहनी देवि शारदा दक्षिणेस ऐसे ॥ ऋद्धी सिद्धी
चामर धरिती गजवदनासरसें ॥ चाल ॥ पाहुनि स्वरुपाला ॥
लागे पदकमला ॥ गौरि० ॥ ९ ॥ रूप साजिरें ध्यान गोजिरें मन
रमलें पायीं ॥ काया वाचा मनें शरण तुज ही कृष्णाबाई ॥ बुडत
असें मी भवडोहीं बा पैल तिरा नेई ॥ तारीं दुहितेला, तारीं
कन्येला ॥ गौरि० ॥ १० ॥

---

## गाणें ५ वें.

[ चाल --- हें मन चचल मोठें० ]

भावें, पावें, यावें लंबोदरा ॥ गजानन मोरेश्वरा ॥ ध्रु० ॥
वामांकावरी ब्रह्मकुमारी ॥ दक्षिणेसी शारदानारी ॥ ऋद्धी सिद्धी
वसती शेजारीं ॥ मस्तकीं दूर्वांकुर ॥ शोभती० ॥ भावें० ॥ १ ॥
सर्वांगीं शेंदूर चंदनाची उटी ॥ पिवळा पीतांबर सुमनाची दाटी ॥
दक्षिण करिं घेशी मोदकाची वाटी ॥ बैससी मूषकावर ॥ मोरया तू
बैससी मूषकावर ॥ भावें० ॥ २ ॥ हें मन रमलें गजानन पायीं ॥

पदिं लीन झाली ही कृष्णाबाई ॥ गौरिकुमरा मति मज देई ॥ करिं साह्य निरंतर ॥ धावें० ॥ ३ ॥

---

## गाणें ६ वें.

चाल [ सुंदर मुख ]

वक्रतुंड एकदंत श्रीगजानना ॥ लंबोदर गौरिकुमर चुकविं यातना ॥ ध्रु० ॥ चिंताग्नी चित्ति सदा ओंवलो अती ॥ काम-क्रोध षड्रिपु हे व्यर्थ गांजिती ॥ मायेनें वेष्टियलें तोडिं शिघ्र ती ॥चाल॥ भ्यालें, धालें, आलें, शरण तुला, देई मला, सन्मतिला शेषभूषणा॥ वक्र० ॥ १ ॥ त्रिभुवनात थोर तूंचि असासि एकटा ॥ विषम काळ धाडिं दुरी समय वोखटा ॥ वारिं मोहपाश करीं मार्ग चोखटा ॥ ॥चाल॥ येईं, नेईं, पायीं, शिवसूता, अंत अता, बघसि वृथा, कसुनिया दिना ॥ व० ॥२॥ सौख्य आस धरुनि पुढें शरिर कष्टलें ॥ गृह-सुत धन-संग्रहार्थ आयुष्य नष्टलें ॥ परमार्थ-स्वार्थ दोमार्गीं भ्रष्टलें ॥ ॥चाल॥ हारीं, वारीं, तारीं, दिनबंधो, गुणसिंधो, नच बाधो, दुष्ट वासना ॥ व० ॥ ३ ॥ रत्नखचित किरिट मस्तकीं विराजतो ॥ शुंडाही शोभिवंत सिंधुरार्चितो ॥ मुक्ताफळहार कंठिं बहु झळाळतो ॥ चाल ॥ धावें, पावें, यावें, पितवसना, हरिं तृष्णा, नमि कृष्णा, एक प्रार्थना ॥ व० ॥ ४ ॥

---

## गाणें ७ वें.

चाल [ मम लालसकरणी मंजुळवाणी ]

विधिकुमरी किति हि तुझी धन्य कुशलता ॥ जनजिव्हाग्रीं बसुनि अणिसि सगुणता ॥ अणिसि सगुणता ॥ विधि० ॥ ध्रु०॥ रंकाचा राव करिसि ज्ञान लाभता ॥ ज्ञानानें किति तरले नच ये वर्णिता॥

अंत-पार न कळे तुझा सृष्टि शोधिता ॥ सगुण स्वरुप पाहुनि तुझें मनिं ये रम्यता ॥ विधि० ॥ १ ॥ किरिट कुंडल शोभति तुज मयुरवाहनी ॥ नृत्य करिसि कुशलत्वें मधुर गायनीं ॥ भाळलासे शंकरसुत तुजसि पाहुनी ॥ प्रिया म्हणुनि वामाकीं घेइ बसवुनि ॥ विधि० ॥ २ ॥ मूढमती मी बाला तू कृपा करीं ॥ दे सुस्वर कंठ मला ज्ञान झडकरी ॥ विनति असे सन्निध तुज पूर्ण ही करीं॥ नमि कृष्णाबाइ तुला आस करिं पुरी ॥ विधि० ॥ ३ ॥

---

## गाणें ८ वें.

चाल [ नदगृहाच्या जवळ ]

कृष्णगावाची खालिं समाधी ॥ वरि श्री दत्तमूर्ति स्थापिली ॥ ध्रु० ॥ संस्थान हें अकुळणेर गाव ॥ जहागिर भोक्ते कृष्णराव ॥ मोरेश्वर गणपति चिरजिव ॥ चतुर्थाश्रम धरिती, अंतिं ते ॥ कृष्ण० ॥ १ ॥ शक अठराशें नऊ या सालीं ॥ अत्रिसुताची अर्चा झाली ॥ मोरोपंतें ख्याती केली ॥ पसरलिसे कीर्ती, दिगंतरीं ॥ कृष्ण० ॥ २ ॥ मार्गशीर्षपौर्णिमे उत्सव ॥ दत्तजन्म होतसे अपूर्व॥ वाद्यगजर होत अभिनव ॥ कथाकीर्तन करिती, रजनिसी ॥ कृष्ण० ॥ ३ ॥ श्वानरूपी चहुवेदही असती ॥ सवत्स धेनू सन्निध बसती॥ शुभ्रकांतिची पडली दीप्ती ॥ शिरिं गंगा धरिती, चंद्रासह ॥ कृष्ण० ॥ ४ ॥ पायिं पादुका वरति साखळ्या ॥ भगवें वसन वरि कटीं मेखला ॥ रुद्राक्षाच्या शोभति माळा ॥ करिं अयुधें घेती, दंडासह ॥ कृष्ण० ॥ ५ ॥ अत्रिनंदना मागत बरवें ॥ मम मातुलगृहिं दुःख नसावें ॥ मम मानसिं गुरु सतत वसावे ॥ देइ सदा सुमती, यतिवरा ॥ कृष्ण० ॥ ६ ॥ बुडत चाललें ह्या भवडोहीं॥

दीन दयाघन तारू होई ॥ पैलतिरातें सत्वर नेई ॥ करि कृष्णा विनती, प्रभूपदीं ॥ कृष्ण० ॥ ८ ॥

## गाणें ९ वें.

[ चाल—अरसिक किती हा शेला० ]

जय जय श्री गुरुदत्ता ॥ तुजवाचुनि मजला कोणी न त्राता ॥ जय० ॥ ध्रु० काय करू समजेना ॥ भवपुरिंतुनि कशि सुटूं हें उमजेना ॥ हें मन भजन भजेना ॥ माझें म्हणुनी धावतें विषय त्यजीना ॥ नामामृत पाजीं पान्हा ॥ मी चातक तू मेघ अत्रिनंदना ॥ जय० ॥ १ ॥ तोषविलें स्वजनासी ॥ नाहीं शांती क्षमा दया मनासीं ॥ केवळ पातकराशी ॥ धका लाविला माउलीउदरकमळासी ॥ अत्रिसुता तेजोराशी ॥ सोडीं अनुसूयानंदना भवाब्धीसी ॥ जय० ॥ २ ॥ मी वत्स तूं धेनू दत्ता ॥ मी पाडस तू हरिणी भासे मम चित्ता ॥ मी बालक तू माता ॥ नाहीं तुजसम त्रिभुवन शोधुनि पाहता ॥ थकली श्रुति वेद गाता ॥ तेथें काय ही कृष्णा गाईल गाथा ॥ जय० ॥ ३ ॥

## गाणें १० वें.

[ चाल—उत्तम जन्मा येउनि रामा० ]

श्रीपाद श्रीवल्लभ यतिवर माहेरा नेई ॥ त्रिभुवनमान्या नमिते कन्या चरणिं ठाव देई ॥ ध्रु० ॥ क्षणभंगुर तनु मिथ्या माया साच ब्रह्म गमलें ॥ त्रिगुण तंतुनें वेष्टियलें गुरु यास्तव पदिं रमलें ॥ षड्रिपु पंचविषय झोंबती भवपुरिं मी दमलें ॥ अत्रिनंदना वारिं यातना कोणि दुजें नाहीं ॥ श्रीपाद० ॥ १ ॥ करुनि अकर्ता नाहीं तुजला दु:खाची वार्ता ॥ धरुनी दंडा शासन करिसी अडमार्गीं

रिथता ॥ सन्मार्गातें कोणि न लावी तुजवाचुनि दत्ता ॥ नेती ह्मण- नी वेद श्रुती तीं थकलिं शास्त्रें साही ॥ श्री० ॥ २ ॥ त्यजिं निष्ठुरता कोमल हृदयीं प्रेमाबर झाकीं ॥ थोरपणाची होइल हानी अपकीर्ती लोकीं ॥ मी बालक तूं जननी दत्ता घेईं निज अकीं ॥ वेडेवाकडे शब्द बोबडे ऐकुनिया घेईं ॥ श्री० ॥ ३ ॥ निजक- रुणेचा पाझर सोडी मजवरि गुरुराया ॥ भवबंधन हें झडकरिं तोडी श्रमली बहु काया ॥ ज्ञान-ज्योतिचा प्रकाश पाडीं हरवुनि ही माया ॥ अन्य मागणें नसे दयाळा नमि कृष्णाबाई ॥ ४ ॥

---

## गाणें ११ वें.

[ चाल----नृपाल को० ]

कलियुगात मुख्य देव दत्त राहिला ॥ भस्मभुषित सकलतनू योगि पाहिला ॥ तनू योगि पाहिला ॥ध्रु०॥ वाडिक्षेत्र पुण्यवान धन्य ही क्षिती ॥ अवधूत दिगंबरा भक्त गर्जती ॥ तीन त्रिकाळींहि पुजा घेतसे यती ॥ प्रदक्षिणा धूप दीप कर्पुरारती ॥ **चाल** ॥ करीं दया अनूसुयानंदना मला ॥ प्रभो नंदना मला ॥ कलि० ॥ १ ॥ घालुनि आसन औदुंबरीं स्वारि बैसली ॥ पुढें कृष्णाबाइ झुळझुळ चालली ॥ तेहतीस कोटि सूरवर मंडळी ॥ पहावयासि उत्सुकलें मूर्ति सावळी ॥ **चाल** ॥ प्रभो, नमो, दयानिधे वारिं भवजला ॥ अता०॥ कलि० ॥ २ ॥ नित्य फेरि करित हरी स्नान काशिसी ॥ करवीर क्षेत्रिं मागे भिक्षा तापसी ॥ माहुरपुरीं निद्रा करी दत्त रजनिसीं ॥ कोटिचंद्रतेज उणें वाटतें मसी ॥ **चाल** ॥ दिगंबरा, यतीवरा, प्रेमें गाइला ॥ गुरू प्रेमें० ॥ कलि० ॥ ३ ॥ शंख चक्र पद्म दंड हातिं ते घेती ॥ थोर थोर साधुसंत दत्ता वदती ॥ पचवि- षय षड्रिपु हे झोंबती अती ॥ नमिं कृष्णाबाइ गुरू देईं सूमती ॥

॥ चाल ॥ अत्रिसुता. किति आता अंत पाहिला ॥ गुरू, दाविं पद मला ॥ कलि० ॥ ४ ॥

---

## गाणें १२ वें.

[ चाल---कशि जाऊं मि वृंदावना० ]

चल जाऊं या या औदुंबरा ग ॥ नयनिं पाहू त्या विधि हरिहरा ॥ ॥ चल० ॥ ध्रु० ॥ पायिं पादुका नेसुन भगवें दंड कमंडलू धरिं करा करा ॥ १ ॥ चल० ॥ सर्वांगासी चर्चुन विभुती चद्र कपाळिं शोभत गोरा गोरा ॥ २ ॥ चल० ॥ रुद्राक्षाची माळ गळ्यामधें गंगा वहात जटिं झरझरा झरा ॥ चल० ॥ ३ ॥ कृष्णातटिं जो भक्त रक्षि तो अह्मां अनाथा आश्रय बरा बरा ॥ चल० ॥ दत्तदर्शनीं ह्मणते कृष्णा लक्षचौऱ्याशिं चुकवूं फेरा फेरा ॥ चल० ॥ ५ ॥

---

## गाणें १३ वें.

[ चाल---धन्य जाहला० ]

सुदिन उगवला ॥ गुरुराज भेटला ॥ अजि सु० ॥ हरपले काम क्रोध ॥ गेले सर्व विषय विरोध ॥ नच उरला द्वैत भेद ॥ तारिलें मला ॥ ॥ गुरु० ॥ १ ॥ पातलिसे शांति क्षमा ॥ आलि भाव भक्ति अह्मां ॥ दत्तनामिं बहु प्रेमा ॥ वाढुं लागला ॥ गुरु० ॥ २ ॥ वाटे ब्रह्म आलें हाता ॥ चुकलि जननमरणव्यथा ॥ ह्मणे कृष्णा गुरुनाथा ॥ देह वाहिला ॥ गुरु० ॥ ३ ॥

---

## गाणें १४ वें.

[ चाल ---बाई कैसें वेड मशीं ]

बाई कैसे दत्तगुरू पाहिले ॥ कृष्णातिरिं औदुंबरिं राहिले ॥

॥ ध्रु० ॥ दंड-कमंडलू हातीं ॥ अंगीं चर्चुनि विभुती ॥ पायिं पादुका घालुनिया चालिले ॥ बाई० ॥ १ ॥ उदकपात्र हातीं धरुनी ॥ भक्त येती ओलेल्यानी ॥ कोणि प्रभुच्या नामस्मरणीं गुंगले ॥ ॥ बाई० ॥ २ ॥ पंचामृती पूजनासी ॥ भक्त येती माध्यान्हासी ॥ नैवेद्यासि पक्क अन्न आणिलें ॥ बाई० ॥ ३ ॥ फल तांबूल अमूप ॥ प्रदक्षिणा धूप दीप ॥ कोणी लोटांगण घालूं लागले ॥ बाई० ॥४॥ संध्याकाळीं धूपारती ॥ गर्दीं पालखीच्या भोंवतीं ॥ तेहतीस कोटी सुर पाहूं पातले ॥ बाई० ॥ ५ ॥ काशीमध्यें स्नान करी ॥ भिक्षाटन करवीरीं ॥ माहुरपुरिं निद्रेलागीं चालिले ॥ बाई० ॥३॥ काय वर्णूं तेथिल महिमा ॥ नाहीं द्यावयासी उपमा ॥ कृष्णा म्हणे अल्पमती गाइले ॥ बाई० ॥ ७ ॥

---

## गाणें १५ वें.

चाल--पाहुरग ध्याऊ

दत्तराज पाहे, संस्थानिं कुरुंदवाड भूपतिच्या॥ गुरु हा राहे राहे ॥ दत्त० ॥ ध्रु० ॥ झग झग झग झग भगवी छाटी ॥ बघ बघ बघ बघ कटिं लंगोटी ॥ भक्त जनान्ची निशिदिनिं दाटी ॥ हो ती आहे आहे ॥ दत्त० ॥ १ ॥ सर्वांगासी भस्म चर्चिलें ॥ औदुंबरतरुतळवटिं बसले ॥ जटामुगुटिं शशिबिंबा धरिलें ॥ गंगा वाहे वाहे ॥ दत्त० ॥ २ ॥ कंथा झोळी त्रिशूल डमरू ॥ पायिं पादुका जात श्रीगुरू ॥ भिक्षामीषें जगदोद्धारू ॥ करितो आहे आहे ॥ दत्त० ॥ ॥ ३ ॥ ब्रह्मचारि हा त्रिभुवनिं विचरे ॥ योगिजनाचीं शोधि मंदिरें ॥ काल रात्रिं मी ध्यान गोजिरें ॥ स्वप्नीं पाहें पाहें ॥ दत्त० ॥४॥ गाउ तरी मी कैसें तुजला ॥ ऐकुन प्रेमें यतिवर वदला ॥ प्रथम वास म्या कुरणीं केला ॥ ऐसें गावें गावें ॥ दत्त० ॥ ५ ॥ जनन मरण

मम हरण कराया ॥ भवसागर हा झणिं उतराया ॥ चरणिं ठाव दे मज गुरुराया ॥ कृष्णा बाहे बाहे ॥ दत्त० ॥ ६ ॥

---

## गाणें १६ वें.

[ चाल—वैषाख मास० ]

श्री दत्तराज भक्तकाज करित राहिला ॥ औदुंबरतरुतळवाट आजि मिं पाहिला ॥ श्रीदत्त० ॥ ध्रु० ॥ करिं दंड कमंडलु अंगिं भस्म चर्चितो ॥ जटिं वाहे झुळझुळ गंगा भाळिं चंद्र तो ॥ कटिं कौपिनादि व्याघ्राबर पांघरीत तो ॥ स्थिर कृष्णाबाइचा तो वेग चालिला ॥ श्रीदत्त० ॥ १ ॥ शमि तुळसि बेल सुमन तया कोणि वाहती ॥ कुणि धूप दीप नैवेद्य प्रेमें अर्पिती ॥ कुणि नमन करुनि प्रदक्षिणा शीघ्र घालिती ॥ लोटांगण घालुनियां कोणि गाइला ॥ ॥ श्री दत्त० ॥ २ ॥ दत्तध्यान बघुनि चंद्र-सूर्यतेज आटलें ॥ जणु कामधेनु कल्पवृक्ष मजसि भेटले ॥ मम दुःख हरुनि समुळ पंचप्राण दाटले ॥ मायापुर षड्विकार वेग साहिला ॥ श्री दत्त० ॥ ३ ॥ कलियुगांत जननितात हाचि भासतो ॥ जे शरण तया जनन मरण चुकवि खास तो ॥ त्रैमूर्ति करी मम हृदयीं सतत वास तो ॥ म्हणे कृष्णा दत्तपदीं देह वाहिला ॥ श्रीदत्त० ॥ ४ ॥

---

## गाणें १७ वें.

[ चाल—ये धावत माय विठाई० ]

तुज अन्य मि मागत नाही॥ गुरुमाय येवढें देई ॥ ध्रु० । हा मायापुर आटावा ॥ भवबंधन रज्जु तुटावा ॥ मम त्रिविध ताप उठावा ॥ मदमत्सरमोह सुटावा ॥ हा अहंकार घटावा ॥ षड्विकार

कुंभ फुटावा ॥ चाल ॥ अज्ञान-तिमिर झडूं दे ॥ ज्ञानोदय हृदयिं पडूं दे ॥ सत्संग सतत घडूं दे ॥ जळो मी-तुंपणा लवलाहीं ॥ तुज० ॥ १ ॥ मज गुरुचा बोध पटवा ॥ संशय हा समुळ फिटावा ॥ विषयांच्या लोभ विटावा ॥ ज्ञानांकुर हृदयिं फुटावा ॥ नवविधा भक्ति नटावा ॥ जिव परउपकारिं झटावा ॥ चाल ॥ क्षयरोगकुष्ट हरिलेसी ॥ वांझेला संतति देसी ॥ मृत सतिपतिला उठवीसी ॥ अशि अघटित तव नवलाई ॥ तुज० ॥ २ ॥ तुह्मि अनुसयेचे पोटीं ॥ अवतरलां दीनासाठीं ॥ किती दिवस अशी अटाआटी ॥ सोसावी ग्यां जग-जेठी ॥ धरिं कवळुनि मजला पोटीं ॥ का बघसी कौतुक दृष्टीं ॥ चाल ॥ सुखदुःखा म्या विसरावें ॥ अद्वैत समुळ जिरावें ॥ तवरूपीं चित्त मुरावें ॥ ही आस दुजी नच काहीं ॥ तुज० ॥ ३ ॥ किती अंत बघसि त्रैमूर्ति ॥ पसरली जगीं तव कीर्ति ॥ ऐकूनि विषयि जन येती ॥ व्हावया कामनापूर्ती ॥ तव ध्यानिं पातकें हरती ॥ किती पिशाच भूतें तरती ॥ चाल ॥ यास्तव मम करुणा यावी ॥ वैकुंठ वस्ति करावी ॥ श्री दत्तरूप तनु व्हावी ॥ हें मागत कृष्णाबाई ॥ तुज० ॥ ४ ॥

## गाणें १८ वें.

[ चाल—मम लालस क० ]

चलग गडे वाडि[illegible] दत्त-दर्शना ॥ जनन-मरण हरण करुन पुरवि कामना ॥पुर० ॥ ध्रु० ॥ कृष्णातिरिं औदुंबर छायिं बैसला ॥ दत्तराज भक्तकाज करित राहिला ॥ शमि तुळसी बेल फुलें वाहु त्याजला ॥ धूप दी[illegible] नैवेद्य करूं प्रदक्षिणा ॥ चल० ॥ १ ॥ काषायांबर नेसुन भस्म [illegible]र्चितो ॥ मृग आसन व्याघ्रांबर पांघरीत तो ॥ रुद्रनेत्रहार कंठि [illegible]हु झळाळतो ॥ पायिं पादुका करीत भ्रमण

त्रिभुवना ॥ अ० ॥ चल० ॥ २ ॥ धरुन दंड निशिदिनिं निज भक्त पाळितो ॥ जटिं गंगा वाहतसे चंद्र भाळिं तो ॥ भूतपिशाचांस गती देइ शीघ्र तो ॥ थोर थोर घोर रोग करि निवारणा ॥ ॥ करि० ॥ चल० ॥ ३ ॥ चौऱ्याशी लक्ष योनि चुकवुं साजणी ॥ षड्विकार पंचविषय त्रिगुण त्यागुनी ॥ भवसागर तरुन पार होउं या क्षणीं ॥ म्हणे कृष्णा मागुं मोक्ष अत्रिनंदना ॥ अत्रि० ॥ ॥ चल० ॥ ४ ॥

---

## गाणें १९ वें.

[ चाल—कृपा करुनी मागें० ]

कृपा करुनी पुनित करावें मजला श्री दत्ता ॥ काया वाचा मन भावानें प्रार्थितसे दुहिता ॥ कृ० ॥ ध्रु० ॥ पुण्यवान बहु वाडिक्षेत्र तें कृष्णातिरवासी ॥ औदुंबरतरुतळिं गुरु बसले भासे मज काशी ॥ पायिं पादुका घालुनि जाती संगमिं स्नानासी ॥ भस्मोद्धूलन करुनि नेसले भगव्या वसनासी ॥ रुद्राक्षाच्या घालुनि माळा यज्ञोपवितासी॥ धारण करुनी रात्रंदिन तो रक्षित भक्तासी ॥ जोडुनि पाणी लववुनि चरणीं ठेवितसें माथा ॥ भवसागर हा तरुन कशी मी जाउं तरी आतां ॥ काया० ॥ १ ॥ दत्तदर्शना आलि उत्तरेहुन कृष्णाबाई ॥ नमुनि गुरूला वळुन दक्षिणे पूर्वेकडे जाई ॥ सुजन मिळुनी प्रातःस्नाना जाती लवलाही ॥ पुनित होउनी जलघट भरुनी ओतिति गुरुपायीं ॥ पंचामृतादि पुजा करूनी धूपारति होई ॥ बसुनि विमानीं बघती सुरवर ऐका नवलाई ॥ कृपाकटाक्षें अवलोकी गुरु कनवाळू दाता ॥ भक्तासाठीं सदा तिष्ठतो जनजननी-ताता ॥ काया० ॥ २ ॥ प्रात काळी चंदन उटि ती चर्चुनी अंगाला ॥

शमी तुळसिदळ बिल्वपत्र तें वाहति सुमनाला ॥ रुद्राक्षाच्या कुणि स्फटिकाच्या कुणि तुळसिमाळा ॥ मोतिं पोवळीं पुत्रवंतिच्या घेउनि नर अबला ॥ प्रथमपासुनी लक्ष घालिती प्रदक्षिणा गुरुला ॥ कर्पुरारती करुन घालती लोटांगण घाला ॥ मिठाइमेवा पायस केळीं त्वरित आणा आता ॥ नैवेद्यासी अर्पुनी विनवा भक्षा गुरुदत्ता ॥ काया० ॥ ३ ॥ जप करिती कुणि तप करिती कुणि कुणि ध्यानें धरती ॥ कुणि गुरुलीला श्रवण कराया लगबग जाताती ॥ कुणी वाचिती कुणी ऐकती कुणि गीतें गाती ॥ तीर्थप्रसादा सेवुनियां कुणि सदनाप्रति जाती ॥ जान्हविसंनिध स्त्रिया येउनी हळदकुंकुं देती ॥ थोर थोर बहु साधु संत ते वदुनी विनवीती ॥ पतितपावना दीनदयाघन करुणा करिं आता ॥ विनवी कृष्णा दिनरजनीं तुज शातविं मम चित्ता ॥ काया० ॥ ४ ॥

---

## गाणें २० वें. ( दर्शन घेऊन परत जाते वेळचें. )

[ चाल--- ये धावत कृष्णाबाई० ]

येतों आम्ही लोभ असू दे ॥ श्रीदत्ता प्रेम वसूं दे ॥ हा प्रपच लटिका सारा ॥ जाणुनिया तव पदिं थारा ॥ तरि पावन अत्रिकुमारा ॥ करिं मजला विधिहरिहरा ॥ लागला विषयविषवारा ॥ मम अंगीं झोंबत सारा ॥ **चाल** ॥ नसे सौख्य मला संसारीं ॥ यास्तव मी आलें द्वारीं ॥ मम दु ख कोण निवारी ॥ तुजवाचुन, कोप नसूं दे ॥ येतों आम्ही० ॥ १ ॥ जें अगम्य स्वर्गिं सुरासी ॥ तें रूप दाविलें मजसी ॥ कोटि चद्र उणे ते ज्यासीं ॥ भासतें मला नयनासीं ॥ क्षयरोगि कोडि कुष्टासी ॥ तूं दर्शनिं पावन करिसी ॥ ॥ **चाल** ॥ तव वर्णन सतत करावें ॥ सच्छास्त्रीं मन विवरावें ॥ मागतें बालस्वभावें ॥ मम अंतरिं ध्यान ठसूं दे ॥ येतों आम्ही० ॥ २ ॥

ऐकुनि दिनाची वाणी ।। होय सद्गद अवधूत म्वमनीं ।। मग कृपा-कटाक्षें त्यानी ।। आलिंगुन प्रेमकरानीं ।। ते वदले अमृत वाणी ।। होय सौख्य तुला जा सदनीं ।। चाल ।। धरि दंडकमंडलु हातीं ।। सर्वांगीं चर्चुनि विभुती ।। श्रीदत्त दिगांबर मूर्ती ।। म्हणे कृष्णा चित्तिं वसूं दे ।। येतां आम्ही० ।। ३ ।।

## गाणें २१ वें.

( चाल--काय तुझें गांठोडें )

सयांनो पंढरपुरिं जाऊं ।। एक विटेवरि ब्रह्म उभें तें पांडुरंग पाहूं ।। ध्रु० ।। बरोबर साधुसंत घेऊं ।। दिंडिपताका टाळ मृदंगा भजन मेळिं गाऊं ।। रजतम त्रिविध ताप धूऊं ।। चंद्रभागेमधिं स्नान करुनी आनंदित होऊं ।। सयानो० ।। १ ।। पुजेची सामुग्री घेऊं ।। पंचामृतादि पुजा करुनी तुलसि बुका वाहूं ।। मधुर मिष्ट पक्कान्नें करवूं ।। भक्तीभावें तार्टि रुप्याच्या नैवेद्या दावूं ।। त्रयोदशगुणि तांबुल ठेऊं ।। प्रदक्षिणा दक्षिणा नमूनी पुष्पांजलि वाहूं ।।सयानो०।। ।।२।। करुनी जननि–तात–सेवा ।। पुंडलिकानें विधान अणिलें पर-ब्रह्म मेवा ।। त्यजूनि वैकुंठ गावा ।। भक्तासाठीं सत्वर आले ऐकु-नियां धांवा ।। भुले हा बघुनि भक्तभावा ।। युगें अठ्ठाविस खालिं बसेना झाले श्रम देवा ।। सदा दे संतसंग बरवा ।। म्हणते कृष्णा नलगे मुक्ती चरणिं ठाव द्यावा ।। सयानो० ।। ३ ।।

---

## गाणें २२ वें.

( चाल--हरी कशी झोंप० )

धाव धाव धांव आता शीघ्र विठ्ठला ।। तुजवाचुनि जगतिं नसे अन्य हरि मला ।। प्रभो अ० ।।ध्रु०।। मधुर सगुण नाम असें ।। गाति

भक्त प्रेम-रसें ॥ पुंडलिकें भावें कर्मे विटे स्थिराविला ॥ प्रभो० ॥ ॥ धाव ॥ १ ॥ अगणित मुनि ध्याति तुजसि ॥ परि नच त्या नयनिं दिसासि ॥ जनिसगें दळण दळिसि ॥ भक्ति भाळला ॥प्रभो०॥ ॥ धाव ॥२॥ अंत किति बघसि अजुनि ॥ समय कठिण जाण मनीं॥ होईल तव सत्वहानी ॥ तारिं कृष्णेला ॥ प्रभो० ॥ धावा ॥ ३ ॥

## गाणें २३ वें.

( चाल--चरण कमल ज्याचे मृदु० )

चला जाउं पाहुं तया चला जाउ पाहुं तया ॥ पंढरिचा देवराया ॥ध्रु०॥ विप्र पुंडलिका घरीं ॥ घेई धाव वेगें हरी ॥ युगें अठ्ठाविस वरी ॥ तिष्टे विटे राहुनिया ॥ चला० ॥ १ ॥ दोन्हि पाणि ठेउनि कटीं ॥ उभा चंद्रभागातटीं ॥ पाहे वाट भक्तासाठीं ॥ साधु-संतांचि माया ॥ चला० ॥ २ ॥ चरण सुंदर किती ॥ प्रेमें चुरित राधा सती ॥ गळा माळ वैजयंती ॥ भाळिं बुका लाउनिया ॥ चला० ॥ ॥ ३ ॥ शोभे तुळसिहार गळां ॥ भाळिं कस्तुरीचा टिळा ॥ दावि करुनि सगुण लिला ॥ भक्ता साह्य होउनिया ॥ चला० ॥ ४ ॥ सोसवेना भवव्यथा ॥ ऐक रुक्मिणीच्या नाथा ॥ नेई माहेरासि अता ॥ कृश झालि बहुत काया ॥ चला० ॥ ५ ॥ भक्त कितिक उद्धरिले ॥ नाहिं गणित कोणिं केलें ॥ ऐसे पाडुरंग भले ॥ कृष्णा लीन झालि पाया ॥ चला० ॥ ६ ॥

## गाणें २४ वें.

[ चाल --दोन प्रहर रात्र झाली ऋषी आले० ]

संताचा साह्यकारी पंढरिसी पाहिला ॥ कटिं पाणी ठेवुनीया स्थिर विटे राहिला ॥ ध्रु० ॥ नामदेवा घरीं टोप्या अंगडी शीवतो ॥

सावत्याच्या घरीं प्रेमें हार हा गुंफितो ॥ अत्यजा चोख्यासंगें ढोरें हा ओढितो ॥ नाहिं कवडी देत कोणी भक्तीनें बांधिला ॥ सताचा० ॥ ॥ १ ॥ तुकोबा वाणियाच्या मवदा हा वीकितो ॥ कबीर बालकाचे शेले हा वीणितो ॥ रोहिदासागृहिं जोडे प्रेमानें बांधितो ॥ नाथाच्या घरीं स्कंधीं जलघट वाहिला ॥ सताचा० ॥ २ ॥ पतिसेवा करु-नीया सखुसवत जाहला ॥ मिराबाई कन्यकेचा विषप्याला प्राशिला ॥ जनिसंगें दळू कांडूं हरि कैसा लागला ॥ दावि करुनी सगुण लीला प्रेमें त्या गाइला ॥ सताचा० ॥ ३ ॥ त्रिभुवन माउलीये हा जाच सोसेना ॥ त्रैलोक्यभार घेसी येऊं दे करुणा ॥ पट्शत्रू मस्त झाले बहु करिती जाचना ॥ किती अत बघसि आता कृश देह जाहला ॥ संतांचा० ॥ ४ ॥ बहु दीन झाले मातें माहेर दाखवीं ॥ निज दासा गरुडराया मज मूळ पाठवीं ॥ दिनरजनीं मन माझें तव लीला आठवी ॥ पदिं लीन झालि कृष्णा ने वेगें विठ्ठला ॥ संतांचा० ॥ ५ ॥

---

## गाणें २५ वें.

[ चाल --ये धावत कृष्णाबाई० ]

ये धावत माय विठाई ॥ दासीची त्यावि मिठाई ॥ ध्रु० सस्-तिच्या विराट नगरी ॥ देह दुकान कल्पुनि नारी ॥ वैराग्य धरुनि अंतरीं ॥ भाव सौदा त्या श्री हरी ॥ प्रार्थितें मूढ वैखरीं ॥ दोन्हि पाणि जोडुनी अदरीं ॥ **चाल** ॥ लाभ-हानि फळें हीं दोन ॥ खवा-साखरमिश्रित करुन ॥ बनविले पेडे बहु छान ॥ वेलदोडे शांति ये ठाईं ॥ ये धावत० ॥ १ ॥ शर्करा भक्तिचा पाक ॥ ज्ञान नारळ आणिला एक ॥ मिळवूनि बोध-विवेक ॥ बनविली बर्फि बहु चोख ॥ **चाल** ॥ सुख दु:ख पारडें अणिलें ॥ मनकटाकि स्थिर त्यां

केलें ॥ हरिचरणिं प्रेमें अर्पीलें ॥ वासना विरो या ठाईं ॥ ये० ॥ ॥ २ ॥ हा जीव मुळींचा कोरा ॥ वरि वेष्टन माया दोरा ॥ अंधार पडे अंतरा ॥ करिं प्रकाश बा गुरुवरा ॥ दाखवीं परात्पर-परा ॥ वेड लागलें या भ्रमरा ॥ चाल ॥ नाम पैका देउनि मजला ॥ देह दुकानीं या विठ्ठला ॥ भाव भक्ति पेढे—बर्फीला ॥ भक्षुनी मुक्ति मज देई ॥ ये० ॥ ३ ॥ नउ द्वारिं दुकानी थाट ॥ हलवाइ जीव हा धीट ॥ अठरा चार करिति बोभाट ॥ साहानीं वाजविलि घाट ॥ वर्णिलें रूप वीराट ॥ परब्रह्म विटेवरि नीट ॥ ॥ चाल ॥ पाहूनि पंढरीरचना ॥ तद्रूप जाहली कृष्णा ॥ लुब्धली विठ्ठलचरणा ॥ दे असरा आपुल्या पायीं ॥ ये० ॥

---

## गाणें २६ वें.

[ चाल —धाव विभो० ]

भीमातटिंची माय विठाई ॥ एक विटेवरी तिष्ठत राही ॥ ॥ भीमा० ॥ धृ० ॥ किति कनवाळू पूर्ण दयाळू ॥ या मायेतें आप-पर नाहीं ॥भी०॥ १ ॥ जनाबाइचें दळण दळूनी ॥ चंद्रभागेतटीं लुगडीं धूवी ॥ भीमा० ॥ २ ॥ सखूबाइची सवत जाहली ॥ पतिसेवेसी तत्पर राही ॥ भीमा० ॥ ३ ॥ नाथासंगें पाणि वाहिलें ॥ कावड स्कंधीं घेऊन जाई ॥ भीमा० ॥ ४ ॥ अंत नको मम पाहूं आतां ॥ हे जगन्ननी नमि कृष्णा ही ॥ भीमा० ॥ ५ ॥

---

## गाणें २७ वें.

[ चाल— -चरण कमल ज्याचे० ]

धन्य झालि शबरतनया ॥ धन्य झालि शबरतनया ॥ दिध-

भेट रामराया ॥ ध्रु० ॥ बहुत दीन तप केलें ॥ मुनिजात जेथें रमले ॥ रघुराज घरा आले ॥ उद्धरिली पापिजाया ॥ धन्य० ॥ ॥ १ ॥ रामचरणीं करुनि पूजन ॥ भक्तिभावें करुनि सु-मन ॥ म्हणे दिवस धन्य धन्य ॥ पुनित झालि आत्मकाया ॥ धन्य० ॥ २ ॥ पुण्यवान तरुवर ॥ बदरिफळें असति मधुर ॥ भक्षावीं हीं रघुवीर ॥ मी-दूषण साडुनियां ॥ धन्य० ॥ ३ ॥ बदरिफळें घेउनि करीं ॥ मधुर बोले धनुर्धारी ॥ चंचुपुटें काय शबरी ॥ भक्षिली हिं पक्षिया॥ धन्य० ॥ ४ ॥ शुद्ध दंतिं चाखुनिया ॥ रक्षिली मिं आजवरी ॥ घालि मुखीं रावणारी ॥ शबरिभाव पाहुनिया ॥ धन्य० ॥ ५ ॥ भक्त भिल्लि उद्धरिली ॥ सुरीं पुष्पवृष्टि केली ॥ नामामृता कृष्णा प्याली ॥ नमन करी रामपाया ॥ धन्य० ॥ ६ ॥

## गाणें २८ वें.

[ चाल—अर्जुना इतर मज काहीं. ]

महिरावण कांता बोले ॥ मम मानस तुजवरी बसलें ॥ रघुविरा ॥ ध्रु० ॥ मम मंदिरिं रामा येसी ॥ का टाकुनि मजला जासी ॥ रघु० ॥ अनुचीत कर्म हें करिसी ॥ शोभेना तव कीर्तीसी ॥ रघु० ॥ **चाल**— ही दीन असे कमलीन सूर्यभूषण ब्रीद तव गेलें ॥ तू सत्य वचन नच केलें ॥ रघु० ॥ महिरा० ॥ १ ॥ इंद्रतुल्य शेज म्या रचिली॥ वरि फुलें बहुत पसरीलीं ॥ रघु० ॥ अत्तरें सुवासिक आणिलीं ॥ पक्वान्नें ताटिं बहु भरिलीं ॥ रघु० ॥ **चाल** ॥ करुनिया मंदिरीं थाट ॥ पहातसें वाट ॥ कटपट कुणिं केलें ॥ हे भ्रमर कोठुनी आले ॥ रघु० ॥ महिरा० ॥ २ ॥ पतिमृत्युवृत्त म्या कथिलें ॥ कपिवरें वचन मज दिधलें ॥ रघु० ॥ मर्कटें कसें फसविलें ॥ तू जासि पती मज मुकले ॥ **चाल** ॥ जरि असे अबल ही मुग्धा ॥ करिन तुज

दग्ध मर्कटा वहिलें ॥ मी कपिकुल शापिन सगळें ॥ रघु० ॥ महिरा० ॥ ३ ॥ नज कुद्धा होऊं वनिते ॥ द्वापारयुगीं गुणसरिते ॥ ऐक गे ॥ पट्टराणि करिन मी तूतें ॥ हें सत्यमानिं वचनातें ॥ ऐक गे ॥ चाल मजवरी ॥ रोष नच धरीं ॥ स्नेह बहु करीं ॥ जाति त्या वेळे ॥ पदकमलीं कृष्णा लोळे ॥ रघु० ॥ महिरा० ॥ ४ ॥

---

## गाणें २९ वें.

[ चाल—उद्धवा शांतवन कर जा. ]

मारुतिला राघव बोले ॥ वत्सा त्वां अनुचित केलें ॥ ध्रु० ॥ कौसल्या जैसी माता ॥ तैशा मज सर्वहि कांता ॥ हें ठाउक तुज हनुमंता ॥ लाविली कैशि मज चिंता ॥ चाल ॥ मत्प्राण शत्रु जरि घेते ॥ तरि वत्सा सार्थक होतें ॥ नरतनू पुन्हा नच येते ॥ कैसें त्वां अघटित केलें ॥ मा० ॥ १ ॥ तरि तुवां युक्ति योजावी ॥ मत्कीर्ति किमपि न जावी ॥ तव वाणि कधिं न भगावी ॥ विधुमेना रुष्ट न व्हावी ॥ चाल ॥ मग मारुति जाउन सांगे ॥ म्हणे राम येतो अनुरागें ॥ करिं तयार मंचक जागे ॥ चन्द्रसेनामुख प्रफुल्लित झालें ॥ मा० ॥ २ ॥ चाल—अक्रूराची ॥ मग ऐकुनिया पवन—सुताच्या बोला ॥ आनंद तिला बहु झाला ॥ अजि येईल तो दाशरथी मम माहाला ॥ भूपत्री बहुत देहाला ॥ अवलोकिन मी प्रेमभरें रामाला ॥ कंठात घालुनी माळा ॥ चाल ॥ गुफिला फुलानी दाट गे ॥ पर्यंकीं करि बहु थाट गे ॥ पाहे श्रीप्रभुची वाट गे ॥ रघुतिलक तदा वायुसुतासह आला ॥ आनंद० ॥ ३ ॥ हेमचवरंगी बसउनि श्री रघुराया ॥ करि पुजन धरुनि दृढ पाया ॥ आज कृतार्थ मी झालें पति मारुनिया ॥ चल शयनिं केली मउ शय्या ॥ चाल ॥ हार गळा घालि करि आरति हो ॥ कोमल पद मंचकावरती हो ॥ ठेविना भ्रमर ते

[stamp]

पळती हो ॥ कडकडुनि तळीं मोडून मचक पडला ॥ अपशाकून प्रभूला घडला ॥ मग० ॥ ४ ॥ येतों आहि आता लोभ असू दे ॥ मजवरती रोष नसूं दे ॥ तव मानिनिंग अंतरि प्रेम वसूं दे ॥ मन्मूर्ति हृदयिं ठसूं दे ॥ चाल ॥ हें योग्य नसे तुज रामा रे ॥ नाहिं पूर्ण केलें रतिकामा रे ॥ देहत्याग करिन घन शामा रे ॥ हा काळ कसा अवचित मजवरि फिरला ॥ मत्प्राणपती अंतरला ॥ मग० ॥ ५ ॥ तुजसाठीं मी मारुन प्राणपतीला ॥ गुपितार्थ मनींचा कथिला ॥ तपसामर्थ्यें पाडिन सूर्य क्षितीला ॥ देतें शाप अता मारुतिला ॥ चाल ॥ ह्मणे राम ऐक महिकाते ग ॥ द्वापार युगीं गुणवते ग ॥ पट्टराणि करिन मी तूतें ग ॥ सत्यभामा तू होशिल आवडति मजला ॥ नमि कृष्णा प्रभुपदकमला ॥ मग० ॥ ६ ॥

## गाणें ३० वें.

[ चाल--- श्रीराम सुजनविश्राम० ]

गाधिजा पुसे श्रीराम अहिल्याकाहणी ॥ कापते शिला का अवनी ॥ ध्रु० ॥ मार्गांत नवल देखिलें अकल्पित नयनीं ॥ पाषाणामधुनी तरुणी मुनिराज दिव्य अंगना येतसे कुठुनी ॥ का शाप दिला इज ह्मणुनी ॥ हा कबरिभार मस्तकीं वल्कलें कसुनी ॥ वनदेवी का मृगनयनी ॥ जशि चंद्रकला वाढते तशी ही सगुणी ॥ इज सानिध नाहीं कोणी ॥ चाल चतुराई खर्चुनी सारी हो ॥ केली कमाल विधिनें भारी ॥ बनविता अमोलिक नारी ॥ निर्वैर सर्व श्वापदें विचरती भुवनीं ॥ द्विज गुंजारवती मधुनी ॥ गाधिजा० ॥ १ ॥ वदे राजऋषी रघुविरा सांगतों गोष्टी ॥ प्रसवला हिला परमेष्ठी ॥ इज ऐशी न मिळे दुसरि शोधिता सृष्टी ॥ इज बघता न पुरे दृष्टी ॥ तिज समान योग्य वर न मिळे होय मनिं कष्टी ॥ करि खेद बहू परमेष्ठी ॥ चाल ॥ पण दुर्धर

केला विधिनें हो ॥ पृथ्विला प्रदक्षिणा करुनी हो ॥ दोन यामामधिं परतुनी हो ॥ ये प्रथम तया देईन सगुण गुणखाणी ॥ मम सत्य सत्य ही वाणी ॥ गाधिजा० ॥ २ ॥ स्त्रष्ट्याचें प्रतिज्ञावाक्य ‿रांना पटलें ते शृंगारानीं नटले ॥ सजवुनी वाहनें आपुलीं त्वरित ‿ उठले ॥ लंबोदर पळताचि सुटले ॥ मी जाईन सर्वांपुढें कुणी वट-वटले ॥ कुणि पळता पळता हटले ॥ चाल ॥ त्यापुढें अमरपति गेला हो ॥ मनिं भावित विधिकन्येला हो ॥ हा बेत तयाचा फसला हो ॥ त्या वेळिं गौतमें धेनू द्विमुखी बघुनी ॥ तिज प्रदक्षणात्रय करुनी ॥गाधि०॥ ॥३॥ खुण कळलि विधात्या शीघ्र आणुनिया ऋपिला ॥ हा वृत्तांत त्यानें पुशिला ॥ कळताचि अर्पुनी आपुली कन्या सुशिला ॥ मग समारंभ बहु केला ॥ वधुवरा बघुनिया इंद्र समूळचि फसला ॥ मनिं खेद करीत तो बसला ॥ चाल ॥ विपरीत गोष्ट कशि घडली हो ॥ ही सुंदर कन्या असली हो ॥ ह्या जरठा विधिनें दिधली हो ॥ त्या दिवसापासुनि इंद्रद्वेष मनिं धरुनी ॥ ह्मणे भोगिन कपट मि करुनी ॥ गाधिजा० ॥ ४ ॥ तो धरुनि दुराशा इंद्र अहिल्या सदनीं ॥ पातला कपट वेषांनीं ॥ म्हणे प्राणप्रिये पीडिलें मला मदनानीं ॥ आलिंगन दे सुखशयनीं ॥ विपरित वाक्य हें काय सूर्य राहूनी ॥ ग्रासिला पहा नभिं नयनीं ॥ चाल ॥ नायकें धरुनि दृढ सतिला तो ॥ करि तृप्त भोगुनी रतिला तो ॥ हें वृत्त अहिल्यापतिला हो ॥ कळताचि शीघ्र पातला स्नान सारोनी ॥ अतिरुषा हाक मारोनी ॥ गाधिजा० ॥ ५ ॥ विधिसुते उघडिं तू द्वार कोण तुज संगें ॥ बोलतो शीघ्र मज सांगें ॥ रवि त्यजुनि राहु चालला गृहाप्रति मागें ॥ कोण सदनिं श्वान शिरला गे ॥ घाबरुनि अहिल्या वसन सांवरित वेगें ॥ तू कोण होय सर मागें ॥ चाल ॥ स्वर्गीचा अमरपति आलों मी ॥ तुजसाठिं कष्टि बहु झालों मी ॥

अधरामृत प्राशुन धालों मी ॥ रति झालि तुझी कीं पूर्ण जाय येथूनी ॥ उठे क्रुद्ध सती तेथूनी ॥ गाधिजा० ॥ ६ ॥ घाबरुनि अहिल्या द्वार उघडि त्या वेळा ॥ तों इंद्र पळुनियां गेला ॥ मुनि जातां जातां त्वरें शापि सुरपाळा ॥ पडतील भगें तव तनुला ॥ अवलोकि दीन होउनी पतीमुखकमला ॥ तइं काळरूप तिशिं दिसला ॥ **चाल** ॥ पापिणी जड शिळा होई तू ॥ एकटी वनीं या राहीं तू ॥ मम शापा भोगिं लवलाही तू ॥ थरथरां कापते नार लागे पतिचरणीं ॥ मज नेणत घडली करणी ॥ गाधिजा० ॥ ७ ॥ नाकळत भोगिला इंद्र स्वामि म्यां शयना ॥ पतिरूप दिसे मम नयना ॥ तुम्हि महाराज सामर्थ्यावान मम करुणा ॥ येऊं द्या धरी दृढ चरणा॥ रति झालि तुझी कीं पूर्ण वदसि तूं वदना ॥ नच शाप दोशी शचिरमणा ॥ **चाल** ॥ साठ सहस्त्र वर्षं नारी तूं ॥ जड शिळेमधें संचारी तूं ॥ युग त्रेत राम-अवतारीं तूं ॥ उद्धार करिल तो तुझा राम रजचरणीं ॥ वदे गौतम करुणा वचनीं ॥ गाधिजा० ॥ ८ ॥ ती नार अहिल्या शिळेंतून अलि रामा ॥ करिं पावन मेघश्यामा ॥ तव चरणरजाचा असे अगोचर महिमा ॥ काय देउं तयासी उपमा॥ कर जोडुन ही प्रार्थिते जपे तव नामा ॥ उद्धरुनी पाठविं धामा ॥ ॥ **चाल** ॥ तुज कथिलि कहाणी रघुनाथा रे ॥ चल मिथिला नगरी आता रे ॥ हो वरुनी विजयी सीता रे ॥ निशिदिनीं लागो मज ध्यास रघूविरचरणीं ॥ करि कृष्णा विनती नमुनी॥ गाधिजा० ॥ ९॥

---

## गाणें ३१ वें.

[ चाल—माझा राम पाहिला काय० ]

अजि सुदिन उगवला ॥ नयनिं राम पाहिला ॥ पतिशापें दिवस

अमित ॥ मम तनु जड दगड होत ॥ चरणधुळी वरि पडत ॥ तारिलें मला ॥ नयनिं० ॥ १ ॥ पाप नष्ट व्हावयार्थ ॥ रामनाम वालि जपत अतिं अजामीळ स्मरत ॥ पुनित जाहला ॥ नयनिं० ॥ ॥ २ ॥ विधि तनया प्रार्थि राम ॥ सुदृढ धरि हृदयिं प्रेम ॥ करुनि शुभ्र मन कुसुम पूजितें तुला ॥ नयनिं० ॥ ३ ॥ मम अंतर संदुकेंत ॥ म्हणे कृष्णा बैस त्वरित ॥ जावु नको पुरविं हेत ॥ वारिं भवजला नयनिं० ॥ ४ ॥

## गाणें ३२ वें.

[ चाल—श्रीमंत पतीची राणी. ]

पोंचवीं पैल तीरातें श्रीराम विनवि गुहकातें ॥ तुह्मि कोण कुणाचे स्वामी मज कथन करा या कामीं ॥ तू ऐक सांगतों आम्ही वसतसों अयोध्या ग्रामीं ॥ पाळिलें पितृवचना मी करितसें गमन विपिना मी ॥ **चाल** ॥ गुहकाची ऐकुन माता ॥ म्हणे नावेवरि रघु-नाथा ॥ नको वसूं देउ तू आता ॥ हा करिल हिला नारीतें ॥ अनिवार विघ्न वारीं तें ॥ श्री राम० ॥ १ ॥ याचि कीर्ति प्राचिन-कालीं ऐकिली आम्हीं नी झाली ॥ हा आता आपुल्या चालीं पद-धुळी शिळेवर गेली ॥ रंभेसम कामिनि झाली श्रीरामपदांबुजिं रमली ॥ **चाल** ॥ काष्ठाच्या नावेवरती ॥ हा चढता अगणित युवती ॥ होतिल गळा मग पडती ॥ पोशिता एक अबलेतें तव त्रेधा निशी-दिनिं होते ॥ श्री राम० ॥ २ ॥ हसूं येत मनीं रामासी, पाहोनि भक्तप्रेमासी ॥ पोंचवावया आह्मासीं परतिरा वित्त किति घेसी ॥ म्हणे गुहक पूर्णकामासी करिं पावन मम धामासी ॥ **चाल** ॥ चल ऊठ अता श्रीरामा ॥ घे बंधु सिता घनःशामा ॥ ही रात्र क्रमविं विश्रामा ॥ तव चरण धुइन मम हातें करिं सेवन फल—हारातें ॥

श्री राम० ।। ३ ।। नव भक्तीं अष्ट भावें पूजुनि ह्मणे या नावें ।। वरि बसुनि पंढरिं। नाचे ।। बालका। कधिं न विसरावें ।। वनवास करुनि भणिं यावें ।। या दासा दर्शन द्यावें ।। चाल ।। तू धेनू वत्स मी तूझें ।। तूं हरिणी पाडस समजें ।। तव दीननाथ ब्रिद गाजे ।। हरिं शीघ्र त्रिविध तापांतें ।। करिं पावन या कृष्णेतें ।। श्री राम० ।।४।।

## गाणें ३३ वें.

[ चाल—एथेंच उभी कीं आलें• ]

हरिनाम मुखानें गाती, कमलोद्भवसुत ते जाती ।। मार्गि ते ।। तिन्हि लोकिं जयाची वस्ती, नारायण वदनीं वदती ।। मा० ।। अगणीत शिष्य सांगातीं, करिं टाळ-विणा वाजविती ।। मा० ।। चाल।। बकध्यान लावुनी कान, शस्त्र करिं धरुन लक्षि मार्गाला ।। वाल्मीक किरातहि बनला ।। मार्गि तो ।। क्षणभंगुर धन-सुत दारा, झडकरी करीं सुविचारा ।। वाल्मिका ।। ध्रु० ।। १ ।। मुनिमेळ दटावुनि बोले, द्या धन तुह्मि मज या वेळे ।। विप्रहो ।। उडवीन तुमचि शिरकमळें, मी पारधि मृग तुह्मि सगळे ।। विप्रहो ।। तापसी कितिक म्या बधिले, मी व्याघ्र अहा तुह्मि कोल्हे ।। विप्रहो ।। या स्थळीं कोणि नसे बळी, करिन रांगुळी, जिवित सांभाळा ।। देऊन शीघ्र वित्ताला ।। विप्रहो ।। क्षण० ।। २ ।। वचनोक्ती ऐकुनि कानीं, करि प्रश्न नारदमूनी ।। वा० ।। दुष्कृतें घडलिं तुजकडुनी, तूं केलिस सुकृतहानी ।। वा० ।। समयास येइना कोणी, करिं विचार पुरता स्वमनीं ।। वा० ।। चाल ।। हा शीण कासया धन व्यर्थ स्त्रीस्वजन न ये कामाला ।। अतरीं भजें रामाला ।। वा० ।। क्षण०।। ।। ३ ।। पाव निमा पाडण सगळा, कोण घेई पातक गोळा ।।वा०।। जा पुसें सदनिं स्वजनांला, थाबतों अह्मी स्थानाला ।। वा० ।।

सत्संगतिमहिमा असला, मुनिबोध मानसीं ठसला ॥ वा० ॥चाल॥ झडकरीं जाय तो घरीं पुसे अंतुरी रिक्त का आला, अर्धि संपत द्यावी मजला ॥ प्रियकरा ॥ क्षण० ॥ ४ ॥ आप्तासि विनोदें बोले, अजवरी कष्ट बहु केले ॥ स्वजनहो ॥ मम पातकमेरू बनले, कोण घेता निमे सगळे ॥ स्वज० ॥ करचरण अता मम थकले, तरि सार्थक करिन मि अपुलें ॥ स्वजनहो ॥ चाल ॥ हा त्रास नको मज खास धरीतों कास गुरूचरणाला ॥ गुरू० ॥ जो दावि आत्म-किरणाला ॥ स्वज० ॥ क्षण० ॥ ५ ॥ वदे जननि-जनक त्या समया, तुजवरी अमुचि बहु माया ॥ मिळविता ॥ कामीन म्हणे पतिराया, शयनार्थ घालिन मि शय्या ॥ मिळविता ॥ सोयरे भगिनि भाईया, अह्मि सर्व सौख्य भोगाया, मिळविता ॥ चाल ॥ पातका कोण घे फुका, अह्मि आलों सुखा, बघुन धनश्रीला ॥ ऐकुनि मानसीं विरला ॥ वालि तो ॥ क्षण० ॥ ६ ॥ घेइना पाप कुणि माझें, जड झालें दुष्कृत ओझें ॥ मुनिवरा ॥ ही माया डाकिण गाजे, झोटिंग काम हा भाजे ॥ मुनि० ॥ हा दीन पदीं तव लाजे, नामामृत पाजविं ताजें ॥ मुनि० ॥ चाल ॥ विधिसूत मस्तकीं करा, ठेविं दे वरा जपें तूं "मरा" बसुन या ठाया ॥ करिं त्याग सर्व ही माया ॥ वाल्मि०॥ क्षण० ॥ ७ ॥ तो उलट्या नामा गाई. वारुळाकृती तनु होई ॥ त्या स्थळीं ॥ टोणपा वृक्ष वर येई, बहु काळें नारद पाही ॥ त्या स्थळीं ॥ भीतरीं नाम-ध्वनि होई, उकरितां लागला पायीं ॥ त्या स्थळीं ॥ हो पाप भस्म लवलाहीं, आलिंगुनि धरिला हृदयीं ॥ त्या स्थळीं ॥ चाल ॥ शतकोटि ग्रंथ तूं करीं, कृतयुगांतरीं, अवतरे हरी, देत वर ऐसा ॥ श्रीरामकथामृत परिसा ॥ सुजन हो ॥ क्षण० ॥ ८ ॥ अघटीत साधुचा महिमा, लोहाचा जाय काळीमा ॥

गुरुकृपें ॥ रसनाग्रीं धरितां नामा, परब्रह्म सांपडे तुझां ॥ ॥ गुरुकृपें ॥ काय देउं तयासी उपमा, पोंचवी शीघ्र निजधामा ॥ ॥ गुरुकृपा ॥ **चाल** ॥ विश्वास धरीता खास, करी भवनाश गुरू वरदाता ॥ नच कृष्णेसी भवचिंता ॥ गुरुकृपें ॥ क्षण० ॥ ९ ॥

## गाणें ३४ वें.

[ चाल—आज कृतार्थ झालें० ]

श्री वसिष्ठ गुरुची आज्ञा वंदुनि आला ॥ तो राजा दशरथ कौसल्येच्या महाला ॥ स्थुलदेह ओसरीवरती नृपवर चढला ॥ देह सूक्ष्म माजघरिं संशयांत पडला ॥ **चाल** ॥ कारण कोठडींत पाहे नृपति तो ॥ महाकारण माडिवरि जाये त्वरित तो ॥ ही द्वारिं उभी नच राहे म्हणत तो ॥ शोधिता परात्पर परसीं पाहुन तिजला ॥ म्हणे रुसुन बसलि का निर्विकल्प छायेला ॥ डोहाळे दशरथ पुसतो कौसल्येला ॥ हे राजकुमारी काय आवडे तुजला ॥ १ ॥ ध्रु० ॥ जें योगिजनांना योग साधिता न मिळे ॥ तें कौसल्येनें पूर्णब्रह्म सांठविलें ॥ तिजजवळि बसूनी राजा दशरथ बोले ॥ पुरवीन कामना इच्छित वद या वेळे ॥ **चाल** ॥ ती निजानंद आनदीं रंगली ॥ ती द्वैतपणाची बोली विसरली ॥ तिशिं गोष्ट विचारित राजा मागली ॥ आठवतें तुला का वऱ्हाड बुडवुनि गेला ॥ पौलस्त्यतनय तो मस्त्य-मुखीं दे तुजला ॥ डोहाळे० ॥ २ ॥ बोल ते कुठें तो रावण भुज अपटोनी ॥ ती उठलि शत्रुचें नाम ऐकता श्रवणीं ॥ ह्मणे चापबाण दे दाहि शिरें उडवोनी ॥ मी क्षणात टाकिन कुंभकर्ण मारूनी ॥ त्या इंद्रजिताला बाणें जर्जर करूनी ॥ धाडीन यमपुरा बंधु साह्य घेवोनी ॥ **चाल** ॥ मम भक्त बिभीषण लंके स्थापुनी ॥ बंधमुक्त करिन सुर सारे या क्षणीं ॥ धाडीन स्वर्गीं सन्मानें त्यां क्षणीं ॥ हें

कार्य करिन मी पाळुनि ताताज्ञेला ॥ अधिव्याधि विरहित चालवीन राज्याला ॥ डोहाळे० ॥ ३ ॥ घे शशांकवदने नव रत्नाची माळा ॥ मी चाप भगितां घालिल भूमीबाळा ॥ घे अननस अंबे द्राक्ष जांब या वेळा ॥ मी प्रिया शोधितां देइल शबरी मजला ॥ **चाल** ॥ घे दास दासि रथ घोडे सुंदरी ॥ हनुमंत दास तो माझा महिवरी ॥ नौकेंत बैस जलक्रीडा तू करी ॥ प्रिय भक्त गुहक मज नेइल पर तीराला ॥ ही लाल पैठणी पाथर भरजरि शेला ॥ डोहाळे० ॥४॥ झडपिली भुतानीं पत्रारि कुणि आणा ॥ इशिं नेउन दाखवा वैद्य बघुनि शाहाणा ॥ तव उदरीं येइल वैकुंठींचा राणा ॥ अशिर्वाद दिले मज श्रेष्ठीं नमिता चरणां ॥ **चाल** ॥ हे द्वारपाल गुरुजींना आणि तूं ॥ मम ज्येष्ठ प्रियेची सांगे काहणि तूं ॥ करुनिया बहुत सायास ऱ्या ऋतू ॥ ऐकूनि दूत तो शीघ्र घेउनी आला ॥ त्या ब्रह्म-सुताच्या वंदित नृप पदकमला ॥ डोहाळे० ॥ ५ ॥ मी पुत्रहीन तुज शरण असें गुरुराया ॥ करिं कौसल्येला सावध आज लवलाह्या ॥ म्हणे वसिष्ठ बघुनी घाबरसी कां वाया ॥ इज उदरिं अवतरे खचित खचित प्रभुराया ॥ **चाल** ॥ मम सत्य मत्य ही वाणी ॥ मानिं रे इसि पिशाच बाधा नाहीं जाणिं रे ॥ हरि शंख चक्र शेषासह अव-तरे ॥ चैत्र शुक्ल नवमिच्या दिवशिं राम अवतरला ॥ ही कृष्णा दिन-निशिं रंजि घालि पदकमला ॥ डोहाळे० ॥

## गाणें ३५ वें. ( रामाचा पाळणा )

[ चाल—रामपदी वसतें० ]

जो जो रे जो जो श्रीरामचंद्रा ॥ दशरथपूत्रा लागो नीद्रा ॥ ॥ जो जो० ॥ ध्रु० ॥ केवळ कांचनी-पाळणा आणिला ॥ बा तूज-

साठीं रेशमी विणिला ॥ जो जो रे जो जो० ॥ १ ॥ खूर रुप्याचे चहुं बाजूना ॥ हंतरिलासे आंत बिछाना ॥ जो जो० ॥ २ ॥ भरजरि चांदवा रेशमी शेला ॥ त्रिमण्या-मोत्यांची झालर त्याला ॥ ॥ जो जो० ॥ ३ ॥ हंस कोकिळ ते इंद्रनिळाचे ॥ बसविले शुक मोर पाचपोंवळ्याचे ॥ जो जो० ॥ ४ ॥ झुलवी कौसल्या दशरथ बाळा ॥ वंदिते कृष्णा त्या विश्वपाळा ॥ जो जो० ॥ ५ ॥

## गाणें ३६ वें.

[ चाल—कमल नयन० ]

सांग कुठे प्राणपती मजसि मुद्रिके ॥ मजसि० ॥ कशि आलिस सागर हा तरुन प्रियसखे ॥ सांग० ॥ ध्रु० ॥ कांचनमृग पाहुनियां झालि वासना ॥ झालि० ॥ मम अंतरिं कंचुकिची कमललोचना ॥ ॥ कमल० ॥ प्रार्थियलें वधुन शीघ्र हरिण हा आणा ॥ हरि० ॥ चापबाण घेउनि करीं जाति कौतुकें ॥ सांग० ॥ १ ॥ पापिणिनें राघवास धाडिलें वनीं ॥ धाडिलें० ॥ धाव धांव लक्ष्मणा उमटला ध्वनी ॥ उम० ॥ घाबरुनी भाऊजिंची करित विनवणी ॥करित०॥ साह्य राघवास करा जाउनी निकें ॥ सांग० ॥ २ ॥ या वनांत प्राणनाथ पडुन संकटीं ॥ पडुन० ॥ बाहताति करुण स्वरें जोडिं करपुटीं ॥ जोडिं० ॥ जाई शीघ्र आश्रमात वसेन एकटी ॥ वसे०॥ वचन असें परिसुनियां शेषनायकें ॥ सांग० ॥ ३ ॥ हें वहिनी विपरित तू बोलसी कसें ॥ बोलसी० ॥ त्रिभुवनांत राघवास अभय तें असे ॥ अभय० ॥ त्यासमान या जगांत वीर कुणि नसे ॥ ॥ वीर० ॥ सोडू नको धैर्य अतां जनक-कन्यके ॥ सांग० ॥ ४ ॥ चल दुष्टा धरुन वदसि पापवासना ॥ पाप० ॥ अंतरतां राम-प्राण त्यजिन या वना ॥ त्यजि० ॥ कल्पांतीं प्राप्त नव्हे रामअंगना ॥

॥ राम० ॥ सौमित्रें कर कर्णीं धरुनि नायके ॥ सांग० ॥ ५ ॥ आणि अश्रु नयनिं ओढि बाणरेष तो ॥ बाण० ॥ जाऊ नको उल्लघुनि वदत शेष तो ॥ वद० ॥ शोधिन मी कातारीं राघवेश तो ॥ राघ० ॥ त्या मार्गें नेलि मला येउनि दशमुखें ॥ सांग० ॥ ॥ ६ ॥ होउन पुढें वायुतनय नमित जानकी ॥ नमि० ॥ पैलतिरीं राम उभा धरुन बाण कीं ॥ धरु० ॥ वधिल दुष्ट करिल बंधमुक्त हो. सुखी ॥ मुक्त० ॥ ह्मणे कृष्णा दिधलें अभय पवनबालकें ॥ ॥ सांग० ॥ ७ ॥

---

## गाणें ३७ वें.

[ चाल—दिनरजनि० ]

कुणाचा तू असासि दूत कोण धनि तुझा ॥ सांग तुझी जननि-तात पुसत जनकजा ॥ ध्रु० ॥ करिसि गान मधुर तान मान लावुनी ॥ वृक्षाग्रीं रामनाम उमटतो ध्वनी ॥ झालि धन्य जननि तुझी तुजसि प्रसवुनी ॥ गुप्त कौपिनादि कटी लंब पुच्छ ज्या ॥ ॥ कुणाचा० ॥ १ ॥ माते ऐक साद्यंत हि सांगतों कथा ॥ अंजनि मम जननि असे वायु मम पिता ॥ नाम हनूमत करितों रामदास्यता ॥ पाठविलें शोधास्तव जानकी तुझ्या ॥ कुणाचा० ॥ २ ॥ गुप्त खूण काय दिली सांग कपिवरा ॥ करिति वास रामशेष कोणत्या पुरा ॥ शब्दशरें ताडियलें व्यर्थ मीं दिरा ॥ तेंचि पाप भोगविलें भरतअग्रजा ॥ कुणाचा० ॥ ३ ॥ मुद्रिकेचि खूण देत जानकीकरीं ॥ वल्कलें तुज नेसविलीं कैकयीघरीं ॥ हर्षभरित होय मनीं जनक-कूमरी ॥ मारुनिया रावणासि घेउनि मजसि जा ॥ कुणाचा० ॥ ॥ ४ ॥ आज्ञा मज दिधलि नसे तुजसि न्यावया ॥ राम करें मृत्यु मयासूरजावया ॥ देइ आज्ञा जावयासि राम पहावया ॥

सिंधुतिरीं अणिन उद्यां दशरथात्मजा ॥ कुणाचा० ॥५॥ नच शंका रघुराया तुजसि प्रार्थितें ॥ तुजविण मज जग सारें शून्य भासतें ॥ तन मन धन अर्पुनिया शीर लववितें ॥ दृढ निश्चय कृष्णेचा भाव ना दुजा ॥ कुणाचा० ॥ ६ ॥

## गाणें ३८ वें.

[ चाल---उद्धवा शांत० ]

जा झडकरी बा बलभीमा ये घेऊनि गिरि द्रोणातें ॥ ध्रु० ॥ नावरे दुःख रामातें शिर अंकीं घेउनि बोले ॥ अजपासुनि समरंगणिंचें मम साह्यचि हरपुनि गेलें ॥ निर्वाण शक्ति सोडुनिया दशकंठें निधान नेलें ॥ चाल ॥ नको अंत पाहुं हनुमंता ॥ जिवदान देईं बलवंता ॥ वाचवीं ऊर्मिळाकांता ॥ साठवीं पदरिं पुण्यातें ॥जा०॥ ॥ १ ॥ चतुर्दशवर्ष निरहारी मजसाठीं बालक दमलें ॥ सीतेसह मज तोषविता, बहु शरीर याचें श्रमलें ॥ जाणुनिया भविष्य पुढचें एकवार नाहीं पुसलें ॥ चाल ॥ वीटंबुनि शुर्पनखेसी ॥ तूं वधिलें इंद्रजितासी ॥ तूं वरिलें सत्कीर्तीसी ॥ तोषविलें सकळ सुरातें ॥ ॥ जा० ॥ २ ॥ तेहतीस कोटि सुराना कसें बंधमुक्त करूं आता ॥ मी नंदिग्रामीं जाता मज पुसेल भरतहि भ्राता ॥ त्या ऊर्मिळा वहिनीतें कशि सांगुं ओखटी वार्ता ॥ चाल ॥ घडिभरि तरी कां नच वदसी ॥ सूमित्रा पुसेल मजसी ॥ कथुं काय वृत्त हें तिजसी ॥ अलि मूर्च्छा रघुवीरातें ॥ जा० ॥३॥ नको धैर्य टाकुं श्रीरामा ॥ द्रोणाचल अणितों आता ॥ मज निमित्त मात्र करूनी राघवा सर्व तूं कर्ता ॥ बोलुनिया मारुति उठला तिन घटिका यामिनि उरतां ॥ ॥ चाल ॥ या वेळे चल गिरि द्रोणा ॥ दे रामानुज जिवदाना ॥ तोषवीं जानकीरमणा ॥ येउनी मिळविं कीर्ती ॥ जा० ॥ ४ ॥

मर्कटा येसि कितीदा मदवाही गिरिवर झाला ॥ नायके अचल हा म्हणुनी स्कंधावरि धरिला त्याला ॥ झेलितां कंदुका ऐसा कपि म्हणती सूर्य उदेला ॥ चाल ॥ म्हणे सुषेण सुत पवनाचा ॥ आणितो अचल हा साचा ॥ वाचला जीव शेषाचा ॥ ही कृष्णा नमिते त्यातें ॥ जा० ॥ ९ ॥

## गाणें ३९ वें.

[ चाल---त्रिजटेची• ]

श्रीरामाचें अन-हित चिंती कइकइ सखि मंथरा ॥ राज्यारुढ होईल हा म्हणुनी द्वेष धरुनि अतरा ॥ दण दण दण दण चरण अप-टुनी ये कैकेयि-मंदिरा ॥ अभागिणी तूं खचित खरी गे विकल्प नाही जरा ॥ वरि वरि तुजला प्रेम दाखवी नृपवर कपटी खरा ॥ कुलगुरु मंत्री जन पाचारुनि राज्य देत रघुविरा ॥ चाल ॥ पाठउनि भरत मातुळा ग ॥ नाकळत कापिला गळा ग ॥ काय करशिल तूं ह्या वेळा ग ॥ प्रथम बुद्धिचा नाश पावशिल जाइल कार्य नासुनी ॥ तुझ्या हिताची गोष्ट कोण गे सांगेल मजवाचुनी ॥ दासि मंथरे ऐसी संगत करूं नये कधिं कुणी ॥ नाश आपुला जगांत हांसें होइल खचितचि झणीं ॥ ध्रु० ॥ १ ॥ काय मंथरे विपरित वदसी तुजसि कळेना कसें ॥ राम-लक्ष्मण भरतशत्रुहन सर्वहि मज प्रिय असे ॥ कौसल्येहुन माझि मान्यता नृपवर राखीतसे ॥ नाहिं न्यूनता एक पदार्थी लागलें तुजला पिसें ॥ दैत्य-गुरूच्या युद्धसमयिं नृप स्वर्गीं मज नेतसे ॥ उभय वीर ते झुंजत असता अवचित घडलें कसें ॥ ॥ चाल ॥ रथ-चक्र मोडलें जरि ग ॥ कर घालुनि दृढ मी धरिं ग सावरिला रणकदरिं ग ॥ युद्ध अटपता अवलोकी नृप चकित मनीं होउनी ॥ प्राणप्रिये मम प्राण रक्षिले इच्छित घे मागुनी ॥

दासि मंथरा० ॥२॥ मांस-अहारा सिंहबालका घालुनि जो रक्षितो ॥ रात्रंदिन परि जतन करी त्या कधिं न कधीं भाक्षि तो ॥ बाळ नव्हे काळ समज तूं राम राजिवाक्ष तो ॥ मधुर मधुर तुजसवें बोलुनी राज्य कार्य लक्षितो ॥ ज्येष्ठ-सवति-सुत राज्यिं बैसतां होय श्रेष्ठ पक्ष तो ॥ वृद्ध पतीच्या मागें तुझा कोण सांग रक्षितो ॥ **चाल** ॥ म्हणे दासि ऐक तूं जरा ग ॥ येईल नृपति मंदिरा ग ॥ घे मागुन मागील वरा ग ॥ प्रथम वरानें धाडिं रघुविरा वल्कल वेष्टुन वनीं ॥ दुज्या वरानें तुझा भरत ग बसवीं सिंहासनीं ॥ दासि० ॥ ३ ॥ आधिंच मर्कट तशांत मदिरारस ओतुनिया मुखीं ॥ त्यांत मंथरा दंश करी त्या कैकयिसी वृश्चिकी ॥ भरी युक्ति योजिली म्हणुनियां आलिंगी प्रिय-सखी ॥ रत्न-हार तो काढुनि घाली कंठिं तिच्या कौतुकी ॥ विकल्प शिरला कैकयि-हृदयीं बनलि खाण-पातकी ॥ दु:संगतिनें मारुनि पतिला करिं आपुला घात कीं ॥ **चाल** ॥ अपवाद जगीं जोडिला ग ॥ सौभाग्य–चुडा फोडिला ग ॥ श्रीराम वना धाडिला ग ॥ अन्य रूप मम-हृदयिं नसावें श्रीरामावाचुनी ॥ सत्संगति ही मागे कृष्णा नित्य मनापासुनी ॥ दासि० ॥ ४ ॥

---

## गाणें ४० वें.

[ चाल––उद्धवा शांतवन० ]

कौसल्या विनवि श्रीरामा नको जाऊं वनवासातें ॥ ध्रु० ॥ काननीं न मिळे बाळा उष्णोदक तुज स्नानातें ॥ मुक्तहार सांडुनि कैसे रुद्राक्षा धरिसि गळ्यातें ॥ चंदनउटि त्यागुनि रामा लाविसी भस्म अंगातें ॥ **चाल** ॥ वल्कलें कठिन नेसोनी ॥ हा रत्नमुकुट त्यागोनी ॥ शिरिं जटाभार अवळोनी ॥ अनवाणी जासि वनातें ॥

॥ कौ० ॥ १ ॥ पाळिलें वचन सवतीचें मी माता तुज नच वाटे ॥ सापत्न खरी मानुनिया कानना जासी नेटें ॥ सुकुमारा जनकजा-माता कोमल पदिं मोडति काटे ॥ चाल ॥ ह्मणे मंद वाहें समीरा ॥ दे अमृत रामा चंद्रा ॥ दृष्टिचा बाधि करिं दोरा ॥ औषधी देत सागातें ॥ कौ० ॥ २ ॥ लागतां तृषा श्रीरामा जल आणुनि गंगे देई ॥ बहु क्षुधित राम जरि भूमी फलभारें सुशोभित होई ॥ तव वंशीं जन्म रामाचा चंडाशू तप्त न राहीं ॥ चाल ॥ हे वत्स धेनु हंबरते ॥ ही पक्षिण किलबिल करिते ॥ पाडसा हरणि मोकलिते ॥ आलि मूर्च्छा कौसल्येतें ॥ कौ० ॥ ३ ॥ जुपितां वारु सूमतें जन सकलहि फोडित हाका ॥ बंधूसह रथिं बैसुनिया रघुनंदन प्रार्थी लोका ॥ गुरुचरण वंदुनी विनवी सांभाळा जननी-जनका ॥ चाल ॥ शरणा-गत कृष्णाबाई ॥ वाहते भवजल डोहीं ॥ श्रीरामा तारूं होईं ॥ ने सत्वर पैल तिरातें ॥ कौ० ॥ ४ ॥

---

## गाणें ४१ वें.

[ चाल—हरि माझ्या म० ]

दुष्ट ही कैकेयी कारण झाली गोवूनी पतिवचना ॥ बाइ माझा रघुवीर जातो वना ॥ रघुवीर जातो वना, आज माझा रघु० ॥ ॥ ध्रु० ॥ १ ॥ भरजरी पीतांबर सोडुन ती ॥ काढूनी घे भूषणां ॥ ॥ बाइ० ॥ २ ॥ सर्वांगासी चर्चुनी विभुती ॥ चंदनउटि लावीना ॥ ॥ बाइ० ॥ ३ जनकसुतेसी रथिं बैसवितो ॥ संगें घे लक्ष्मणा ॥ ॥ बाइ० ॥ ४ ॥ साखर केशर घालुनि आता देऊं मी दूध कुणा॥ ॥ बाइ० ॥ ५ ॥ या भवडोहीं दुःखित कृष्णा ॥ सोडवीं रघुनं-दना ॥ बाइ० ॥ ६ ॥

---

## गाणें ४२ वें.

[ चाल-मधुर किती कुसु० ]

सकुमार वनीं धाडु नको श्रीराम ॥ ध्रु० ॥ पृथ्वि-पती मीं स्त्री-लोभानें घालविला भगवान ॥ स० ॥ १ ॥ सतत तुझ्या गे लाविन सेवे, देईं मला जिवदान ॥ स० ॥ २ ॥ राज्यीं स्थापिन भरत तुझा गे, घे रामाची आण ॥ स० ॥ ३ ॥ भरजरि पीतांबर सोडुनिया, करिं वल्कल परिधान ॥ स० ॥४॥ राम लक्ष्मण रथिं बैसवुनिया, जनक-सुता गुणवान ॥स०॥५॥ खचित खरी तूं निर्दय कैकई, केवळ पातकखाण ॥ स० ॥ वेष्टिलि कृष्णा षट् शत्रूंनीं, पाहुं नको निर्वाण ॥ स० ॥ ७ ॥

---

## गाणें ४३ वें.

[ चाल-घेऊन ये पखा० ]

कौसल्या विनवि जना ॥ झणीं घेऊन या रामा ॥ ध्रु० ॥ दूध कुणा देवूं ॥ गध कुणा लावूं ॥ कवणातें मी भरवूं ॥ मन्मनविश्रामा॥ ॥ कौ० ॥ १ ॥ मधुर सुवासाचें उदक तुला कैचें ॥ मोडति रे बाभळिचे कंटक पदपद्मा ॥ कौ० ॥ २ ॥ किरिट काय केला, वल्कलें कां तुजला ॥ कैकईच्या वचनाला पाळिसि घनशामा ॥ ॥ कौ० ॥ ३ ॥ रथ धाडुन त्याला, आणवा मम बाळा ॥ कृष्णे-च्या मनिं बसला रामनाम प्रेमा ॥ कौ० ॥ ४ ॥

---

## गाणें ४४ वें.

[ चाल-घेऊन ये पखा० ]

घ्या, घ्या, घ्या, घ्या, घ्या, घ्या, झणी ॥ रामनामघुटका ॥ ध्रु० वारिल भव वेथा ॥ वारिल निज चिंता ॥ दंडिल हा सूर्यसुता ॥

करिल तुमचि सुटका ॥ ध्या० ॥ १ ॥ रक्षिल भक्तासी, दंडिल दुष्टासी ॥ दवडुं नका काळासी, फुकट एक घटिका ॥ ध्या० ॥ २ ॥ नामामृत आधीं पिउनि हरलि व्याधी ॥ कृष्णेच्या हृदयिं कधीं, भाव नसे लटिका ॥ ध्या० ॥ ३ ॥

---

## गाणें ४५ वें.

[ चाल–राम भजावा राम० ]

रामनाम बहु गार मनूजा रामनाम बहु गार ॥ ध्रु० ॥ अगणित पापें करुनी वाल्मिक नामें झाला पार ॥ मनूजा ॥ राम० ॥ १ ॥ अंतीं स्मरता अजामीळ तो होउनि गेला स्वार मनूजा ॥ राम ॥२॥ चंद्रमौलिनें ग्रंथ वांटिला कठीं धरिलें सार ॥ मनूजा ॥ राम० ॥३॥ नामप्रतापें हनुमतानें केला वनिं संहार ॥ मनूजा ॥ राम० ॥ ४ ॥ रामनाम पी मधुर सुधारस दे सोडुन संसार ॥ राम० ॥ ५ ॥ गुरुचरणांबुजिं रत दिन-रजनीं नमिते कृष्णा नार ॥ मनूजा ॥ राम० ॥ ६ ॥

---

## गाणें ४६ वें.

[ चाल–धाडुनि दिधलें दासी सह मीं० ]

कीर्तनीं स्मरणीं अर्चनीं भावें रघुवीरा भजें ॥ध्रु०॥ क्षणभंगुर तनू क्षणिक ॥ सुखीं ह्या, भुलुनि म्हणसि का माझें माझें ॥ रघु० ॥१॥ बुडसी वृथा का भवसागरिं ह्या, धन सुत स्त्रीचें वाहसी ओझें ॥ ॥ रघु० ॥ २ ॥ बघुनि अशा ह्या श्यामस्वरूपा, तन मन अर्पुनी चरणीं लागें ॥ रघु० ॥ ३ ॥ हलाहल शीतल झालें शिवाचें, कंठीं भूषण सुंदर साजे ॥ रघु० ॥ गुरुपदीं भावें शिर वाहुनि हें, कृष्णा रामा नामीं गाजे ॥ रघु० ॥ ५ ॥

---

## गाणें ४७ वें.

[ चाल——राम नाम बहु० ]

राम-पदीं धरिं आस मनूजा ॥ रा० ॥ ध्रु० ॥ क्षणभंगुर हीं धन-सुत-दारा मोहुन पाडिती खास ॥ मनुजा ॥ रा० ॥ १ ॥ पंच विषय षट् शत्रु जिंकुनी चुकवीं अपुला त्रास ॥ मनूजा ॥ ॥ राम० ॥ २ ॥ प्रभु निज भक्ता सांभाळी तो बांधुनिया दृढ कास ॥ मनूजा ॥ राम० ॥ ३ ॥ सद्गुरुवाक्यें मार्ग शोधुनी ब्रह्म-पुरीं कर वास ॥ मनूजा ॥ राम० ॥ ४ ॥ ध्वज—वज्रांकुश—चाप-शरकरा नमिते कृष्णा त्यास ॥ मनूजा ॥ राम० ॥ ५ ॥

---

## गाणें ४८ वें.

[ चाल—सुंदरी चालते० ]

सदोदित रामपदीं राहीं ॥ राम पदीं राहीं ॥ नरा तू रामपदीं राहीं ॥ ध्रु० ॥ व्यासमुखींचे भागवतामृत प्राशुनिया पाहीं ॥ नरा तूं, प्रा० ॥ १ ॥ वाल्मिकि-मुखिंचा ग्रंथतरू हा मधुर फळें खाई ॥ ॥ नरा तू म० ॥ स० ॥ २ ॥ भक्तासाठीं रूपें धरितो, शरण तया जाई ॥ नरा तू श० ॥ स० ॥ ३ ॥ श्रीरामाच्या रूपीं रमली ही कृष्णाबाई ॥ सदो० ॥ ४ ॥

---

## गाणें ४९ वें.

[ चाल—अता राम पाही० ]

खरें सौख्य सांगे मला रामराया ॥ दूर शंका करीं प्राणसखया ॥ ध्रु० ॥ सगुण मूर्ती भजूं निर्गुणातें पुजूं ॥ कवण कार्या रिजवुं नष्ट काया ॥ खरें० ॥ १ ॥ तीव्र तप आचरूं, दान धर्मा करूं ॥ तीर्थ यात्रा फिरूं सौख्य पाहया ॥ खरें० ॥ २ ॥ कलियुगीं ना

दिसे, साधुसंताहि असे ॥ मन हें भीतसे शरण जाया ॥ खरें० ॥ ॥ ३ ॥ भाव-भक्ती धरीं, नाम-जप अंतरीं ॥ आनंदातें वरीं भक्त राया ॥ खरें० ॥ ४ ॥ शाम हे सुदरा जानकीच्या वरा ॥ बैस कृष्णांतरा याचि समया ॥ खरें० ॥ ५ ॥

---

## गाणें ५० वें.

[ चाल—विरहिणी राग मनांतिल सोडा० ]

घडि घडीं रघुवीर दिसतो मला ॥ रघुवीर दिसतो मला ॥ ॥ घडि० ॥ ध्रु० ॥ उठता बसता गृह-कृत्य करिता ॥ सोडीना बाई मला ॥ घडि० ॥ १ ॥ आसनीं शयनीं भोजनीं पानी ॥ करिं चापबाण धरिला ॥ घडि० ॥ २ ॥ शामसुंदर मदनमनोहर ॥ पर्णूनी जानकीला ॥ घडि० ॥ ३ ॥ चरण-रजाचा अघटित महिमा ॥ उद्धरी अहिल्येला ॥ घडि० ॥ ४ ॥ शबर-सुतेसी पावन केली ॥ भक्षूनी बदरीफला ॥ घडि० ॥ ५ ॥ दशरथनंदना प्रार्थिते कृष्णा ॥ धरूनी पदकमला ॥ घडि० ॥ ६ ॥

---

## गाणें ५१ वें.

[ चाल—जाऊ कामाला० ]

ये धांवत रामा ॥ वसें मम हृदयीं विश्रामा ॥ शरयू तिरिं तव वास निरंतर अयोध्या ग्रामा ॥ ध्वज वज्रांकुश चाप शर करीं, सन्मुख बलभीमा ॥ वसें० ॥ १ ॥ कौसल्यासुत, दशरथतनया ॥ करिं पावन आम्हा ॥ त्रिवर्ग बंधू सन्निध असती श्री मेघश्यामा ॥ ॥ वसें० ॥ २ किरिट कुंडलें कौस्तुभ साजे शिव घे तव नामा ॥ विशाळ भाळीं तिलक कस्तुरी, शोभे सुखधामा ॥ वसें० ॥ ३ ॥

रूप साजिरें, ध्यान गोजिरें मम अंतर्यामा ॥ सतत वसों दे, म्हणते कृष्णा नित्य जडो प्रेमा ॥ ४ ॥

---

## गाणें ५२ वें.

[ चाल—मम लालस क० ]

रामनाम भजन करीं सतत मानवा ॥ स० क० ॥ ध्रु० ॥ एकबाणि तो प्रभु, एकवचनि तो ॥ एकपत्नि राघवेश स्मर त्यजीं भवा ॥ भजन० ॥ १ ॥ तारिली शिळा करी पुनित शबरिला ॥ मारुनिया ताटिकेस अभय दे जिवा ॥ भजन० ॥ २ ॥ दासमारुती प्रभू वालि मर्दिती ॥ किष्किंधे स्थापितसे शीघ्र सूग्रिवा ॥ भजन० ॥ ॥ ३ ॥ दशमुखासही प्रभू मारि अहि मही ॥ बिभिषणास लंकापुरिं स्थापि तेधवा ॥ भजन० ॥ ४ ॥ रूप साजिरें प्रभू ध्यान गोजिरें ॥ हे रामा कृष्णांतरिं बैस येधवा ॥ ५ ॥

---

## गाणें ५३ वें.

[ चाल—धाव धाव धाव अता० ]

तुज कृष्णे अर्घि नमितें शांतवाहिनी ॥ गुणसरिते भवहरिते पापनाशिनी ॥ तुज० ॥ ध्रु० ॥ स्नान तुझ्या जळिं करितें ॥ ध्यान तुझें मनिं धरितें ॥ षड्विकार ह्मणिं हरिं ते त्रिगुण त्यागुनी ॥ ॥ तुज० ॥ १ ॥ पाहुनि तव वेग रूप ॥ हरिले मम त्रिविध ताप ॥ चुकलि जनन मरण खेप ॥ भासतें मनी ॥ तुज० ॥ २ ॥ कुणि जाती इंद्रपदी ॥ कुणि म्हणति मोक्ष अधीं ॥ साधुं शीघ्र स्नान -विधि ॥ करुनिया क्षणीं ॥ तुज० ॥ ३ ॥ मंत्र—क्रिया—भक्तिहीन ॥ करुं कैसें तव मि ध्यान ॥ म्हणे कृष्णा देइ ज्ञान ॥ जननि मज ह्मणीं ॥ तुज० ॥ ४ ॥

---

## गाणें ५४ वें.

[ चाल—विप्र योजिलें पाडव आणिले सभेसि जावोनी० ]

गायत्री, सावित्रि, सरस्वति तारिं तारिं मजला ॥ ये संध्या देवी धरितें पदकमला ॥ गायत्री० ॥ ध्रु० ॥ अरुणोदयिं रवि मंडाळिं बाला असपि लालरंगी ॥ हंसवाहिनी चतुर्भुजा तू तिलक लालरंगी ॥ लाल पिताबर लाल अभरणें उटी लालरंगी अधिष्ठान तव भूर्लोकासी मुकुट लालरंगी ॥ दंड कमडलु करिं रुद्राक्षमाळ लालरंगी ॥ ब्रह्म देवतेला, जप ऋग्वेदाला ॥ गायत्री० ॥ १ ॥ माध्यान्हीसी रवी तरुण तूं शुभ्र अंग सारें ॥ प्रति वदनासी त्रिनेत्र असती चतुराननधारे ॥ रुद्र देवता यजुर्वेद जप करिसी अति अदरें ॥ शुभ्र वृषभवाहनीं बैससी कटी शुभ्र चीरें ॥ दिसमि सुशोभित शुभ्र लेपनीं शुभ्र अलंकारें ॥ भुवर्लोकिं राहसी शोभतें चंद्रबिंब गोरें ॥ भाळिं तुझ्या तें, मतुर्भुजे मम चुकवीं भव फेरे ॥ खट्वांग त्रिशूला खड्ग डमरु धरिला ॥ गायत्री० ॥ २ ॥ सायकाळी रविसह वृद्धा सर्वांगीं श्यामा ॥ श्याम अभरणें, श्याम पिताबर, सरस्वती नामा ॥ प्रसिद्ध असमी शंख चक्र आणि धरिसि गदा पद्मा ॥ विष्णुदेवते गरुडवाहनी पूर्ण करीं कामा ॥ सामवेद जप अधिष्ठान तव स्वर्लोकी धामा ॥ चाल ॥ लाविं श्याम उटिला ॥ हरिं मम त्रिगुणाला ॥ गायत्री० ॥ ३ ॥ ह्या संध्येचें ध्यान करीता सर्व पाप जाई ॥ त्रिकाल इजला जपतो नर जो पूर्णकाम होई ॥ ह्या देवीतें प्रसन्न करिता ज्ञान तया येई ॥ यास्तव प्रसिद्ध गीतसरोवरिं केलें लवलाही ॥ इजसि वर्णितां शेष वेद अणि शास्त्रें शिणलीं ही ॥ तेथें मदमती ही कृष्णा गुण कैसे गाई ॥ परि अवचित गुरुनें ध्यानबोध केला गायत्री० ॥ ४ ॥

## गाणें ५५ वें.

[ चाल—ये धावत म ल बिठावाई० ]

हे मंगलगौरी माते दे अखंड सौभाग्यातें ॥ ध्रु० ॥ मम तनुचा मंडप करुनी ॥ आत सिंहासन षट्कोनी ॥ चहुं मुक्ति कदलि उभवोनी ॥ बैसवुनी माय भवानी ॥ छत तोरण झालर वरुनी ॥ शोभते ज्ञान दीपानीं ॥ **चाल** ॥ केर काम क्रोध झाडोनी ॥ भक्ति रंगवल्लि काढोनी ॥ उपचार पुढें मांडोनी ॥ ठेविले सकळ पुजनातें ॥ हे मग० ॥ १ ॥ ह्या श्रावण मंगळवारीं ॥ जमविल्या नगरिंच्या नारी ॥ ही षोडश परिची पत्नी ॥ घेऊनि सकल उपचारीं ह्या सौभाग्यालंकारी ॥ पूजिते त्रिपुरसुंदरी ॥ **चाल** ॥ करिं घेऊन कर्पुरारती ॥ मीं ज्ञान उजळिल्या वाती ॥ पुष्पांजलि घेउनि हातीं ॥ प्रार्थना हीच शिवकांते ॥ हे मंग० ॥ २ ॥ पैठणी नेसली पिवळी आरक्त अंगिं काचोळी ॥ मंगळसूत्र गरसोळी ॥ लाल कुंकू शोभत भाळीं ॥ नथ बुगड्या भोकर बाळी ॥ कंकणें हातामधिं काळी ॥ **चाल** ॥ नग गोंडे फुलांची वेणी ॥ सरि साज पोत तन्मणी ॥ रुणझुणती नेपुर चरणीं ॥ करि भक्तमनोरथ पुरते ॥ हे मंग० ॥ ॥ ३ ॥ त्या राजसुतेसम द्यावा ॥ वर, सौभाग्याचा ठेवा ॥ मम कुळीं सतत असावा ॥ भवरोग गृहातुनि जावा ॥ मागतें बालस्वभावा ॥ तव गुणानुवाद मिं गावा ॥ **चाल** ॥ ही क्षणिक अशाश्वत काया ॥ हें जाणून अंबूतनया ॥ शिवकाते लागत पाया ॥ दे च्छित कृष्णेतें ॥ हे मंग० ॥ ४ ॥

## गाणें ५६ वें.

[ चाल—वदू शाश्वत० ]

मागू शाश्वत सौभाग्याप्रति गौरीला ॥ उजळूं पंचारति तिजला ॥

॥ ध्रु० ॥ जमुं सगळ्याजणि एक स्थळीं ॥ सात्विक वृत्ती आणुन चित्तीं आसनिं करूं स्थित ॥ मा० ॥ १ ॥ श्रावण मंगळवारिं हिला घालूं स्नाना भरजरि वसना ॥ कंचुकि मौक्तिक ॥ मा० ॥ ॥ २ ॥ पंचामृतें तें पुजन करूं ॥ कुंकुम-अभिरा शेंदुर-बुका ॥ वाहूं अक्षत ॥ मा० ॥ ३ ॥ नेत्रीं अंजन घालुं अधीं ॥ कंठीं भूषण हातीं कंकण ॥ नासीकीं नथ ॥ मागूं० ॥ ४ ॥ षोडशपरिची पत्रि अणूं ॥ खाज्या करंज्या ॥ जिलब्या ताज्या ॥ नैवेद्यप्रति ॥ मा० ॥ ५ ॥ जन्मांतरिंचें दुःख हरी ॥ जाऊं शरणा ॥ दृढ धरूं चरणा ॥ कृष्णेसमवेत ॥ मा० ॥ ६ ॥

## गाणें ५७ वें.

[ चाल—ये धावत माथ विठाई० ]

शुक्र अश्विन अष्टमिरात्रीं ॥ धाडितें मना करवीरीं ॥ त्यासगें सिंधुकुमारी ॥ मम सदना ये लौकरी ॥ तव उत्सव करिन मि भारी ॥ नव विधा भक्ति उपचारी ॥ चाल ॥ ही षोडश परिची पत्री ॥ हा तंतू षोडशपदरी ॥ घालूनि स्नान अति अदरीं ॥ नैवेद्य षड्रसा दावी ॥ श्रीमहालक्ष्मि देवी ॥ मज सौख्यानदा दावी ॥ ॥ ध्रु० ॥ १ ॥ कर्पूर उजळितें अरती ॥ ज्या ज्ञान लाविल्या वाती पुष्पांजळि घेऊन हातीं ॥ प्रार्थना ऐक मम पुरती ॥ चाल ॥ तुज-जवळि घंटा फुंकोनी ॥ चौप्रहर रात्रि क्रमवोनी ॥ तोषवितें तुजला जननी ॥ मम इच्छा त्वा पुरवावी ॥ श्री० ॥ २ ॥ रुणझुणती नेपुर चरणीं ॥ शोभते लाल पैठणी ॥ जरिकाठि चोळि घालोनी ॥ रत्नज-डित फुलाची वेणी ॥ तनु शोभवि शृंगारानीं ॥ इंदिरा हरी मनरमणी ॥ चाल ॥ तूं होसि प्रथम कुमारी ॥ युवती ही दुसऱ्या प्रहरीं ॥ तिसऱ्यांत वृद्ध हो नारी ॥ चवथ्यात करविरी जावी ॥

॥ श्री० ॥ ३ ॥ तूं पतितपावनी माते ॥ किति वर्णू तव ध्यानातें ॥ परि आपुल्या उद्धारातें ॥ तव गुणानुवाद मि गातें ॥ मज तारिं तारिं दीनातें ॥ धरिं कवटाळुनि बाळातें ॥ चाल ॥ करिं सकळ स्त्रियां सौभाग्या ॥ दे सतत तथा आरोग्या ॥ तव गीत गात वैराग्या ॥ पदिं तुझिया कृष्णा वसवीं ॥ श्री० ॥ ४ ॥

## गाणें ५८ वें.

[ चाल—धाव धाव बा अनाथ बंधू० ]

चला सख्यांनो, करविर क्षेत्रीं जगदंबा पाहूं ॥ जग० ॥ हळदी कुंकूं ताटिं भरोनी आनंदें वाहूं ॥ ध्रु० ॥ प्रातःकाळीं काकडारती॥ असंख्य जनदाटी ॥ असंख्य० ॥ नारिनरांचीं अंगें अदळती ॥ शंखजळासाठीं ॥ दहीं दूध घृत मधू शर्करा पंचामृत वाटी ॥ पंचा० ॥ उष्णोदक बहु सुगंध उटणीं ये स्नानासाठीं ॥ वाद्य वाजती नौबत कर्णा चौघडा थाटी ॥ चौ० ॥ पक्वान्नाचे नैवेद्य करुनी आणिती जन ताटीं ॥ स्नान अटपता पडदा वर करा अदिमाया पाहूं ॥ अदि० ॥ अंत पार हा न कळे मजला कवणें परि गाऊं ॥ चाल ॥ ॥ १ ॥ लाल पैठणी नेसुन ल्याली कंचूकी अंगा ॥ कंचूकी० ॥ नेत्रीं अंजन कुंकुम मळवट भरिं शेंदूर भांगा ॥ केशरकस्तुरि चंदन मिश्रित सुगंध सर्वांगा ॥ सु० ॥ कुसुमहार तो गळा घालुनी शोभे धवलांगा ॥ सागरतनया श्रीविष्णूचे त्यागुनि अर्धांगा ॥ त्यागु० ॥ दीन अनाथा उद्धारास्तव आली असे वेगा ॥ लक्ष चौऱ्याशि योनि हिंडुनी किति तरि जिव श्रमवूं ॥ कि० ॥ पुरे पुरे या प्रपंचलाटा कवणे परि साहूं ॥ चला० ॥ २ ॥ वेणि शेषसम गोंडेफुलांची पाठिवरी लोळे ॥ पाठि० ॥ बिंदि बिजवरा काप बुगड्या नथ नाकीं डोले ॥ मंगळसूत्र तन्मणि लफ्फा पुतळ्या कारलें ॥ पुत० ॥ चंद्र-

हार सरि झगझग चमके कटिं पट्टा अंवळे ॥ गोठ पाटल्या छंद बागड्या पुढें ताशिव तोडे ॥ पुढें० ॥ दंडीं वाकी बाजुबंदाचे लोंबति लाल गोंडे ॥ कृष्णेच्या करिं ज्ञानकाकडा उजळुनिया पाहूं ॥ ॥उ०॥ मम कुलदैवत श्री जगदंबा पदकमलीं राहूं ॥ चला० ॥३॥

## गाणें ५९ वें.

[ चाल—सागतें पुढे हा विचार० ]

कोण श्रेष्ठ परीक्षूं मनिं म्हणती भृगुमुनी ॥ जाति कैलासासी शिव ते सिंहासनीं ॥ धरि वामाकावरि, सुहिमाचलनंदिनी ॥ भृगु जाता तेथें झालि मानखंडणी ॥ हा तामसि यातें ज्ञान नसे अंतरीं ॥ का टाकुनि पतिला आलिस कोल्हापुरीं ॥ दे दर्शन अंबे धाव पाव झडकरी ॥ कां० ॥१॥ तो सृष्टीकर्ता रचनेमधें गुंगला ॥ कोण सदनीं आला भान नसे त्याजला ॥ मुनि जातां त्याचा मान नसे राखिला ॥ भाजनें बडवितो ज्ञान नसे याजला ॥ जावें वैकुंठासी पाहूं त्याची कला ॥ रत्नजडित मंचकीं शेषशयन नीजला ॥ ती सिंधुतनया कोमल चरणा चुरी ॥ का० ॥ २ ॥ विधितात असा तो अनंत शय्येवरी ॥ पाहुन भृगुनें लाथ मारिली उरीं ॥ इंदिरारमण तो धाउनि चरणा धरी ॥ मी विषयसुखाच्या निजलों शेजेवरी ॥ मम हृदय कठिण किति कासवपृष्ठापरी ॥ श्रम झाले मुनीला लाथ मारिता उरीं ॥ म्हणे लक्ष्मी आणीं घृत जाउनि झडकरी ॥ तूं वामचरण चुर दक्षिण चोळिति हरी ॥ दे० ॥ ३ ॥ पाहूनि लक्ष्मी सतापे अंतरीं ॥ नको संगत तुमची जातें मी करविरीं ॥ दास्यत्व निरंतर करित असा तुह्मी हरी ॥ नाहीं लाज तुह्माला काय म्हणावें तरी ॥ परब्रह्म अहां तुह्मि लाथ मारितो उरीं ॥ त्या ब्राह्मणअधमा नसे दया अंतरीं ॥ आजपासुन त्याच्या रहात

नाहिं मी घरीं ॥ कां० ४ ॥ चहुं वर्णांमाजीं श्रेष्ठ विप्र मानिले ॥ विधिधांवा ऐकुनि चहु वेदा रक्षिलें ॥ त्या गजेंद्राचें ब्रीद मिं सांभाळिलें ॥ त्या अंबरिषाचे गर्भवास चुकविले ॥ त्या प्रल्हादाला संकटिं म्या पाळिलें ॥ तें ध्रुव बालक मीं अढळ पदी बसविलें ॥ त्या सुदामजीला दिधली कांचनपुरी ॥ का० ॥ ५ ॥ पतिवाक्य ऐकुनि अंबा नमि पाउलें ॥ करविरा येउनी सिंहासन स्थापिलें ॥ चिर कंचुकि नेसुनि मुकुट कार्णी कुंडलें ॥ मणि मंगळसूत्र भाळिं कुंकुं शोभलें ॥ करिं कंकण घालुनि नूपुर चरणीं भले ॥ तें रूप पाहुनी मन माझें गुगलें ॥ शेजारति ध्याया नित्य येति श्री हरी ॥ कां० ॥ ६ ॥ ज्ञान पोत घेउनी नाचत कृष्णा सती ॥ स्वानंदमंडपीं गोंधळही घालिती ॥ झोटिंग काम हा गाजितसे दुर्मती ॥ भवताप निवारुनि देइ मला सुमती ॥ श्री भागवतामध्यें व्यास कथा वर्णिती ॥ अभिमन्युसुतासी शुक प्रेमें सांगती ॥ महाकाली महालक्ष्मि सरस्वती ॥ हे अनाथनाथे तारिं तारिं मजप्रती ॥ हे जगज्जननि तूं ठेविं अभय कर शिरीं ॥ का० ॥ ७ ॥

## गाणें ६० वें.

[ चाल—हरि कृष्ण नाम० ]

आरती हरितालिके ॥ करितों तुजला अम्हि अंबिके ॥ ध्रु० ॥ या रत्न ताटीं ह्या ज्ञानवाती ॥ उजळुनी तुजला करुं पंचारती ॥ नच घालीं मज मृत्यूमुखें ॥ चुकविं चौऱ्याशीं मम जन्मदु खें ॥ ॥ आर० ॥ १ ॥ देई आम्हा तूं सतत सौभाग्या ॥ सतत सपत दे आरोग्या ॥ साचित जाळीं पातकें ॥ हे गौरी आमुची विनवणी ऐकें ॥ ॥ आर० ॥ २ ॥ नच मत्र येती नच क्रिया शक्ति ॥ परि माझी आहे अति अल्प भक्ती ॥ का माता टाकी बालकें ॥ वेडींविद्रीं

असलीं तरि राखे ॥ आर० ॥ ३ ॥ न्हाऊनी माखुनी शृंगार केला पिवळा पीतांबर नेसवुं तुजला ॥ कुसुमेंही भरलीं तवकें म्हणे कृष्णा हो तुष्ट भक्ततारिके ॥ आर० ॥ ४ ॥

---

## गाणें ६१ वें.

[ चाल ---तुम्ही थोराचे आहां० ]

सांगा शंकर मी अर्धांगीं कवण्या सुकृतें हो बसलें ॥ सां० ॥ ॥ ध्रु० स्मशान-वासी सर्वांगासी चर्चुनि विभुती शिरिं गंगा ॥ सुहास्य वदनें पुसते गिरिजा बसुनि शिवाच्या अर्धांगा ॥ सा० ॥ ॥ १ ॥ प्राणवल्लभे हिमनगदुहिते पितया सदनीं तूं असतां ॥ ब्रह्मसुताच्या आज्ञें वर तुज विष्णु योग्य दिसे हिमवंता ॥ सा० ॥ २ ॥ प्राणप्रिये तूं वचन पित्याचें ऐकुनि होसी कोपी मनीं ॥ एक शंकरावांचुनि जगतीं नर तुजसमान जाण मनीं ॥ सा० ॥ ३ ॥ सखिसदनासी लगबग जासी घेउनि तिजला वनिं निघसी ॥ घोर विपीनीं रजनीमाजीं रिस-व्याघ्रांसी नच भीसी ॥ सा० ॥ ४ ॥ मास भाद्रपद शुक्ल तृतीया पूजिसि मजला प्रेमभरें ॥ अर्कपत्र त्वां भक्षण करुनी जागर गायन मधुर स्वरें ॥ सा० ॥ ५ ॥ उपोषीत तुं सखिसह असती करिसि पारणा द्वितिय दिनीं ॥ भावार्थातें भुलुनि तुझ्या मी आलों तापसि होवूनी ॥ सा० ॥ ६ ॥ गज चर्मांबर पायिं खडावा दंड कमंडलु घेउनिया ॥ प्रसन्न आलों तुज नगतनये मागें इच्छित या समया ॥ सा० ॥ ७ ॥ जरि मज देसी इच्छित वर तू भोला त्रिंबक पति देईं ॥ असत्य वाणी होईल जरि ही त्यागिन प्राणा या ठायीं ॥ सा० ॥ ८ ॥ अस्तु तथास्तु पुरेल मनोरथ न करीं चिंता मृगनयने ॥ स्वस्थानातें शंकर गेला हिमनग शोधितसे विपिनें ॥ सा० ॥ ९ ॥ गिरी कंदरीं पुरीं पट्टणीं शोधुनि

नगपति मनिं विवळे ॥ आम्रतरूतळिं सखिसह निद्रा करितां दे-
खिलि हिमाचलें ॥ सां० ॥ १० ॥ सद्गद कंठें धाउनि गिरिपति
धरि अंकावरी आलिंगी ॥ कवण्या कार्यें आलिस येथें गांजियेलें
कुणिं कथिं वेगीं ॥ सा० ॥ ११ ॥ हे धरराया पडतें पाया भोळा
शंकर देइं पती ॥ हेतु मनिंचा पूर्ण न होतां त्यागिन प्राणा ह्या
जगतीं ॥ सां० ॥ १२ ॥ बरें म्हणुनिया सखिसह शिबिके घालुनि
आणिलि स्वस्थाना ॥ पाचारुनिया सकल सुरवरा अर्पिलि कन्या
त्रिनयना ॥ सा० ॥ १३ ॥ हरतालिका व्रतप्रतापें मम मानस त्वां गे
हरिलें ॥ तुज त्या योगें वामांकावरि अखंड पार्वति म्यां धरिलें ॥ सा०
॥ १४ ॥ सखिगौरीहर पुजिति नारी, शुक्ल भाद्रपद तृतिय दिनीं ॥
अखंड मिळवुनि सौभाग्यातें अंतीं जातिल शिवसदनीं ॥ सा० ॥
॥ १५ ॥ कर्पुरगौरा चंद्रशेखरा सतत वसावें मम हृदयीं ॥ शिव-
चरणांबुज नमिते कृष्णा, तव गुण गाया मति देईं ॥ सां० ॥ १६ ॥

## गाणें ६२ वें.

[ चाल—सुंदरी काय करीत आहे० ]

श्रियाळ अंगणीं शिव आले ॥ अंगीं भस्म चर्चियलें ॥ व्याघ्र
गजचर्म ओलें ॥ डमरू त्रिशुळा करिं धरिलें ॥ मणिमय आसनीं
शिव पुजिले ॥ इप्सित मागा नृप बोले ॥ हें काय चांगुणे शिर
रक्षियलें ॥ बोलती यति कोपें ॥ ऐकुनि थरथर सति कांपे ॥ ध्रु० १ ॥
मागावें गा यतिराया ॥ ईप्सित देइन या समया ॥ राज्य अथवा मम जाया ॥
अर्पिन मी मत्प्राणा पाया ॥ ह्यांतिल नलगे मज राया ॥ आवडे बालक तव
चिलया ॥ चिरुनी शिजवीं लवलाह्या ॥ क्षुधित मी वाढीं जेवाया ॥
हें काय० ॥ २ ॥ सतिनें बालक करिं धरिला ॥ करकर शिवनामें
चिरिला ॥ मोहें रक्षित शिरकमला ॥ शरिरा शिजवुनि म्हणे य-

तिळा ॥ यावें क्षुधित बहु झाला ॥ माध्यान्हीसी रवि आला ॥ अंत:साक्षी शिव भोळा ॥ जाणे राखिलें मुखकमला ॥ हें काय० ॥ ॥ ३ ॥ जातों जातों नृपनष्टा ॥ हरिलें सत्वा कृतिभ्रष्टा ॥ दंत खावुनिया ओष्ठा ॥ क्रोधें बोले शिव द्रष्टा ॥ कळलें कृत्रिम पापिष्ठा ॥ कैसें रक्षिसि शिर नष्टा ॥ दवडिसी लौकिक तूं मोठा ॥ शिजवुनि शरिरातें दुष्टा ॥ पसरलि सत्कीर्ती राष्ट्रा ॥ म्हणुनी आलों गर्विष्ठा ॥ केला मोक्षपदीं तोटा ॥ भोगीं यमपुरीचा वाटा ॥ हें काय० ॥ ४ ॥ थाबा थाबा महाराजा ॥ धावे चांगुणा-राजा ॥ नेणत अपराध माझा ॥ घडला जोडितसे भूजा ॥ आणिलें शिर ने दरवाजा ॥ द्यावी आज्ञा मज काजा ॥ दोघें मस्तक तुह्मि ध्या जा ॥ काढुनि सुंदर गित गा जा ॥ पचवुनि बालक मग माझा ॥ वाढा तोषेल शिवराजा ॥ हें काय० ॥ ५ ॥ वेगें उखळ आणवीलें ॥ धैर्यें मूसळ करि धरिलें ॥ माया मोहातें त्यजिलें ॥ चिलया बाळा काढियलें ॥ ऐसे यति नच कधिं आले ॥ त्यासी बालक अर्पियलें ॥ धन्य बाळा कुळ केलें ॥ स्वर्गीं शंकर तोषविले ॥ हें काय० ॥ ६ ॥ आम्हा टाकुनिया जासी ॥ बाळा माता परदेशीं ॥ केवळ पापिण राक्षसी ॥ चिरुनी काडितसे तुजसी ॥ जेविता यतिवर देहासी ॥ त्यागुनी येइन तुज-सरसी ॥ थावें थावें जननीसी ॥ ठेवीं जागा कैलासीं ॥ मायिक मातापितयासी ॥ त्यागुनी मोक्षपदीं वससी ॥ हें काय० ॥ ७ ॥ सत्वर वाढीं नृपराया॥ आणिलें पात्र लवलाह्या ॥ बसले शंकर जेवाया ॥ म्हणती यावें तुह्मि उभया ॥ वदते चांगुणा पतिराया ॥ बैसा बालक भक्षाया ॥ त्रिभुवनीं मज-ऐसी माया ॥ नाहीं भक्षितसे चिलया ॥ उठिले शंकर तेथुनिया ॥ जाती स्मरलें त्या समया ॥ हें काय० ॥ ८ ॥ निपुत्र असती नृपनाथा ॥ नलगे भिक्षा मज आता ॥ पडली महिवर ती

काता ॥ बघसी अंत किती आता ॥ संकट हिमनगजामाता ॥ वारीं विघ्नहराताता ॥ सागति यतिवर नृपनाथा ॥ मारीं हाका त्वां सूता ॥ हें काय० ॥ ९ ॥ पाचारी ते सति बाळा ॥ धावें चिलया वेल्हाळा ॥ त्या नगरींचा जन-मेळा ॥ ढाळिती दुःखाश्रू डोळा ॥ बालक मजवरि का रुसला ॥ अतिथ हा तुजसाठीं बसला ॥ ऐकुनि मातावचनाला ॥ चिलया धावतचि आला ॥ वंदुनि यतिवरचरणाला ॥ उधळिती सुरवर सुमनाला ॥ हें काय० ॥ १० ॥ त्यागुन अतिथिवेषाला ॥ दश-भुज पंचानन झाला ॥ धरिलें वामाकीं बाला ॥ दोघें वदिति पदकमला ॥ प्रसन्न झाला शिव भोळा ॥ ईप्सित मागें भूपाळा ॥ मिरवित कैलासी नेला ॥ शिवगणिं शिवपदिं स्थापियला ॥ धन्य धन्य शिव-लीला ॥ चिलया सिंहासनिं बसला ॥ हें काय० ॥ ॥ ११ ॥ लडिवाळ बालक कृष्णेसी ॥ व्हावी स्फूर्ती रसनेसी ॥ मर्कट मन हें विषयासी ॥ भुलतें स्थिर करीं यासी ॥ गाइन शिवगुणलीलेसी ॥ याविणें अन्य नको मजसी ॥ गाती ऐकति कवनासी ॥ ईप्सित फलप्राप्ती त्यासी ॥ हें काय० ॥ १२ ॥

## गाणें ६३ वें.

[ चाल—नदगृहाच्या ज० ]

लावियली कळ देवमुनींनीं ॥ द्युतिं शिव हरिला हैमवतीनें ॥ झाला दिगंबर जात रुसोनी ॥ गिरिजा जात मागें शोधास्तव ॥ ॥ गि० ॥ १ ॥ कोण कोठिल तूं साग सुंदरी, सत्वर मजला गे ॥ पुसे शिव सत्वर मजला गे ॥ ध्रु० ॥ हिमालयीं शिव पाहुन सतिनें ॥ नटली सर्वेहि शृंगारानें ॥ भुलवी शंकर नृत्यकलेनें ॥ उघडी नेत्र वेगें शंकर तो, उ० ॥ कोण० ॥ २ ॥ साग तुझीं मज ताता जननी ॥ कोणाची तूं अससि कामिनी ॥ व्याकुळ केलें मज मदनानें ॥ नच

बोलसि कां गे, सुंदरि तूं नच० कोण० ॥ ३ ॥ नाम खूण कां पुसतां मजला ॥ स्त्री कोठें तुह्मि टाकुनि आलां ॥ शिवुं नका हो मम अंगाला ॥ बोलतसे रजो शिवाप्रति बोल० ॥ कोण० ॥ ४ ॥ पाहुनियां तव मुखकमलातें ॥ लाजुनियां शशी आला येथें ॥ प्रेमें धरिला भाळिं मिं त्यातें ॥ आलिंगन दे गे भिल्लिणि तूं, आलिं० ॥ ॥ कोण० ॥ ५ ॥ कां रे जोगड्या ह्या कातारीं ॥ परागनेसी बोलसि भारी ॥ उग्र पतीची आहें मी नारी ॥ चल सर हो मागें तामसा तूं, चल० ॥ कोण० ॥ ६ ॥ तुझ्या अधिन मी ने सदनासी ॥ ऐकुन गिरिजा धरेत करासी ॥ नेउन पूजी शिव कैलासीं ॥ प्रेमें पदिं लागे कृष्णा ह्मणे, प्रेमें० ॥ कोण० ॥ ७ ॥

---

## गाणें ६४ वें.

[ चाल—पारिजातकानिमित्त आम्ह० ]

गौरि ह्मणे शंकरा चला हो खेळुं आपण या स्थळीं ॥ खेळुं आपण० ॥ म्यां सारीपाट मांडिला तळीं ॥ ब्रह्मपुत्र पातले सहज ते करिं वीणाचिपळी, करिं० ॥ गातसे शंकरनामावळी ॥ परस्परें खेळतां मुनीनें लावुन दिधली कळी, ला० ॥ जाहली उभयतांत दुफळी ॥ ह्या खेळासी रंग न ये हो पण केल्या वांचुनी, पण० ॥ घ्या तुह्मी एकमेकां जिंकुनी ॥ भोळा त्रिंबक कपट बळानें अणिला त्वा जिंकुनी, अणि० ॥ धन्य तूं कुशल उमे कामिनी ॥ ध्रु० ॥ १ ॥ प्रथम डावि जिंकिलें शिवाचें आसन व्याघ्रांबर, आ० ॥ द्वितीया घेत शशी सुंदर ॥ कंथा झोळी त्रिशूळ डमरू हरि गिरिजा चतुर ॥ हरि० ॥ घ्या ह्मणे रुंडमाळ सत्वर ॥ एकामागें एक हिरोनी ह्मणे गिरिजाप्रियकर, ह्म० ॥ हरिन मी नंदी गंगाधर ॥ नाचत नाचत वाजवि चिपळ्या करिं धरुनी उदर, क० ॥ गद्‍गदां हांस-

१६०२

तसे मुनिवर ॥ गौरिमुळें तुज वैभव देवा नच पुसतें रे कुणा, न० ॥ पशु-पती जात वना रमुनी ॥ भोळा० ॥ २ ॥ सर्व संग सोडुनी शिवानें ध्यानिं अणुनिया हरी, ध्या० ॥ हिमालयिं गंगा-धर तप करी ॥ नाथाकारण शैल-कंदरी शोधि वनें वनचरी, ॥ ॥ शो० ॥ पाहिला अकस्मात् माहेरीं ॥ लाल पैठणी नेसुन ल्याली कंचुकि मग भरजरी, कं० ॥ भूपवी तनूतें नानापरी ॥ काजळ कुंकू हळद लावुनी चंदनउटि केशरी, चं० ॥ सुवासें वसंत खेपा करी ॥ पायिं पैंजणें घालुनि नाचत नाचत ये त्या वनीं ॥ ना० ॥ उघडिले नेत्र शिवें त्या क्षणीं ॥ भो० ॥ ३ ॥ नृत्यकला बघावया पातले स्वर्गिचे सुरवर, स्व० ॥ जाहला शिव तो कामातुर ॥ ध्यान विस-रुनी पुढें येवुनि पुसे तिजला शंकर, पु० ॥ कोण तूं सांग मला सत्वर ॥ स्वर्ग-मृत्यु-पाताळिं अशी मीं नाहिं देखिली नार, ना० ॥ असिस तूं गिरिजेहुनि सुंदर ॥ कामशरानें व्याकुळ झाला धरी तिचा पदर, ध० ॥ तामशा झोंबुं नको चल सर ॥ झिडका-रूनी देत शिवाला बोले उमा दुरुनी बो० ॥ उग्र पति शापिल मज पाहुनी ॥ भो० ॥ ४ ॥ भूत पिशाचांमधें हिंडशी मम अंगीं भय भरे, म० ॥ कोण तूं सत्वर मज सांग रे ॥ दाढिशिखा तव शुभ्र जाहली सर्व तरुणता सरे, स० ॥ शोभेना ऐसा मज कांत रे ॥ तूं तर तामसि मी तरि आहें चंद्रकला शांत रे ॥ चं० ॥ जमेना तुज मज एकांत रे ॥ कोठें हरवली प्राणप्रिया त्वा सांग मला या क्षणीं, सा० ॥ का तिनें दिधलें तुज टाकुनी ॥ भो० ॥ ॥ ५ ॥ कैलासीं मी राहें निरंतर श्रेष्ठ सर्व सुरगणीं, श्रे० ॥ एकदा हैमवती घेउनी ॥ द्यूत खेळता हिरुन घेतलें सर्वेहि मज पासुनी, सर्व० ॥ दिगंबर केलें मज त्या क्षणीं ॥ वदन तिचें मज नको पहावया दुष्ट ति दाक्षायणी, दु० ॥ मजला ठाउक मुळ-

पासुनी ॥ तुजविण माझा जीव घाबरा जाउं नको भिल्लिणी, जा० ॥ आलिंगन देइं मला या वनीं ॥ भो० ॥ ६ ॥ तुजासि वरूनी समुळ बुडाली खचितचि नगकन्यका, खचि० ॥ धरिलि तूं गंगा निज मस्तका ॥ नाहिं तुझें रे प्रेम तिजवरी राम करिसि तूं सखा, रा० ॥ भोळि रे भोळि खरी अंबिका ॥ ती तरुणी तूं पुरातनींचा वृद्धचि मदनांतका, वृ० ॥ राहिली भाव धरुनियां निका ॥ मजसम असती जरि कामिन ती ठकविति तुजला ठका, ठ० ॥ लाविती चुना तुझ्या नासिका ॥ हासत नाचत भिल्लिण मुरडी नेत्र नाक त्या क्षणीं, ने० ॥ जातसे शंकर तिज-मागुनी ॥ भो० ॥७॥ पुढें पार्वती मागें शंकर जात तिचा कर धरून, जा० ॥ आणिला कैलासा-प्रति फिरून ॥ बैसवुनी आसनीं पूजिला घालुनि माळा वरून, घा० ॥ हांसते आलिंगन करकरून ॥ गौरिशंकरा देइं सन्मती या भवतापा हरून, या० ॥ गाइन मी शिवलीला रस भरून ॥ धन्य माउली उदर-कमळ तें नउ महिने राहुनी, न० ॥ हो म्हणे सार्थक कृष्णा झणीं ॥ भो० ॥ ८ ॥

## गाणें ६५ वें.

[ चाल—नृपाल कोप० ]

कैलासीं चल मना पाहुं शंकरा ॥ सिंहासनिं विलसत जो वंद्य सुरवरा ॥ ध्रु० ॥ भस्मभूषित सकल तनू शेषभूषणा ॥ शोभतसे सव्य गणू वामिं अंगना ॥ व्याघ्रांबर पांघरले वृषभवाहना ॥ जटिं गंगा वाहसते चंद्रधारणा ॥ चाल ॥ उमाधवा त्यजुन भवा धरिं रे अंतरा, सदा धरिं रे अंतरा ॥ कै० ॥ १ ॥ त्यागिं काम त्यागिं क्रोध त्यागिं वासना ॥ त्यागिं त्रिगुण त्यागिं विषय त्यागिं कामना ॥ कायिक वाचिक मानसीक द्वैत भावना ॥ त्यजुन सांब-चरणकमळिं

लीन हो मना ॥ चाल ॥ कसा वृथा अशाश्वता गुंतसी नरा, सदा गुं० ॥ कै० ॥ २ ॥ भक्त-प्रेम अधिक असे मदन अंतका ॥ काढुनियां आत्मलिंग दिलें दशमुखा ॥ अर्पियली निजकांता माय अंबिका ॥ अशा सांब-चरणिं कृष्णि भाव धरि निका ॥ चाल ॥ नतावरी दया करीं सतत शंकरा, प्रभो सतत० ॥ कै० ॥ ३ ॥

## गाणें ६६ वें.

[ चाल—कवणें तुज गांजियेलें० ]

कां मजवरि केलि तुम्हीं अवकृपा शिवा ॥ भवचक्रीं घालुनियां फिरविलें जिवा ॥ ध्रु० ॥ काय कथूं मम काहणी प्रतिदिनीं तुला ॥ नाहिं सौख्य संसारीं जाच बहु मला ॥ सदय हृदय करुनि राखिं ब्रिदा आपुल्या ॥ मौन धरुनि कौतुक हें बघसि येधवा ॥ कां० ॥ १ ॥ नष्ट अहंकार मना गांजितो अती ॥ दुष्ट वासना हि मला व्यर्थ झोंबती ॥ मायेनें भ्रमत असें तोडिं शीघ्र ती ॥ काम-क्रोध-काक कसे करिति कवकवा ॥ कां० ॥ २ ॥ काहिं कळत सुचत नसे दीन लेंकरा ॥ जननि-जनक तूं मला एक आसरा ॥ पुरविं हट्ट कृष्णेचा बसुनि अंतरा ॥ तव गुणास गावयास साह्य करिं भवा ॥ कां० ॥ ३ ॥

## गाणें ६७ वें.

[ चाल—सांगतें पुढें० ]

जो श्रीकृष्णाचें जन्मवृत्त आइके ॥ होति राखरागुळी जन्मांतर पातकें ॥ दिलि वसुदेवाला देवकि कंसासुरें ॥ देइ दासदासि तो आंदण माणिक हिरे ॥ गजाश्वशाळा सैन्य छत्र चामरें ॥ रथिं बैसुनि आपण नगरिं मिरवि वधुवरें ॥ ध्वनि वाजंत्र्यांचा गगन मंडळीं भरे ॥ हो सावध कंसा नभ-वाणी ऐक रे ॥ ह्या देवकि उदरीं हो-

तिल जीं बालकें ॥ त्यामाजिल अठवा मारिल तुजला निकें ॥ जो श्री० ॥ १ ॥ ही सुरवर-वाणी ऐकुनिया भूपती ॥ कर धरुनि भगिनिचा ओढि रथाखालती ॥ म्हणे वधून टाकिन पापिणिला या क्षितीं ॥ ती दीन होउनी प्रार्थित अपुला पती ॥ मग सरसाउन वसुदेव पुढें बोलती ॥ तूं परिस नृपवरा माझि एक विनती ॥ ह्या देवकि उदरीं होतिल जीं बालकें ॥ तीं अर्पिन सकलहि मानिं वाक्य मम निकें ॥ जो श्री० ॥ २ ॥ कथितार्थ परिसुनी कारागृहिं ठेविली ॥ मग प्रथम देवकी पुत्ररत्न प्रसवली ॥ वसुदेवें आपली सत्य भाक राखिली ॥ त्या सुंदर शिशुची तनु असुरा अर्पिली ॥ बघुनिया सत्यता त्यासि दया उपजली ॥ जा घेउन या आठवा वधिन मी अरी ॥ शिशु घेउनि निघता ये नारद कौतुकें ॥ मनिं म्हणति न घडति यासि पुरिं पातकें ॥ जो श्री० ॥ ३ ॥ सन्मानें पूजुनि ही वार्ता कळविली ॥ हे मथुराधिपते बुद्धि तुझी गुंगली ॥ हिंचि आठी बाळें उलटसुलट मोजिलीं ॥ तरि हाचि आठवा शत्रु होय बहु बली ॥ कंसांतर भरवुनि नारद लावी कळी ॥ वसुदेवाकरिंचें घेत बाळ करतळीं ॥ आपटून शिळेवरि उडवि गगनमंडळीं ॥ अशिं कंसें बाळें साहि तिचीं मारिलीं ॥ जिरे गर्भ सातवा राहे रोहिणीस्थळीं ॥ मग पुनः गर्भवति कंस-भगिनि जाहली ॥ पाहता देवकी जाउनि नृपनायकें ॥ वसुदेव सांगतो कंस अला लाडकें ॥ जो श्री० ॥ ४ ॥ भुज पिटूनि बोले तथिं ती कंसासुर ॥ मर्दुन टाकितों मुष्टिक आणि चाणुर ॥ ही बंदीशाळा फोडिन मी महाविर ॥ स्थापीन मथुरे उग्रसेन नृपवर ॥ स्त्रीहरणिं करिन मी रुक्मियास जर्जर ॥ शिशुपाळ बंधुसह पाडिन भूमीवर ॥ मी प्रतिपाळिन मम प्रिय भगिनीप्रियकर ॥ मज बघुनि थरथरा कापतील अरिवर ॥ मी षोडश सहस्र युवतीसह द्वारके ॥ राहीन मजपुढें पडतिल शत्रू फिके ॥ जो श्री० ॥ ५ ॥

हें वाक्य ऐकुनि कंस मनीं दचकला ॥ तेथोनि परतता मार्गी बघी शत्रुला ॥ जाय मंदिरास तव द्वारीं तोचि भासला ॥ तो भोजनि बसतां कृष्ण बघुनि थांबला ॥ करि कोप स्त्रीवरी ताडन करि तो तिला ॥ मम मंदिरिं शत्रू कैसा त्वा रक्षिला ॥ तो उठता बसता येत जात बरळला ॥ धन देता घेता आठवा अवलोकिला ॥ मुख-कमल ना दिसे दर्पणि त्या देखिला ॥ दशदिशा विलोकि भरून कृष्ण उरला ॥ येइना जयासी मचकिं निद्रा सुखें ॥ जो मारिल आठवा त्या देइन भातुकें ॥ जो श्री० ॥ ६ ॥ परिजनासि आज्ञा कंसराय देउनी ॥ मम भगिनि-प्रसूती-समय जपा अनुदिनीं ॥ नउ महिने नउ दिन पूर्ण तिला होउनी ॥ तो निराकार ये सगुण रूप घेउनी ॥ आनंद जाहला देव येति मेदिनी ॥ कुणि लोटांगण कुणी प्रदक्षिणा घालुनी ॥ नमुनिया स्तवीती गर्भांतुन ये क्षणीं ॥ अष्टवर्ष जयाला बाळ असा होउनी ॥ पातला ऐकुनी निजस्तवना सुरमुखें ॥ तनु पाहुनि जाती स्वस्थाना सुर सुखें ॥ जो श्री० ॥ ७ ॥ दक्षिण अयन आणि तृतिय ऋतु श्रावण ॥ वद्य अष्टमी रोहिणि बुधवासर जाणुन ॥ मध्यरात्रिं जन्मले चंद्रउदय पाहुन ॥ जागि झालि देवकी सन्मुख नारायण ॥ तें स्वरूप पाहता रवि शशि ओवाळुन ॥ टाकावे भासतें कोट्यवधि उतरुन ॥ कर जोडुन देवकि स्तवन करी निज मुखें ॥ तें ब्रह्मरूप तिशिं पूर्णपणें ओळखे ॥ जो श्री० ॥ ८ ॥ कसुनिया कटीं तो पीतांबर भरजरी ॥ रत्नजडित मेखळा झगझगते त्यावरी ॥ त्या कदळि पोटऱ्या चरणिं नूपुरें बरीं ॥ वनमाळा कौस्तुभ लोळत नाभीवरी ॥ तीं किरिट-कुंडलें चंदन उटि केशरी ॥ तो सु-वास घेउन वसंत खेपा करी ॥ म्हणे देवकि देवा हरिलीं मम पातकें ॥ मम बाळ होउनी दावि जगा कौतुकें ॥ जो श्री० ॥९॥ अंगुष्ठ जयानें घालुनिया निजमुखीं ॥ तो बाळ जाहला पाहुनियां

देवकी ॥ करि जागृत पतिला नच माये हर्ष की ॥ वसुदेव आलिं-गुनि घे चुंबन कौतुकीं ॥ म्हणे बाळ, लपवुनी ठेउ कुठें देवकी ॥ ध्वनि झालि गोकुळीं नेउन मज ठेव कीं ॥ म्हणे कृष्णा कृष्णचरित्र इथवर मुखें ॥ कथुनिया राहिली कृष्णपदांबुजिं सुखें ॥जो श्री०॥१०॥

## गाणें ६८ वें.

[चाल—रामा तुमच्या०]

घडि भरि तरि राधे हरी नेइं मंदिरीं ॥ नेइं मंदिरीं ॥ ध्रु० ॥ देइ यास खावयास द्राक्ष जाम्ब अंजिरास ॥ राहिना हा धरितो श्वास, झालि खास दृष्ट यास. काय करूं तरी ॥ काय० ॥ घडि० ॥१॥ राहिना हा यादवेंद्र, खेळावया मागे चंद्र ॥ दृष्टावला गुणसमुद्र,असा कोणि चतुर आण पंच-अक्षरी ॥ घ० ॥२॥ राहिना हा कमलनयन, करीना हा रात्रिं शयन ॥ दासी म्हणे राधाभुवन, नको अंत पाहु अता, घेईं कडेवरी ॥ घे० ॥ घ० ॥ ३ ॥ राधा-कृष्ण मायबाप, दावि शीघ्र तव प्रताप ॥ हरीं जन्म मरण ताप ॥ बघुनि भवा झालि असे कृष्णा बावरी ॥ घ० ॥ ४ ॥

## गाणें ६९ वें.

[चाल—काय सांगू त्रिजटे०]

काय सांगू यशोदे ग करितो खोड्या तव कुमार ॥ जावें गोकुळ सोडुनि हें नलगे अह्मा संसार ॥ ध्रु० ॥ काल रात्रीं घरिं आला; घेउनि संगें सवगडे ॥ डेरा माझा फोडियला ॥ टाकुनि दहिं-दुध उवडें ॥ सारें माझें दूध प्याला ॥ बघुनी मन झालें वेडें ॥काय० ॥ ॥ १ ॥ दुसरी म्हणते साजणी ॥ ऐकें पोराची खोडी ॥ निजलों

आम्ही सुखशयनी ॥ साधुनि संधी बहु थोडी ॥ न कळे आला कोठूनी ॥ बांधिलि वेणी पति-दाढी ॥ काय० ॥२॥ तिसरी म्हणते ऐक आता ॥ साऱ्या खोड्या पोराच्या ॥ लेकी माझ्या कुलवत ॥ सुना आणिल्या थोराच्या, झाल्या ससारीं वेड्या ॥ बघुनी खूणा जाराच्या ॥ काय० ॥ ३ ॥ कडेवर घागर कांर कळशी ॥ जाता यमुना बाईला ॥ जाणुनि वेळा हरि आडवा॥येउनि तिष्ठत राहिला ॥ म्हणतो चल गे कुंजवनीं ॥ फुलें फुलली जाईला ॥ काय० ॥ धन्य गोकुळ यशोदा ती ॥ धन्य व्रजवासी ललना ॥ वर्णन करिता हरि-लीला ॥ थकली धरणीधररसना ॥ तेथें मंदमती कृष्णा ॥ गाइल कैसी हरी गुणा ॥ काय० ॥ ९ ॥

## गाणें ७० वें

[ चाल—यशोदेबाई आज ]

यशोदा काकू हो राखावी गोडी ॥ तुमच्या मुलामुळें करू आम्ही तोडी ॥ ध्रु० ॥ दूध विकावया मथुरेसी जाता ॥ मारितो खडे हा मम प्राणनाथा ॥ य० ॥ १ ॥ सात मासाचा बालक माझा ॥ तुह्मि बारा घरच्या बालट बाजा ॥ य० ॥ २ ॥ दुसरी म्हणे मम बालक तान्हें ॥ आणून ठेवीलें बिदिवरि यानें ॥ य० ॥ ॥ ३ ॥ मागता चांड्या अमती ह्या खोट्या ॥ मम तान्हें लेंकरू तुह्मि नाल मोठ्या ॥ य० ॥ ४ ॥ हा गोपाळ असुराचा काळ ॥ तुज वाटे बाळ हा असे खोडाळ ॥ य० ॥ ५ ॥ धन्य गोपीका यशोदा तो नंद ॥ दिनरजनिं कृष्णेसि श्रीकृष्णछंद ॥ य० ॥६॥

## गाणें ७१ वें.

[ चाल—अता राम पाहीं० ]

आतां ऊठ वेगें हरी उदय झाला ॥ अंशू प्रकाशित नभिं भानु आला ॥ ध्रु० ॥ लोपली ही निशा, उगवलीसे दिशा ॥ मुनीगण मानसा, स्वस्थ केलें ॥ पूतनाशोषणा, कालियामर्दना ॥ ऊठ जग-जीवना, उशिर झाला ॥ आता० ॥ १ ॥ वत्स हंबारले, धेनु पान्हावल्या ॥ गोठणीं बांधिले सोडिं त्याला ॥ काळि घे घोंगडी पादुका करिं छडी ॥ धेनु ने तातडी यामुनाला ॥ आता० ॥ २ ॥ ऊठिं बा घननिळा, दावि मुख-उत्पला ॥ तेज नभमंडळा पाहिं रविचें ॥ ऊठिं बा राजसा, भक्षिं हा अनरसा ॥ संगें घे गोरसा भाकरीला ॥ आता० ॥ ३ ॥ राधिका सुंदरी पातलीसे हरी ॥ नेउ पाहे घरीं खेळु खेळा ॥ ऊठ हरि जिवलगे, गोप बालक उभे ॥ दावि मुख-चंद्र गे सवंगड्याला ॥ अता० ॥ ४ ॥ यशोदा सुंदरा उठवि मुरलीधरा ॥ तान्हिया लेंकरा सांडि शयना ॥ ऊठिं बा यदुविरा, मुरलि घेउनि करा ॥ वाजवीं सुस्वरा वेणुनादा ॥ आता० ॥ ५ ॥ ऊठिं मन-मोहना, चुकविं भवयातना ॥ कृष्णि करि प्रार्थना ॥ रक्षिं इजला ॥ विषम-काळीं तुशीं, झोंप तरि ये कशी ॥ तारिं संकटिं मशीं विश्वपाळा ॥ आता ॥ ६ ॥

---

## गाणें ७२ वें.

[ चाल—प्रात काल हा होय ]

प्रात काल हा होय सुंदर ऊठ हरी उदयाचली॥ ह्मणे यशोदा ऊठ मुकुंदा पाहिं निशा ही संपली ॥ ध्रु० ॥ दिनमणि हा पळपळ

वाढे तेज चढे नभमंडळीं ॥ वृषभार हा घेउनि कृषिबल नित कृत्यातें चालले ॥ प्रात ० ॥ १ ॥ पहा हरी हा उदय जाहला धेनु वत्सें हंबरलीं ॥ पात्र घेउनि धार काढुनी धेनु ने यमुना-जळीं ॥ ॥ प्रात.० ॥ २ ॥ हंस सारि कोकील शुकादी गगनमंडळा ऊडले॥ जाति त्वरें गोपाल घेउनी धेनुबंधना सोडिलें ॥ प्रात० ॥ ३ ॥ समार्जन सारुनी कामिनी काढिति सुंदर रांगुळी ॥ व्रजांगना शृंगार सुशोभित चालल्या यमुना-जळीं ॥ प्रात ० ॥ ४ ॥ पलांडु मर्दुनि तिखट बनविलें केलि उनोनित भाकरी ॥ दहीं दूध नवनीत साखर घेउनि लौकर जा हरी ॥ प्रात ० ॥ ५ ॥ घेइ कांबळा यष्टि-पादुका घेइं शिदोरी बांधिली ॥ गोप घेउनि जा कुंजवनिं वाजविं सुस्वर बांसुरी ॥ प्रात ० ॥ ६ ॥ यदूनायका आलि राधिका उठें लगबगां श्रीहरी ॥ कराञ्जुलि जोडोनि कृष्णाबाई विनवी निजांतरीं ॥ प्रात ० ॥ ७ ॥

---

## गाणें ७३ वें.

[ चाल—का गे बाई ह्या हरि ]

गोपीनाथा आलें, आलें, सारूनिया काम रे ॥ वृंदावनिं वाजविसी वेणू जरा थांब रे ॥ गोपी० ॥ ध्रु० ॥ एक गोपी ह्मणे माझ्या घरीं आले पाहुणे ॥ बहिणीचे पती माझे होति सखे मेहुणे ॥ स्वयंपाक सोडोनियां येता झाले श्रम रे ॥ गोपी० ॥ १ ॥ ह्मणे दूजी हरी तुझी मुरली रागीं रंगली ॥ हीच्या नादें आज माझी पती-सेवा भंगली ॥ विडा करिता करिता आलें सुटला भाळीं घाम रे ॥ गोपी० ॥ ॥ २ ॥ तिसरी ह्मणे हरी माझी सासू वहू तापट ॥ कुंजवनीं येत होतें मारूनिया करी पिठ ॥ आता कैसी येऊं देवा भजतें तुझें नाम

रे ॥ गोपी० ॥ ३ ॥ चवथी नारी माळीयाची जात होती सा-
सरीं ॥ अवचीत मुरलिचा नाद भरे अंतरीं ॥ द्राक्षें अननस आम्र
आणिलीं केळीं जात्र रे ॥ गोपी० ॥ ४ ॥ यमुनाबाई वाहे स्थिर
नादें लुब्धला समीर ॥ हालवीना तरूवर सुमनें फळें पान रे ॥
गोपी० ॥ वेडावली वेदश्रुती खुंटे अनंताची मती ॥ तेथें कृष्णाबाई
किती वर्णी घनश्याम रे ॥ गोपी० ॥ ६ ॥

---

## गाणें ७४ वें.

[ चाल–मधुर किती कुसुम-गंध सुटला० ]

हरि रे तुझी मुरलि किती गुलजार ॥ ध्रु० ॥ पाका करिता प
ळत मि सुटलें टाकुनि उघडें द्वार ॥ ह० ॥ १ ॥ न्हाणिंत नाहता
धावत आलें पाठिवरी कुंतलभार ॥ ह० ॥ २ ॥ तान्ह्यास मी
ढकलुनि दिधलें भावितो नंदकुमार ॥ ह० ॥ ३ ॥ शुक बक
मैना वृक्षिं स्थिरावलीं मुरलिरव अनिवार ॥ ह० ॥ ४ ॥ ऐशा
कृष्णापदिं कृष्णा ही मागतसे आधार ॥ ह० ॥ ५ ॥

---

## गाणें ७५ वें.

[ चाल– घेउनि ये पंखा० ]

मनमोहना श्रीरंगा हरी, थांबविं मुरली जरा ॥ पाक कु-
रिता उठलें ॥ देहभान खुटलें ॥ संसारावरि विटलें ॥ टाकुनि
आलें घरा ॥ मन० ॥ १ ॥ बहुत नवसिं कृष्णा ॥ झाला मज
तान्हा ॥ पाजविता त्या पान्हा ॥ ऐकिलें मधुर स्वरा ॥ मन० ॥
॥ २ ॥ दधि मथन करिता नाद भरे चित्ता ॥ रविदोरा त्या-
गिता ॥ सुटला तक्रझरा ॥ मन० ॥ ३ ॥ व्रजवासी ललना ॥

प्रार्थिति मन-मोहना ॥ मागतसे तुज कृष्णा ॥ दे पदिं ठाव सदा ॥ मन० ॥ ४ ॥

## गाणें ७६ वें.

[ चाल—रसने रंगीं रंग० ]

हो रात्रीं कोठें होता चक्रपाणी हो ॥ खरेंच सांगा पुसते राधा अनयाराणी हो ॥ ध्रु० ॥ हो पाहिली मीं वाट चारी प्रहरीं हो ॥ आता येतील मग म्हणतें शौरी हो ॥ हार-तुरे गजरे करिं तयारी हो ॥ नाहीं अपुला ठिकाण कोठें होती स्वारी ॥ हो रात्रीं० ॥ ॥ १ ॥ गे नाहीं कोठें गेलों सत्य राधे ग ॥ दवली धेनु चुकली तीच्या छंदें ग ॥ रात्र फार झाली वेणू-नादें ग ॥ भक्षीलें मी जांभुळ झालों व्याकुळ क्षुधें ॥ हो रात्रीं० ॥ २ ॥ हो भाळीं फार तुमच्या घाम आला हो ॥ भिजुनी शेला सारा चिंब झाला हो ॥ सुकलें तोंड लागे पिवळें गाला हो ॥ नेत्र लाल म्हणते राधा सत्य बोला ॥ हो रात्रीं० ॥२॥ ग तुजवरि राधे माझा प्रेमा सारा ग ॥ मार्गीं येतां आल्या मेघ धारा ग ॥ कडकडोनी वीजा सुटला वारा ग ॥ जाईखालीं बसता भिजला शेला सारा ग ॥ हो रात्रीं० ॥४॥ हो मजसी दावा तुमच्या भोगांगना हो ॥ माझा तांबुल तुम्हीं प्रेमें घ्यावा हो ॥ मजसी प्रेमभावें का बोलाना हो ॥ सद्गद कंठा राधा झाली बघुनी कृष्णा हो ॥ हो रात्रीं० ॥ ५ ॥ हो कळवळोनी कृष्णें धरली हातीं हो ॥ सत्य सत्य राधे तुजवर प्रीती हो ॥ आलिंगूनि राधा अंकीं घेती हो ॥ झाली कृष्णा राधा-कृष्णागुण गाती हो ॥ हो रात्रीं० ॥ ६ ॥

## गाणें ७७ वें.

[ चाल—मम लालस करणी० ]

अक्रूरा नेउं नको राम-श्रीहरी ॥ राम-श्रीहरी, नको राम-श्रीहरी ॥ ध्रु० ॥ चिमणि काठि घेउनि करीं धेनु नेतसे ॥ चिमणि मूर्ति, चिमणे गोप, सगें घेतसे ॥ चिमणि मुरलि कुजवनीं वाजवीतसे ॥ देउं कुणा नवनित मी दूध केशरी ॥ अ० ॥ १ ॥ नंद-यशोदेसी शोक नावरे जरा ॥ अक्रूरा क्रूरमती अससि तू खरा ॥ रथिं घालुनि नेसि जरी राम-श्रीधरा ॥ तरि लोटुनि जासि आम्हा शोकसागरीं ॥ अ० ॥ २ ॥ नंद अगणात गोपि करिति गर्जना ॥ दीन होउनि अक्रुरास करिति प्रार्थना ॥ रामकृष्ण भिक्षादान देइ या धना ॥ साठविं तूं पदरिं पुण्य घेइं यश शिरीं ॥अ०॥३॥ तू तरि बघें करुनि कृपा नंदबालका ॥ हृदय पिटुनि व्रजागना फोडिती हाका ॥ या समई हृदय असें कठिण करिसि का ॥ मनमोहना काळ कसा कंठुं अह्मि तरि ॥ अ० ॥ ४ ॥ तुजवाचुनि विवल अह्मी श्यामसुंदरा ॥ कमलाक्षा ओस दिसे तुजविणें धरा ॥ मोसेना तव वियोग अस्मदतरा ॥ त्या--समान कृष्णेची जाहली परी ॥ अ० ॥ ४ ॥

---

## गाणें ७८ वें.

[ चाल—सत्य ही गुरुची० ]

माझें बालक राम हरी ॥ का रे नेतोसि मथुरा पुरीं ॥ अक्रूरा. बालक राम-हरी ॥ ध्रु० ॥ म्हणे यशोदा अक्रूरासी ॥ खडिसाखर नवनीतासी देउं कुणा मि सरतां निशि ॥ अ० ॥ बा० ॥ १ ॥ देउं कुणा मी साखरउंडा ॥ देउं कुणा मीं दूध माडा ॥ जाती

घेउनि वनीं धेनुझुंडा ॥ अ० ॥ बा० ॥ २ ॥ शुभ्र सावळा-राम जगजेठी ॥ पायिं नेपुरें कडिं करिं कंठीं ॥ कानी कुंडलें माळ वैजयंती ॥ अ० ॥ बा० ॥ ३ ॥ शोकें व्याकुळ गोपि जाहल्या ॥ नंदअंगणीं रडूं लागल्या ॥ रथ चालता आडव्या आल्या ॥ अ० ॥ बा० ॥ ४ ॥ केली आमुची ताटातुटी ॥ नंद मारितो हाक मोठी ॥ कृष्णा घालिते हरिपायीं मिठी ॥ अ० ॥ बा० ॥ ५ ॥

## गाणें ७९ वें.

[ चाल—जाऊं कामाला० ]

जातो मथुरेला हरी हा टाकुनि आम्हाला ॥ नंद यशोदेला हरी० ॥ ध्रु० ॥ गडे नंदाच्या द्वारीं जुपुनि रथ सिद्धचि झाला ॥ दधि करकमळीं घालुनि माता बोलविते त्याला ॥ चला गे अडवूं कृष्णाला ॥ ॥जातो० ॥ १ ॥ नंद यशोदा अकांत करिती मारुन मिठी हरिला॥ नेत्रीं अंजन घालुनि लावित गालबोट गाला ॥ चला० ॥ जातो० ॥ ॥ २ ॥ घातकि आमुचा मथुराधिपति नेतो या बाळा ॥ काठि, कांबळा, घुंगर, वाहणा हरि त्यागुन गेला ॥ चला०॥जातो॥ ३ ॥ कासे पितांबर मुगुट कुंडलें कौस्तुभ वनमाला ॥ करिं कर धरुनी रथिं बैसवितो अक्रूर हा मेला ॥ चला० ॥ जातो० ॥४॥ व्रजांगना त्या नंदअंगणीं अडविति कृष्णाला ॥ मम हृदयांतरिं बैसे क्षण तरि नमि कृष्णा हरिला ॥ चला० ॥ जातो० ॥ ५ ॥

## गाणें ८० वें.

[ चाल—दिनरजनि० ]

उद्धवास क्षेम पुसे यशोदा सती ॥ असति सुखी रामकृष्ण सांग मजप्रती ॥ उद्ध० ॥ ध्रु० ॥ धरून पायिं हरिस इथें नाहुं घातलें॥

घेउन कडे कवल करीं ग्रास भरविलें ॥ गीत गात पाल्कांत बाळ निजविलें ॥ मृत्तिका तो भक्षितां मिं मारिलें किती ॥ उद्ध० ॥१॥ अरुण उदयिं धेनुसंगें धाडिला वनीं ॥ गाऱ्हाणी गोपिकाचीं सत्य मानुनी ॥ हरिस उखळिं बांधियलें आठवे मनीं ॥ त्रिभुवनीं मजसम हि नसे अन्य माय ती ॥ उद्ध० ॥ २ ॥ नंदअंगणात गोपि येति धाउनी ॥ उद्धवजी निरोप असा सांग जाउनी ॥ खरिद कुठें केलि हरी नवरी पाहुनी ॥ झालि कशी तुजसि अता कुबडि अवडती ॥ ॥ उद्ध० ॥ ३ ॥ कुंजवनीं कृष्णनाथ रास खेळता ॥ भाषदान देउनिया करिसि कां वृथा ॥ जाय तुझा थोरपणा श्रीहरी आतां कर जोडुनि कृष्णा त्या झालि विनविती ॥ उद्ध० ॥ ॥ ४ ॥

---

## गाणें ८१ वें.

[ **चाल**–बघुनि त्या भयंकर भू० ]

बघुनि ती कुलक्षण कुब्जा ॥ भाळला कसा वनमाळी ॥ तुम्हि अमुचा निरोप कळवा ॥ उद्धवजी हरीस तात्काळीं ॥ ध्रु० ॥ एक गोपि म्हणे किति गोरी ॥ उद्धवजि कोळशावाणी ॥ मळ सर्वांगावरि बसला जणु दुर्गंधीची खाणी ॥ ते दंत किती तरी पिवळे ॥ येतसे मुखांतुन घाणी ॥ नसे धडकें चोळी-लुगडें ॥ दिल्या गांठि ठिकाठिकाणीं ॥ शिरीं जटाभार केसाचा ॥ कोण देत तेल त्या पाणी ॥ हरि भुलला मस्तकीं परि ती ॥ वृश्चिक-पुच्छ-सम वेणी ॥ डोयिं उवा खंडिभरि भरल्या ॥ करकरा करें खाजोळी ॥ तुम्हि अमुचा० ॥ १ ॥ म्हणे दुसरी नयन किति पिच्चके ॥ तें बसकें नासिक कोणी ॥ बनविलें न कळे हरि अम्हा ॥ का बघुन केलि त्वा शहाणी ॥ जरि कूळ म्हणावें खासें तरि दासि कंसरायानीं ॥ ठेविली प्रतिदिनिं त्यातें, देतसे गंध आणोनी ॥ परतविल्या किति

नृपकन्या, आवडलि त्यात ही राणी ॥ बाइ मजला खचितचि कळलें केलें चेटुक त्या सटवीनीं ॥ तिशिं बघुन मनीं मज वाटे, कुणिं उचलुनि द्यावी सूळीं ॥ तुह्मि आमुचा० ॥ २ ॥ दिन होउनि सकल व्रजललना, नानापरि बोलति त्यासी ॥ तुज कैसी नाहीं ममता, रे कृष्णा मथुरावासी ॥ तुजवीण नारि अह्मि वेड्या, नाहिं सुचत सदनिं कार्यासी ॥ मनिं वाटे विष तरि खावें, अर्पावे प्राण यमुनेसी॥ ओसाड तुजविणें जग तें, भासतें अम्हा नयनासी ॥ मनमोहना कां नच करुणा, येइ ना अशा समयासी ॥ कुब्जांत:सुखदा. कृष्णा श्रीरंग-पदा धरि भाळीं ॥ तुह्मि अमुचा० ॥ ३ ॥

## गाणें ८२ वें.

[ चाल—कमलनयन० ]

अत नको पाहुं अता धाव माधवा ॥ शिशुपाळ राजयास बंधु देत हा ॥ अं० ॥ ध्रु० ॥ देशोदेशिंचे भुपाळ पातले कसे दाटि रंगमंडपात जाहलि असे ॥ तुजवाचुन श्रीरंगा शून्य मज दिसे ॥सुदेव विप्र पाठविला येइं यादवा ॥ अंत० ॥ १ ॥ वाचुनिया वृत्त सर्व पाहिं हें हरी ॥ लग्नसमयिं पूजनास देविमंदिरीं ॥ जाइन मी त्या समयीं हरण मज करीं ॥ प्रार्थितसे भीमकजा संकटिं महा ॥ अं० ॥ २ ॥ नंद-नंदनानें सर्व वृत्त वाचुनी ॥ जोडुनिया रहंवरास वारु त्या क्षणीं ॥ कुंतलपुरिं सेनेसह पातला झणीं ॥ अंबालयिं रुक्मिण ती आलि तेधवां ॥ अंत० ॥ ३ ॥ पाहुनिया रुक्मिणिचें रूप नृपति तें ॥ चकित होउनि धरणीवरी भुलुन पडति ते ॥ कागातुन मुक्ताफळ हंस हरिति ते ॥ त्यासमान रुक्मिणि ती उचलली पहा ॥ अंत० ॥ ४ ॥ जिंकुनियां सकल नृपां जाति द्वारके ॥ करुनि समारंभ लग्न

लाविलें निकें ॥ रुक्मिणिवर माझि दीनवाणि आइकें ॥ म्हणे कृष्णा पदकमलीं नेसि केधवा ॥ अंत० ॥ ५ ॥

## गाणें ८३ वें.

[ चाल—सथानो या० ]

प्रिये तूं ह्या समयिं शय्या त्यजूनीया ॥ रुसुन बसलीस का वाया महीवरि या ॥ प्रि० ॥ ध्रु० ॥ इदुवदने कमलनयने धवल सुमनें ॥ नसति वेणींत का बससी त्यजूनीया ॥ प्रि० ॥ १ ॥ पुरे प्रेमा कळे आह्मां वदे भामा ॥ सुमन सवतीस देउनीया आलां धामा ॥ ॥ प्रि० ॥ २ ॥ रुचिर जाये आलिंगुनिया यादवराया ॥ ह्मणत लावीन तरूवर तो आणूनीया ॥ प्रि० ॥ ३ ॥ धरुनि गाला हसवि तिजला तांबुलाला ॥ देऊन, बसवीत भामेला धरूनीया ॥ प्रि० ॥ ॥ ४ ॥ विश्वनाथा कृपावता हरीं चिंता ॥ नमित कृष्णा निरंतर ही प्रभूपाया ॥ प्रि० ॥ ५ ॥

## गाणें ८४ वें.

[ चाल—तिळगुळ घ्या मजुळ बोला ]

कुसुम स्वर्गिचें नारद हरि तें ॥ देत प्रमोदें रुक्मिणि करिं तें ॥ हें कळवी सखि भामेला ॥ कां आला मम महालाला ॥ म्हणे भामा श्रीरंगाला ॥ ध्रु० ॥ १ ॥ त्यागुनि शय्या भूमिवरि या ॥ कां निजली सत्राजित-तनया ॥ सखयानो झडकरि बोला ॥ हरि वदला भामेला ॥ पुरविन मी तव हट्टाला ॥ २ ॥ जरि नावडतें हरि मी आता ॥ तरि कां घडि घडि सदनीं येता ॥ ही भ्रांती पडत मनाला ॥ कां० ॥ ३ ॥ सोळा सहस्त्र जरि मज युवती ॥ परि पूर्णचि तुजवरती प्रीती ॥ धरिं चित्तीं मम वाक्याला ॥ हरि० ॥ ४ ॥

जरि आवडतें हरि मी तुम्हा ॥ तरि सवतिस का देता कुसुमा ॥ हें योग्याचि नच तुम्हाला ॥ का० ॥ ५ ॥ हरि म्हणे इतुक्यासाठीं रुसणें ॥ हें योग्याचि नच तुज मृगनयने ॥ तव अगणिं लाविन तरुला ॥ ॥ हरि० ॥ ६ ॥ करि समजुत हरि अंकीं धरुनी ॥ दे आलिंगन प्रेमें करुनी ॥ नमि कृष्णा त्या उभयाला ॥ का० ॥

---

## गाणें ८५ वें.

[ चाल—कधि करिती लग्न ० ]

रुचते का तीर्थयात्रा या समयीं अर्जुना ॥ ध्रु० ॥ हलधर हा बंधु माझा अधसुता देतसे ॥ ऐकुनिया मात ऐसी दुःख जिवा होतसे ॥ बाळपणी वचन मातें दिधलें त्वा तरि कसें ॥ चाल ॥ तें आता, होतसे वृथा, कुंतिच्या सुता, सत्य करिताना ॥ या० ॥ १ ॥ मजवरी प्रेम भारी जरि हरिचें वाटलें ॥ परि बंधुपाशीं त्याचें तिळभरहि ना चले ॥ ये हंसा शीघ्र आता कागाकरीं सापडे ॥ चाल ॥ नरवरा, येउनी त्वरा- हरण मज करा, यत्न करिं नाना ॥ या० ॥ ॥ २ ॥ ऐकुनिया शौर्य कीर्ति माळ तुला घालितें ॥ तुज वरिल पंडुपुत्रा हरिभगिनी विनवितें ॥ न होई प्राप्ति तूझी त्यागिन मी प्राण ते ॥ चाल ॥ या क्षणीं द्रुपदनंदिनी येइं त्यागुनी, नेइं मज झणीं, फसविं दादाना ॥ या० ॥ ३ ॥ हरिभगिनी भीति का गे आलों मी संकटीं ॥ मी दंडीवेषधारी अर्जुन हा तव तटीं ॥ आलिंगी प्रेमभावें चुंबुनियां गोरटी ॥ चाल ॥ त्या स्थळीं, वीर मंडळी, होति बहु बळी, लागता कळी, जिंकिलें त्यांना ॥ या० ॥ ४ ॥ सुभद्रा नेलि पार्थें हें कळतां हलधरा ॥ घेउनिया मुसळ हातीं फिरवी तो गरगरा ॥ हरि बोले योग्य नाहीं शातीतें झणें वरा ॥ चाल ॥

आणि तो उपजण्या अधी, लिहितसे विधी, टळेना कधीं, सत्य ह्मणे कृष्णा ॥ या० ॥ ५ ॥

---

## गाणें ८६ वें.

[ चाल—मूर्तिमत भीति उभी मज० ]

कमलवदन राजिवाक्ष धांव गोपिवल्लभा ॥ करावयासि नग्न मला धरितो दुष्ट पल्लवा ॥ ध्रु० ॥ असति वृद्ध भीष्म श्वशुर अंधचि धृतराष्ट्र हा ॥ धरिति मौन प्राणपती मम वसन ओढि हा ॥ ॥ कमल० ॥ १ ॥ पट्टराणि होइ अतां अंकिं बैस गे ह्मणे ॥ धरितें आस, बांधिं कास जग उदास तुजविणें ॥ कमल० ॥ २ ॥ सिंह-सभे हरिणि हरी, द्रुपदसुता कोंडिली ॥ कुंतिकुमारिं लाविली पणा, विटंबना मांडिली ॥ कमल० ॥ ३ ॥ भीमकजे धाडिं त्वरें, कांत तुझा ह्या क्षणीं ॥ त्यागिं शेज बंधुराज भगिनिकाज करिं झणीं ॥ ॥ कमल० ॥ ४ ॥ मदनतात पळत जात भगिनिमात ऐकुनी ॥ नाभिं नाभिं वदत हरी पीतवसनिं झाकुनी ॥ कमल० ॥५॥ बघुनि कृष्णा कृष्णवदन सभय शत्रु जाहले ॥ धन्य बंधु-भगिनि अशीं, वंदि कृष्णि पाउलें ॥ कमल० ॥ ६ ॥

---

## गाणें ८७ वें.

[ चाल—नृपाल कोप० ]

ऋतुस्नान मंदिरात एकटी असें ॥ धरुनि मूद वेणि मला ओढितो कसें ॥ नाहिं सुचत काय करूं लागलें पिसें ॥ अंधपुत्र म्हणतो मला मांडिवरि बसें ॥ चाल ॥ कसें करूं, कुणा स्मरूं, समइ याद-वा ॥ अशा सम० ॥ राखिं लाज बंधुराज धांव माधवा ॥ दु:शासन दुष्टमती ओढि पल्लवा ॥ ध्रु० ॥ १ ॥ भीष्म द्रोण

विदुर मौन धरुनि बैसले ॥ पंडुपुत्र पच व्याघ्र स्तब्ध राहिले ॥ नष्ट कर्ण शब्दबाण हृदयिं लागले ॥ समय असा, जाणुनिया, तुज-सि बाहिलें ॥ चाल ॥ करीं त्वरा यदूवरा, धाव बाधवा, त्वरें धाव० ॥ राखिं० ॥२॥ ऐकुनियां दीन शब्द पळतसे हरी ॥ नाभिं नाभिं द्रुपदसुते स्थीरता धरीं ॥ नेसवितां पीतवसन लाजले अरी ॥ ध्याउनि कृष्ण कृष्णि सदा प्रार्थना करी ॥ विभो नमो, प्रभो नमो, वारिं या भवा ॥ अतां वा० ॥ राखिं० ॥ ३ ॥

## गाणें ८८ वें.

( चाल--कधिं करितीं लग्न माझे० )

काशि तुजला झोंप आली हें न कळे हो मला ॥ ध्रु० ॥ धरु-नीया केश माझे सभेमाजीं ओढितो ॥ ओढुनिया पल्लवासी कर वसना सोडितो ॥ वाग्बाणा सोडुनीया मम हृदया भेदितो ॥ चाल ॥ द्रौ-पदी बैस येउनी लाज साडुनी माडिवरि झणीं, ऐक गोपाला ॥ ॥ हें न क० ॥ १ ॥ धरूनीया मौन सारे सभेमाजीं बैसले ॥ कृप द्रोण विदुर याचें या समयीं ना चले ॥ जंबूकें पाच व्याघ्रां कपटानें जिंकिलें ॥ चाल ॥ केसरी द्यूत पंजरीं कोंडिले, हरी काय करु तरी, रक्षिं आह्मांला ॥ हें न क० ॥ २ ॥ रुक्मिणीवहिनि तुझ्या पदकमला वदितें ॥ नको पाहू अंत माझा धाडुनि दे स्वामितें ॥ तो दीननाथ आता हरि आधीसिंधुतें ॥ चाल ॥ श्रीभरें शब्द ऐकिले, शयन त्यागिलें, आलिंगन दिलें, येउनि भगिनीला ॥ हें न क० ॥ ३ का भिशी द्रुपदबाळे तव पाठीं राहतों ॥ नको चिंता वसन भारें तव काया झाकितों ॥ शत्रूंच्या गर्वभंगा करुनीयां टाकितों ॥ चाल ॥ पाहनी सदर्शन करा, नमे सुरवरा, प्रार्थि श्रीधरा ॥ रक्षिं कृष्णेला ॥ ॥ हें नक० ॥ ४ ॥

## गाणें ८९ वें.

( चाल--कृपा करुनि मार्गे० )

रुक्मिणिकांता धाव अकांता रक्षीं श्रीरंगा ॥ दुःशासन हा येउनि माझ्या झोंबतसे अगा ॥ ध्रु० ॥ ऋतुमती मी एकटि असतां मंदिरिं तो शिरला ॥ धरुनि वेणिला ओढि फरफरा सभेमधें मजला॥ पाच पती जिंकुनि विजयी दुर्योधन झाला ॥ कपट द्यूत खेळोनि पणामधें जिंकि: पाडवांला॥ पडु-कुमर हो आजि पराक्रम कोणिकडे गेला॥ भिंतीवरच्या चित्रासम तुम्हीं स्वस्थ कसे बसला ॥ कपटि दुरात्मा शकुनीमामा करितो बहु दगा ॥ रु० ॥ १ ॥ नष्ट कर्ण हा ह्मणतो वहिनी ऐका मम वचना ॥ दुर्योधनाच्या अंकिं बसूनी व्हा त्याची ललना ॥ बलहिन झाले पाचहि पति तव दे सोडुन त्याना ॥ चांडाळानें हृदय भेदिलें सोडुनि वाग्बाणा ॥ संकटकालीं दुजा न वाली ऐकावी करुणा ॥ मन वारूवरि बसुन झडकरि ये धावत कृष्णा ॥ तूहि भीमके त्वरा करूनी पाठविं अरिभंगा ॥ रु० ॥ २ ॥ पांचाळीचा ऐकुनि धावा लगबग पळति हरी ॥ ना भीं म्हणुनी दे आलिंगन नेसवि शेलारी ॥ शुभ्र पातळ लाल कुसुंबी शालू बुट्टेरी ॥ खडी चौकडी मुगवी चुनडी पैठणि जरतारी ॥ शेवटिं हरिनें निज-पितांबर नेसविला कुसरीं ॥ त्यासि ओढिता मूर्च्छा येउनि पडला भूमिवरी ॥ करीं सुदर्शन घेउनि केलें शत्रुगर्वभंगा ॥ रु० ॥ ३ ॥ वाटे द्रौपदी कृष्णरूप ती चतुर्भुजा झाली ॥ चांडाळाच्या मुखावरी मग काळोखी आली ॥ भीष्म द्रोण कृप विदुरादिक ते वाजविती टाळी ॥ सभेमधें ती क्रुद्ध होउनी गर्जत पांचाळी ॥ बसेल अंकीं दुर्योधनाच्या भीमगदा बाळी ॥ बळें रणांगणिं सूतकुमारा होउनि वेल्हाळी ॥ शर-शयनावरि निद्रा करिलचि निज बभ्रूजवळी ॥ अंध श्वशुर ते पाहति कौतुक नयनीं त्या वेळीं ॥ बहु शिण आला फिरतां म-

जला चौऱ्याशीं पिंगा ॥ हरिचरणांबुजिं नमिते कृष्णा सोडवि भव-संगा ॥ रु० ॥ ४ ॥

## गाणें ९० वें.

( चाल - -कमलनयन कमलशयन० )

हरि-हरात भेद पूर्विं काय मानुनी ॥ काय धेनु-वत्स यांत विघड घालुनी, विघड घालुनी ॥ कुरंगिणी-पाडसासि दवडिलें वनीं ॥ न कळे काय कर्म असें घडलें पातका ॥ कमलनयन भुजगशयन विश्व-पालका, विश्व० ॥ म्हणुनि विष मी देत यास रक्षिं बालका ॥ ध्रु० ॥ पालिं विप्र जेविता मिं त्यासि उठविलें ॥ करुनि गुरु द्रोह वृथा सत निंदिले ॥ काय जननि तात यासि यष्टिं ताडिलें ॥ न कळे अतिथास कधीं मारिला बुका ॥ कमल० ॥ २ ॥ पुत्रवधावयालागिं यत्न बहु करी प्रथम गजेंद्राचे पदीं बांधिला हरी ॥ अग्निकुंडिं लोटुनिया ढकलि सागरीं ॥ रक्षियला बाळ तिथें शेषतल्पका ॥ कमल० ॥ ३ ॥ शोकभरित माय अंकिं घेत तान्हया । पाळियलें पूर्ण मास उदरिं मीं जया ॥ आज कालकूट पती देववी तया ॥ पतिवचना मोडूं कसें ताटिकांतका ॥ कमल० ॥४॥ नाभीं जननि हालाहल देइ तू मला ॥ त्र्यंबक त्या पिउनि कसा नीलकंठ जाहला ॥ नारायणा स्मरुनि बाळ प्राशि कुतुहला ॥ सकल तनू अमर होइ मृत्यु येइ कां ॥ कमल० ॥ ५ ॥ ऐकुनि असुर क्रोधयुक्त होय अंतरीं ॥ सांग तुझा नारायण आहे कुठें तरी ॥ बोले बाळ तात जळीं काष्ठभीतरीं ॥ सर्व भूतिं रुनि उरे दशांगुल निका ॥ कमल० ॥ ६ ॥ थर थर थर कांप-तां मे भूमि अतरीं ॥ स्तंभिं लाथ मारि असुर प्रगटले हरी ॥ अंकिं धरुनि उदर फाडि ढोकरीं ॥ सुरवरानिं सुमनवृष्टि केलि बाल ॥ कमल० ॥ ७ ॥ होत असुर-अंत बाळ नमित नरहरी ।

मा होते झालें सहित वर्ता र्मशाळेस

मातेसह होउनि पुढें प्रार्थना करी ॥ होई शांत रमाकांत कोप नच धरीं ॥ हेंचि प्रार्थि लीन कृष्णि अंबुबालिका ॥ कमल० ॥ ८ ॥

## गाणें ९१ वें.

( चाल--नरानें धैर्य न सोडावें० )

चला गे कृष्णातिरिं जाऊं ॥ कुरुंद्वाडच्या दत्तअळीमधें मुरलीधर पाहू ॥ ध्रु० ॥ मला तें क्षेत्रची हो गमतें ॥ श्रीविष्णूचें मंदिर बघतां मन तेथें रमतें ॥ अवधुत–रघुवीर–मंदिरिं तें ॥ रम्य दिसे मज छोटें परि हें मुरलीधर जेथें ॥ सुशोभित बाइ मला दिसतें ॥ देवालय तें दृष्टी पडतां ये शांतिस भरतें ॥ सख्यानो शीघ्र तिथें जाऊं ॥ गरुडासन्मुख उभ्या राहुनी प्रभु चरणा पाहूं ॥ चला० ॥ ॥ १ ॥ नसे कधिं योग्यांना दिसला ॥ काशिबाइच्या भावा-म्लव तिज सदनीं तो बसला ॥ त्यजुनी झणिं श्रीमंताला ॥ नाभी नाभीं काशी म्हणुनी निज वक्त्रें वदला ॥ वसतीं वैशाखीं प्रभुला ॥ शुक्ल दशमिच्या दिवशीं मिरवित मिरवित गे अणिला ॥ मनासी मोद तिच्या झाला ॥ शक अठराशें बत्तिस सालीं सिंहासनिं बसला ॥ अशा स्थळीं मन अपुलें रमवू ॥ नवविध भक्ती घेउन संगें मस्तक हें नमवूं ॥ चला० ॥ २ ॥ आधीं मी प्रभुचरणा नमितें ॥ पायिं पैंजण वाळे नूपुर प्रेमें मग बघतें ॥ नेसले पीतांबर प्र ते ॥ भरजरि शेला शोभे हृदयीं वनमाला दिसते ॥ कधिं क फेटा बांधित ते ॥ कधिं रत्नाच्या मुगुटावरती कोंदण झगझग कपाळीं केशरि चंदन तें ॥ कानिं कुंडलें लाल वदन जणुं र क्षिति ते ॥ करामधिं मुरली घेउन ते ॥ वाजविता हरि र ते गाई पुरे पुरे म्हणते ॥ नसे मज ज्ञान कसें गाऊं ॥ वेळ

बोल बोबडे बोलुन पदिं राहुं ॥ चला० ॥ ३ ॥ बघा गे राधेची मूर्ती ॥ क्षीराब्धीची वाटे तनया आली भूवरती ॥ कसूनी भरजरि पैठणि ती ॥ कलाबतूची फुलें काढिलीं कचूकीवरती ॥ शशीसम कुंकुम मंडित ती ॥ नेत्रीं अंजन मंगळसूत्रें करिं कंकण असती ॥ नटुनी शृंगारी बहु ती ॥ पायीं पैंजण वाजवि रुणझुण हरि मन रंजवि ती ॥ बघे हरिदासा ही भूलवू ॥ निजरूपानें मोहित करुनी ईप्सितपद चुकवू ॥ चला० ॥ ४ ॥ मनोहर रूप असे प्रभुचें ॥ वर्णन करिता थकली श्रुतिही तेथ मला कैचें ॥ परी त्या काशी-बाईचे ॥ फार मनोरथ होते म्हणुनी वदलें मी वाचे ॥ विसर्जन झालें जरि तनुचें ॥ परी जिवा ना स्मरण धरावें दिनरजनी हरिचें ॥ अखंडित नामामृत घेऊ ॥ म्हणते कृष्णा मुरलिधराच्या पदिं मस्तक ठेवू ॥ चला० ॥ ५ ॥

## गाण ९२ ब.

[ चाल—चंद्रकांतराजाची० ]

रघुनाथानी कीर्ति मिळविली जन्मुनि भूलोकीं ॥ श्रीविष्णूचें मंदिर स्थापुनि गेले सुर-लोकीं ॥ ध्रु० ॥ पटवर्धन निळकंठा उदरीं आले रघुनाथ ॥ सत्कीर्तीचा उभवुनिया ध्वज गेले स्वर्गांत ॥ नाहीं त्यांच्या ऐसा दुसरा त्या सरदारांत ॥ दानशूर ते वीर असोनी साधिति परमार्थ ॥ कुरुंदवाडच्या बैसुनि गादीवरि राज्या करित ॥ होते त्यानीं स्थापन केले श्रीलक्ष्मीकांत ॥ स्नान करीता बघुनि मि झालें अंतरिं अति चकित ॥ कृष्णेवरती घाट बांधिला सोपाना-सहित ॥ चाल ॥ गजाननाचें मंदिर अति छोटें ॥ सुब्रह्मण्याचें वरती मोठें ॥ पाहुनि मजला विस्मय मनिं वाटे ॥ बघुनी ओव्या धर्मशाळेची जागा अवलोकीं ॥ बघत बघत मी सिमा ओलांडुनि

गजानना देवी ॥ रघुनाथा०॥१॥ प्रथमारभीं करून प्रदक्षिण नमुनीं गणपतितें ॥ घालुनि उजवें अश्वत्था प्रति स्तविं मग विठ्ठल ते ॥ पाहुन पशुपति जाय पाहण्या श्रीहरिमंदिर तें ॥ मार्गी येता दिसलें मजला स्थानहि मोहक तें ॥ बहु कुसुमान्वित वृक्ष पाहिले गरुडाजवळिते ॥ मादारादिक भेदुन गगनाप्रति गेले तरु ते ॥ शमिदूर्वांची दाटी झाली तुळशी वन जेथें ॥ केळि नारळी बकुळ पोफळी जाइजुई तेथें ॥ चुनेगच्चिचे हौद बांधिले दोंबाजू सम ते ॥ नाहिं न्यूनता फुल-पत्रीची पुजनाप्री तेथें ॥ विस्मय वाटे मम चित्ता-सी कोठुन जळ येतें ॥ दोंमोटांनीं वृषभ पाजिती या तरुना नित तें॥ चाल ॥ उत्तर पश्चिम पूर्वेचे द्वारीं ॥ येति दर्शना प्रभुच्या नर-नारी ॥ घालुनि उजवें जाती माघारी ॥ परि मम-मानस तृप्त न झालें पाहुन क्षणभर कीं ॥ द्वाररक्षका न मानुनीं मी चढलें आणिं वर कीं ॥ रघुनाथा० ॥ २ ॥ मिताबाइकृत पाहुन मंडप दूमजल्यावरती ॥ चढुन विलोकीं शिखरीं शोभा केली सुंदर ती ॥ कुशलपणाची कमाल झाली मुनिसुरवर मूर्ती ॥ काढुन प्रतिमा तऱ्हेतऱ्हेच्या हेम-कळस वरती ॥ छत्रें कोंदणें झालरि दिधल्या हंड्या झुंबें ती ॥ कार्तिक मासीं दिपवाळीदिनिं दीपोत्सव करिती ॥ शक अठराशें दो साली मग प्रासादपूर्ती ॥ सिताबाइनी करुनि आपुली वाढविली कीर्ति ॥ ॥ चाल ॥ शक सत्राशें सत्रा साली हरी अर्चिती राक्षसनामीं संव-त्सरीं ॥ ज्येष्ठमास सित दशमी तिथि ती बरी ॥ पाहुनि सुवेळ विप्र प्रमोदें म्हणती मंत्र मुखीं ॥ श्रीकांतांना स्थापुनि केले याचक बहुत सुखी ॥ ३ ॥ रघु०॥ शंख चक्र आणि गदा पद्म ते चतुर्भुजाधारी॥ करिट कुंडलें कौस्तुभ मणि वनमाला नाभिवरी ॥ शोभे कंबरिं रत्न-मेखला झगझगते भारी॥पायिं पैंजणें लाल पितांबर नेसुन जरतारी ॥ करिं कडिं तोडे रत्नमुद्रिका झळकति बहुतपरी ॥ गोफ पदक नवरत्न चम-

कती कंठामाझारी ॥ कधिं मंदिल कधिं फेटा बांधिति प्रभुला पूजारी॥ शिरपेंच कलगी तुरा खोंविती मौक्तिक मणि भारी ॥ चाल ॥ अंगीं सुवासिक चंदन उटि केशरी ॥ दिसती नयना लाल ओष्ठ किति- तरी ॥ भासे जणुं मज भक्षिति ताम्बुल हरी ॥ शेज मंदिरीं किन- ख्वापाच्या गाद्या पर्यंकीं ॥ हंतरिलासे मऊ बिछाना कुसुमहार तबकीं ॥ रघुना० ॥ ४॥ सिंधुसुता श्रीविष्णूसन्निध तिष्ठत वामांगीं॥ नेमे गुलाबी पैठणी भरजरी कंचुकी अंगीं ॥ चंद्रकोरसम लावुन कुंकू भरि शेंदुर भांगीं ॥ केशरकस्तुरिचंदनमिश्रित उटि चर्चुन अंगीं ॥ नथबुगड्या नी भोकरबाळ्या घालुन धवलांगीं ॥ गोठ-पाट- ल्या छंद बांगड्या कर अलक्तरंगी ॥ चाल ॥ पायिं पैंजणें दश- अंगुलिं अंगठ्या ॥ मंगळसूत्र साज मणी पेट्या ॥ तन्मणि लफ्फा चंद्रहार कंठा ॥ कंबरपट्टा अवळुन दंडीं बाजुबंद बांकी ॥ शालु बु- ट्याचा पांघरुनी श्री तनु आपली झांकी ॥ रघुना० ॥५॥ लक्ष्मि- रमणा हे जगदीशा, भालचंद्रनृपति ॥ रघुनाथाच्या हे वंशांतिल कुरुंद्वाडभुपती ॥ नांदत असतां महिषीसह ते अंतरिं अति झुरती ॥ रात्रंदिन ते संततिवांचुन चित्तीं तळमळती ॥ ताटिं रुप्याच्या नैवेद्या तुज कोण देइ पुढती ॥ वाढदिवस तव कोण करिल ही वाटे त्या खंती ॥ चाल ॥ दे भक्त्यासह सद्गुणि सुत त्यांना ॥ गरुडासन्निध उभि राहुन कृष्णा ॥ प्रार्थितसे तुज येऊं दे करुणा ॥ शक अठ- राशें चौतिस सालीं केलें कवन सुखीं ॥ कृपा—कटाक्षें दीनदयाघन क्षमा करी चुकी ॥ रघुना० ॥ ६ ॥

## गाणें ९३ वें

[ चाल—दत्त त्रया तव० ]

चल, मना अम्हि जाऊं या ॥ श्रीगुरुदर्शन घेऊं या ॥ अनन्य

मवें शरण रिघूनी तन-मन-धन हें अर्पू या ॥ ध्रु० ॥ काम क्रोध घालवु या मदमत्सरा हालवू या ॥ वरिवरि उठती विकल्प हृदयीं त्याना त्वरितचि मालवू या ॥ चल० ॥ १ ॥ दशइंद्रियें झिजवू या ॥ जन्ममरण अम्हि बुजवू या ॥ भवपाशांतुनि मुक्त होउनि अलिप्त जगीं अम्हि राहू या ॥ चल० ॥ २ ॥ वासनेला ग्वणू या ॥ कामनेला हणू या ॥ दुर्बुद्धीला त्वरित दवडुनी भक्ती संगें घेउं या ॥ ॥ चल० ॥ ३ ॥ मायेला अम्हि चिरू या ॥ दयेला अम्हि वरू या ॥ मन्मथासि त्या त्वरित दवडुनी भावा संगें घेऊ या ॥ चल० ॥ ॥ ४ ॥ शांती मैत्रिण करू या ॥ स्वानंदानें भरू या ॥ मीतू-पणाचा गर्व हरूनी स्वेच्छें जगीं अम्हि विचरू या ॥ चल० ॥ ५ ॥ अज्ञानाला जाळू या ॥ ज्ञानासंगें खेळू या ॥ काया वाचा मना अर्पुनी सद्गुरुचरणीं लोळूं या ॥ चल० ॥ ६ ॥ जागृतीत अम्हि राहू या ॥ स्वप्न सुषुप्ती पाहू या ॥ तुरिया लंघुनि म्हणते कृष्णा मोक्षपदासी जाऊ या ॥ चाल० ॥ ७ ॥

## गाणें ९४ वें

[ चाल—मूर्तिमंत भीति उभी० ]

धाव धाव गुरूवरा भवनदींत बुडतसें ॥ तरावयास कर्णधार रामनाम दे रसें ॥ ध्रु० ॥ और्ट हती नाविका हि समुळ वहात जात कीं ॥ उठति लहरि स्थूल क्रूर वासनादि घातकी ॥ धाव० ॥ ॥ १ ॥ धीवर मना ओढि तिला क्रोध नक्र मत्त तो ॥ वैराग्या तीव्र भरी नधि विवेक पाशि तो ॥ धाव० ॥ २ ॥ बघुनि भाव सदय राव घेइं धाव करिं त्वरा ॥ मोहपूरित या नदींत फिरत मृत्यु भोंवरा ॥ धाव० ॥ ३ ॥ आधिवात सुटुनि नयाजवळि नेत नावेरे ॥ अल्प अवधि भरत आयु म्हणुनि गुरू धांव रे ॥ धाव० ॥ ४ ॥

सदय हृदय करुनि शिरीं कृपा कराहि ठेविं तू ॥ पंच कोशिं वास करीं रूप मला दाविं तू ॥ धाव० ॥ ५ ॥ जाइल घडी होइल हनीं सत्वनाश गुरुवरा ॥ कृष्णि भ्रमरि प्रार्थि सदा दाविं मार्ग लेंकरा ॥ धाव० ॥ ६ ॥

## गाणें ९५ वें.

[ चाल—बघुनि त्या भयंकर भूता० ]

दिनराति न ये मज निद्रा ये धाव गुरुमाउली ॥ मी चकोर असुनि तू चंद्र मुखीं ज्ञानसुधा मज घालीं ॥ध्रु०॥ व्यापिलें मला ज्वरकामें वासना सरदि बहु आली ॥ खळबळे पित्त क्रोधाचें दुर्बुद्धि घेरि मज आली ॥ गाजिलें बहात्तर रोगीं वैद्यराज औषधी घाली ॥ तिडकतें अंग बहु माझें नसे जवळि कोणि ह्या काळीं ॥ दिन० ॥ १ ॥ स्वर ऐकुनि मद्विनतीचा, धावली सद्गुरू मूर्ति ॥ लाउनी अंतरीं चक्षू परीक्षा नाडिची घेती ॥ रामनाम रस वल्लीचा काढूनि मुखीं मम ओती ॥ हारिलें बहात्तर रोगा पळ काढि वासना भ्राती ॥ सत्बोध शिरुनि अंतरीं वैराग्य पातलें शांती ॥ स्वानंद सागरीं मजला सद्गुरू स्नान घालीती ॥ निर्मळ जाहली काया, शिरिं करा प्रेमें ठेवीती ॥ सांगुनी पथ्य पापाचें अदृश्य होति तत्काळीं ॥ दिन० ॥ २ ॥ काय सांगु सौख्य पुष्टीचें रामनामिं मत्त बहु झालें ॥ मन पवन करुनिया वारू एकांत वनाप्रति गेलें ॥ सांडुनि अवस्था चारी त्रिगुणासी जावुनि पातलें ॥ मारुनी लाथ मुक्तीतें स्वरुपी मुदित मि झालें ॥ नाहिं ज्ञान परी सद्गुरु हे मज रक्षिति संकट काळीं ॥ ही कृष्णा नामौषधी घे गुरुराजपदीं नत झाली ॥ दिन० ॥ ३ ॥

## गाणें ९६ वें.

[ चाल—हरि कृष्ण नाम० ]

आरती श्री गुरुराया ॥ उजळू तन मन अर्पुनि पाया ॥आ०॥ ॥ ध्रु० ॥ औट हातचें तबक देहाचें ॥ पंचप्राण हे दीपक साचे ॥ शाती घृत घालुनिया आत्मज्योति म्या डिळि लावुनिया ॥ आ० ॥ ॥ १ ॥ काम क्रोध ते जाळुनि आधीं ॥ पाद्योदकाची केली सिद्धि॥ प्रक्षालिन तव पाया ॥ मायाबर हे देतें पुसाया ॥ आ० ॥ २ ॥ सद्भक्तीचीं पक्कान्नें केलीं निजबोध ताटीं नैवेद्या आणिलीं ॥ भक्षावीं बघुनि दीना ह्या ॥ प्रार्थी कृष्णा उद्धारुनि न्या ॥ आ० ॥ ३ ॥

## गाणें ९७ वें.

[ चाल—घेउनि ये पखा० ]

मी मी मी, मी मी मी, म्हणी, दे सोडुनि मनुजा ॥ ध्रु० ॥ हा माझा वाडा, हा माझा घोडा, मम पदिंचा हा जोडा, वमनासम समजा ॥ मी० ॥ १ ॥ ही माझी कांता, मम धन सुत दुहिता, मी शाहणा, अति ज्ञाता मानु नको मनुजा ॥ मी० ॥ २ ॥ हे माझे व्याही, हे मम जावई, काळ उणा ज्या समयीं, कोणी न ये काजा ॥ मी० ॥ ३ ॥ हें सर्वचि माझें, म्हणता यमराजे, नेतिल रे झणिं उमजे, त्यागीं तव गमजा ॥ मी० ॥ ४ ॥ श्रीगुरुची वाणी, धरि कृष्णा स्वमनीं, परब्रह्मावाचुनि ॥ भाव नसे दूजा ॥मी०॥ ५ ॥

## गाणें ९८ वें.

[ चाल—कसा मज टाकुनि गेला० ]

होइं मना तू स्थीर जरा तरि चपल मना धरिं धीर ॥ ध्रु० ॥ कर्ता हर्ता तो जग-त्राता, एक असे रघुवीर ॥ जरा तरि० ॥ १ ॥

धावुं नको तूं पवना ऐसें हृदयीं राहें स्थीर ॥ जरा० ॥ २ ॥
ऐकुनि श्रवणीं पाहुनि नयनीं, रसने राखीं स्थीर ॥ जरा० ॥ ३ ॥
ह्या देहावरि संकट पडता, रक्षिल तो यदुवीर ॥ जरा० ॥ ४ ॥
भगवद्भजनीं काल क्रमोनी, झिजवी तव हें शरीर ॥ जरा० ॥५॥
ह्मणे कृष्णा हो रत गुरुपायीं, का करितेस उशीर ॥ जरा० ॥६॥

---

## गाणें ९९ वें.

[ चाल—दिनरजनी० ]

शांत दांत चपल मना होइ झडकरी ॥ त्यजुनि सकल मोहपाश भजें श्री हरी ॥ ध्रु० ॥ मृत्तिकेच्या मंदिरासि काय करिसि तूं ॥ अंतसमयिं कोण मना सांग स्मरसि तूं ॥ अग्निसंगें भस्म होइ जासि यमपुरीं ॥ शांत० ॥ १ ॥ मन्मथासि आवरुनी होइ तूं भले ॥ धन, कन्या पुत्र जरी आजि साधले ॥ परिणामीं कोणि न ये जाण अंतरीं ॥ शांत० ॥ २ ॥ राखिं धैर्य तशी जवळ सतत शांति ते ॥ सुहृद् करीं बोध—भाव विवेकसहित ते ॥ काम क्रोध श्रेष्ठ रिपू आधिं संहरी ॥ शांत० ॥ ३ ॥ वासनेसि कल्पनेसि घालिं बाहेरी ॥ उपरतीसि ठाव देइं आत्ममंदिरीं ॥ मद-मत्सर थोर अरी त्यागिं लवकरी ॥ शांत० ॥ ४ ॥ कृष्णेनें गुरुवचनीं भाव ठेविला ॥ पंचप्राणसहितचि त्या देह वाहिला ॥ दाखविं मज मार्ग सुलभ आस करिं पुरी ॥ शांत० ॥ ५ ॥

---

## गाणें १०० वें.

[ चाल—किन्नरेरीची० ]

औट हाती दश द्वाराच्या आत्मा या गृहिं मालक साचा ॥ ॥ ध्रु० ॥ स्थूल सूक्ष्म कारण महाकारण हेचि चौ चौक पहा ॥

बहात्तर कोणी रेजा अर्ध्या चंद्राच्या चादर्णि राहा ॥ साहि शास्त्रें धुंडुनी पहा ॥ गुरु-शिष्यांचा संवाद महा ॥ औ० ॥ १ ॥ परा पश्यन्ती मध्यम वैखरी ॥ गायन करिती चौघी नारी ॥ परात्पर पलंगावरी ॥ पुरुष-प्रकृति निद्रा करी ॥ मनोराया तिथे कारभारी ॥ चंचल चपलत्वें सेवा करी ॥ औ० ॥ २ ॥ हें घर पडता जाईल घडी ॥ षड्रिपु तस्कर अडकरी काढी ॥ नेत्रकमळीं विषयातें झाडीं ॥ हें करकमळ स्व-स्वरुपा जोडीं ॥ औ० ॥ ३ ॥ ऐसा योग साधेल ज्याला ॥ आत्मा सद्गुरु मन शिष्य झाला ॥ गुरुरायें उपदेश केला ॥ तो ह्मणे कृष्णा चित्तीं घ्या धरिला ॥ औ० ॥ ४ ॥

---

## गाणें १०१ वें.

[ चाल—धाव विभो० ]

का घालविसी घडि घडि वाया ॥ मनुजा क्षणभंगुर ही काया ॥ ॥ ध्रु० ॥ काम-रती एकांतीं रमता ॥ रज रेत जमता बनली ही काया ॥ का० ॥ १ ॥ मुळिंचा निराकृती येसि आकारा ॥ त्यावरि पडलीसे मायेची छाया ॥ का० ॥ २ ॥ पंच प्राण दश छिद्र त्रिगुण ॥ देतो दयाघन तुज लवलाह्या ॥ का० ॥ ३ ॥ फेरे फिरसी लक्ष चौऱ्याशीं ॥ अवचित लाभली तुज नरकाया ॥ का० ॥ ॥ ४ ॥ उत्तम वर्णी पंगू नसोनी ॥ करिं सार्थक त्यजुनी विषया ॥ ॥ का० ॥ ५ ॥ धर सत्संगा ॥ कर भवभंगा ॥ भज श्रीरंगा स्मर गुरुपाया ॥ का० ॥ ६ ॥ हरिभजनी रत त्यागुनी धन-सुत ॥ कृष्णा विनवित अतिमूढ जाया ॥ का० ॥ ७ ॥

---

## गाणें १०२ वें.

[ चाल— मधुर किती कुसुम गंध सुटला० ]

रे मनुजा आवर सदा रसना ॥ आवर सदा रसना ॥ ध्रु० ॥ ह्या जिव्हेनें ताळ सोडिला ॥ सन्मार्गाचा मार्ग मोडिला ॥ धन-सुत गृहिचा स्नेह तोडिला ॥ पडुनि विषय व्यसना ॥ रे मनु० ॥ १ ॥ मिष्टान्नानें मोडुनि देइ ॥ मिळेल मध्यान्हीं तें खाई ॥ अखंड नामामृत हें घेईं ॥ कर इंद्रियदमना ॥ रे मनु० ॥ २ ॥ चंदनापरि त्वा नित्य झिजावें ॥ देव-गुरूसी सतत भजावें ॥ अखंड साधू संत पुजावे ॥ भाव धरीं भजना ॥ रे मनु० ॥ ३ ॥ इंद्रियगणिं ही श्रेष्ठ वरिली ॥ जिंकी त्याची वासना हरिली ॥ चिद्घनरूपीं वृत्ती मुरली॥ त्यासी नमी कृष्णा ॥ रे मनु० ॥ ४ ॥

## गाणें १०३ वें

[ चाल—हे मन चंचल मोठें० ]

गो-ब्राह्मण कैवारी ॥ मूढा मानवा भज श्रीहरी ॥ ध्रु० ॥ तेहतीस कोटी सुर सोडवीले ॥ रिस-वानर हातीं दैत्य वधीले ॥ मारुनी रावण भारी ॥ स्थापीला बिभिषण लंकानगरीं ॥ गो० ॥ १ ॥ सांगे वसुदेव-सुत पंडू-कुमरा ॥ नित्य मी पुजितों विप्र देव्हारा ॥ इतरा कोण विचारी ॥ शुद्ध सत्वांश हे अवतारी ॥ गो० ॥ २ ॥ कृष्णरूप जाणें ही विप्रप्रतिमा ॥ निंदिसि जरि तूं वर्णोत्तमा ॥ यातनया ॥ याम्य-नगरीं ॥ हो सावध सावध अंतरीं ॥ गो० ॥ ३॥ शंखचक्रेशा शुद्ध सत्वांशा ॥ दीनदयाघना रक्षिसी दासा ॥ चरणीं सिंधुकुमारी ॥ विलसे श्रीवत्सलांछन उरीं ॥ गो० ॥ ४ ॥ तुजवाचुनि मज कोणी असेना ॥ भूमंडळावरी अन्य दिसेना ॥ हा भवताप निवारीं ॥ नमिते कृष्णा श्रमली संसारीं ॥ गो० ॥ ५ ॥

## गाणें १०४ वें.

उलट न्याय तुझा ॥ अरे हरी ॥ होसि कशाला त्रिभुवनराजा ॥ ध्रु० ॥ असत्यातें बक्षिस देशी ॥ सत्यवान तो जातो फाशी ॥ न्याय नसे हा अनीति समजा ॥उ०॥ १ ॥ कुलिन सतीतें निंदित जग हें ॥ स्त्री, भ्रष्ट करिती देवा बघ हें ॥ वदिति नर त्या तारिणी बाजा ॥ उ० ॥ २ ॥ पाच त्यागुनी कांचही घेती ॥ रक्षुनि शिंपा दवडिति मोती ॥ अमृत त्यागुनि प्राशिति गाजा ॥ उ० ॥ ३ ॥ धर्म नीति ही सकळ उडाली ॥ वसुधरा ही पापें बुडाली ॥ तव कलि मंत्री करितो काजा ॥ उ०॥ ४ ॥ मौन धरुनेयां जग चाल-विसी ॥ उद्दामगें बरड निरडिशी ॥ कष्टति ह्मणुनी सात्विक तनु ज्या ॥उ०॥ कृष्णा प्रार्थी ऐकें सदया ॥ त्यजि निष्ठुरता कोमल-हृदया ॥ ये ऐकुनी धांवा माझा ॥ उ० ॥ ६ ॥

---

## गाणें १०५ वें.

[ चाल—बडबड्याची० ]

देह भाजन होइल हें चूर, नेइल यम शूर, मनूजा तुजसी ॥ होतील स्वजन हे दूर भूमिवरि पडसी ॥ जाशील मातिला मिळुन, गेति गृहिं पळुन, वायुसम भ्रमसी ॥ चौऱ्यांशी लक्ष योनिचे फेरे कां फिरसी ॥ तू हो सावध अंतरीं, भाव मनिं धरीं, शरण जा गुरुसी ॥ उतरील भवाचा पार परतिरा जासी ॥ होईल पातका नाश, चुके यमपाश, भवार्णव तरसी ॥ करिं नरा नवविधा भक्ति धरीं दृढ हरिसी ॥ ध्रु० ॥ १ ॥ नाहिं बधिर अंध पांगळा नससि तू मुका ॥ का होसि पराधिन नरा वाइलिस एका ॥ नउ मास, पाळिलें त्यास, दिली तूं भाका ॥ फसउनि तयासी कुठें जातोसी मूर्खा ॥ नाहिं वाट, पडे मग गाठ, यमाच्या लोका ॥ सुविचार

करुनि अंतरी चुकविं हा धोका ॥ अगणीत कष्ट सोशिता लाभ नर-तनुसी ॥ करि० ॥ ॥ हरिलिला करीं तूं श्रवण, मानसी मनन, निजध्यासामी ॥ हरितनू नयनिं बघ, करी भजन रसनेमी ॥ जा चरणिं देउळीं, करें पूजिं तूं प्रभुसी ॥ निर्माल्य मेउनी घ्राण लाविं कार्यासी ॥ सत्संग राहें गुरुपदीं दास्यसख्यासी ॥ नव भक्ति करूनी साधिं सदा मोक्षासी ॥ ही कृष्णा वंदुनि नित्य रामचरणासी ॥ प्रार्थिते पाप हर, चुकविं जन्ममरणासी ॥ होईल० ॥ २ ॥

---

## गाणें १०६ वें.

[ चाल---मुद्रिके अगोचर० ]

बुद्धि माता शिकवी मना. सोडि वासना. दिवारजनी ॥ निःसंग विचर भुवनीं ॥ ध्रु० ॥ हा प्रपंच लटिका खरा, मानुनी बरा. होसि बावरा, घडोघडी ॥ तव पदीं मोहबेडी ॥ धन—सुता, मानुनी वृथा. धरी क्रूरता, शरण जाई ॥ गुरुपदीं देह वाही ॥ धरिं छंद. त्यजुनि भवबंध. नको संबंध, मना तुजसी ॥ व्यर्थ रे व्यर्थ फससी ॥ चाल ॥ धाउं नको मना तूं असा, अरे असा ॥ षड्रिपू पारधी ससा, तूं ससा ॥ गळां फास बांधितिल कसा, अरे कसा ॥ ती गाठ, असे बळकट, नसे तुज वाट, कुठे भुवनीं ॥ पाहिं मना ज्ञान नयनीं ॥ बुद्धि० ॥ १ ॥ नवविधा भक्तिचे मिसें, लागो तुज पिसें कळो आधीं ॥ करिं त्याग सकल व्याधी ॥ नसे अंत वर्णिती संत पंच कोशांत. बघें मूळिंचा ॥ निर्गुण ब्रह्मकुळिंचा ॥ तें स्थळ, असे निर्मळ, नको करूं वेळ निघें आता ॥ नाहिं तिथें क्लेश चिंता ॥ ॥ चाल ॥ ही माया जारिण खरी, अरे खरी ॥ नाचवी तुला बहु परी, बहु परी ॥ आलिंगुनि ह्मणसि सुंदरी. सुंदरी ॥ तन मन, करुनि अर्पण, नसे तुज भान, मना काहीं, मना० ॥ कां बुडसि

नरकडोही ॥ बुद्धि० ॥ २ ॥ रामदास होइ तू खास, करी वनि वास, स्मरुनि त्यासी ॥ लाभेल सौख्यराशी ॥ हें चित्र, लावुनी नेत्र, बघें एकत्र, गाइ साचें ॥ जाईल कर्म मुळचें ॥ नाही तुटत, नाहि हें फुटत, नाहीं हें कुटत, बहू कुटिता ॥ नाहिं पापि ह्यासि स्पर्शता ॥ चाल ॥ भाव वारू, घेउनि जा, अरे जा ॥ रम्य स्थल तेथिंचें पहा, अरे पहा, ॥ नाशवंत तनू त्या वहा, त्या वहा ॥ करुनिया प्रपची आशा, अशी तुझि दशा मना झाली ॥ साग सगें कोण आलीं ॥ बुद्धि० ॥ ३ ॥ नाहीं कळत नाहीं हें वळत, नाहीं हें मिळत, अभक्तासी ॥ घे त्वरें ज्ञानराशी ॥ नाही पडत, नाही हा दडत, नाहीं हा अडत, कदा काळीं ॥ हा वृक्ष सदा सुफळी ॥ नाहिं भिजत, नाही हें थिजत, नाहि हें विझत विझू जाता ॥ अतर्क्य ह्याचि वार्ता ॥ चाल ॥ नाही दिसत ज्ञानिं हें वसे ॥ अरे वसे ॥ आदि अंत मध्य त्या नसे ॥ त्या नसे ॥ तें मना पाहिं तूं कसें, तू कसें ॥ कृष्णातीरिं स्थिर हो मना, बघें निर्गुणा, विषय त्यजुनी ॥ हेंचि शिकवि बालका जननी ॥ बुद्धि० ॥ ४ ॥

---

## गाणें १०७ वें.

[ चाल—कटिकरसम० ]

मधुर मधुर हरिनाम सुधारस प्राशी मानवा, झडकरिं प्राशी मा० ॥ ध्रु० ॥ झर झर झर झर आयुष्य सरतें, कर कर कर कर सार्थक पुरतें ॥ धर धर धर धर हरिपद दृढ तें, त्यागुन तू भवा ॥ झ० त्या० ॥ मधु० ॥ १ ॥ औषध दुसरें घेउं नको तूं ॥ त्यागुनिया षड्विकार किंतू ॥ विकल्प येता गुण न परंतू ॥ नरकीं रौरवा, जाशिल न० ॥ ॥ मधु० ॥ २ ॥ नारदमुखिंचा प्राशुनि वाल्हा ॥ निशिदिनिं जपता पावन झाला ॥ अवताराच्या वदे चरिताला ॥ विलंब राघवा जरि असे,

वि० ॥ मधु० ॥ ३ ॥ प्राशियलें विष निलकंठानें ॥ शीत होय परि हरिनामानें ॥ ह्मणते कृष्णा अति प्रेमानें ॥ तारी बहु जिवा रस हा, तारी बहु० ॥ ४ ॥

## गाणें १०८ वें.

[चाल—कसा मला टाकुनि गेला राम०]

अजुनि तारिं नरा करीं सुविचार ॥ त्यागुनि दुष्ट विचार ॥ ॥ अजु० ॥ ध्रु० ॥ आयुष्य सारें पळ पळ गेलें ॥ गर्दभापरि व्यर्थ जाहलें ॥ मृत्यु जरि करी ठार ॥ अजु० ॥ १ ॥ कामा आडीं क्रोधा तोडीं ॥ अहंकार तो उलथुनि पाडीं ॥ देउ नको त्या थारा ॥ ॥अजु०॥२॥ अज्ञानाचें भस्म करावें ॥ ज्ञानस्वरूपीं मन विचरावें ॥ सोडुनि माया नार ॥ अजु० ॥३॥ लक्षचौऱ्याशीं फिरुनी आला ॥ दुर्लभ नरतनु ब्राह्मण झाला ॥ पशुसम करि व्यवहार ॥ अजु० ॥ ॥ ४ ॥ भव हा अपुला व्यर्थ न जावा ॥ म्हणुनी कृष्णा प्रार्थी देवा नमुनी वारंवार ॥ अजु० ॥ ५ ॥

## गाणें १०९ वें.

[ चाल—एक धड ना भाराभर० ]

जोंवरि आहे घरांत बहु धन तोंवरि तव गमजा ॥ गेली अवघी रुसून लक्ष्मी मग कैसें मनुजा ॥ ध्रु० ॥ बहु मोलाची काया असुनी करिसि मातेरें ॥ नाहिं तुझ्या भय मानसि का देवा घरचें रे ॥ पशुसम केवळ काळ घालवुनि विषयीं लोळसि रे ॥ मत्तकुंजरासम जन्मोनि कितिकचि मेले रे ॥जों० ॥१॥ शांत दांत अनंत अनात्मा अंतरिं न वससी ॥ क्षणभंगुर या संसाराची हाव बहू करिसी ॥ धन सुत दारा मोह पसारा बघुनी बहु रमसी ॥ माझें माझें लोकें

ओझें शिरिं वाहुन भ्रमसी ॥ जो० ॥ २ ॥ सरता खणखण, करिते फुणफुण, प्राणप्रिया रुसली ॥ थकता छणछण मदिरादेवी बाजारीं बसली ॥ मान कापते जरा कामिनी देहपुरी शिरली ॥ दूत पातले आयुष्याची दोरी तव तुटली ॥ जों० ॥ ३ ॥ आणुनि अश्रू नेत्रीं क्षणभर स्मशानिं तनु नेती ॥ लावुनि अग्नी भस्म करूनी सदनाप्रति येती ॥ उरली अवघी खणखण तीचे हक्कदार बनती ॥ कर्मांचा अधिकारि जीव हा विचार करिं चित्तीं ॥ जो० ॥ ४ ॥ सावध होई तूं लवलाहीं रामपदीं राहीं ॥ काया वाचा मन भावानें शरण तया जाईं ॥ नवविध भक्ती करुनि सतत तूं रामरूप गाईं ॥ त्रिकाल ध्यानीं आणुन ईशा निर्गुणास पाहीं ॥ जों० ॥ ५ ॥ किति कन वाळू संत दयाळू मम संनिध आले ॥ नामामृत हें बहु प्रेमानें प्राशनार्थ दिधलें ॥ नाम सुधा ती म्हणते कृष्णा गटागटा प्यालें ॥ मोडुनि विषया दिनरजनीं मी हरिनामीं रमलें ॥ जो० ॥ ६ ॥

---

## गाणें ११० वें.

[ चाल—बिकट वाट वहिवाट० ]

अरे नरा तूं परात्परा त्या पाहा त्यागुन या विषया ॥ फुकट फुकट हा काळ चालला जाइल नरतनु ही वाया ॥ ध्रु० ॥ उंच हवेली चढवुनि मजले बांधुनि बससी शाश्वतिचे ॥ नटउनि दारां उजळुनि दीपां भोगिसि भोग अशाश्वतिचे ॥ बागबगीच्या टेबल खुर्च्या तांबुल गजरे मोगरीचे ॥ मऊ बिछान्यावरी लोळसिल मंचकिं पडदे कुसरीचे ॥ बहू सुवासिक उट्या लाउनी रुमाल हातीं ते जरिचे ॥ अशा आनंदीं मग तें कैचें नाम येई मुखिं श्रीहरिचें ॥ ॥ चाल ॥ झाले कन्या पुत्र तुला ॥ आली संपत बहुत तुला ॥

अगणित हुजरे लउनि तुला ॥ करिती मुजरे बघुनि तुला ॥ ताटिं रुप्याच्या भोजन करिसी घेउनि त्याह्या जावया ॥ अरे० ॥ १ ॥ संसारीं तूं करिसी खटपट हाव धरुनिया बहु विषयीं ॥ हांजी हांजी करुनी तुजला रावबहादरि ती येई ॥ पूर्वपुण्य तव सुफल जाहलें पुढें गती तरि कशि होई ॥ यासाठी तू सुविचारानें हरिभजनीं नित रत राहीं ॥ गर्वभार हा श्रीमतीचा वाहु नको तूं निज डोईं ॥ तुजहुनि मोठे मोठे जगीं या अगणित असती मिति नाहीं ॥ चाल ॥ सरे तरुणता भराभरा ॥ येई अगीं तुझ्या जरा ॥ काळ चालला झराझरा ॥ संनिध मृत्यू येत नरा ॥ पळ घडि थांबें म्हणावयासी धैर्य नसे तुज त्या समया ॥ अरे० ॥ २ ॥ आयू सरता आप्त सोयरे जिवलग स्त्री-सुत होति दुरी ॥ जाण समयिं त्या तुज सांगातें कोणि न येई खरोखरी ॥ मृत्यु पाश तुज घालुनियां नेता कुडी पडे ती भूमिवरी ॥ नेति स्मशानीं नर चौघे तनु घालुनियां तृण शेजेवरी ॥ भरण रचूनी अग्नि लाउनी येति भराभर सर्व घरीं ॥ करिता तुज गुज गोष्ट सांगतें आत्महिताचें काय करीं ॥ चाल ॥ अरे अरे हरि भगवता ॥ पुरे पुरे ही भवचिंता ॥ हरे हरे कथुं किति आता ॥ सरो सरो हा मम गाथा ॥ हरिपदकमळीं रुजि घालिते कृष्णा भ्रमरी होउनिया ॥ अरे० ॥ ३ ॥

---

## गाणें १११ वें.

[ चाल—अरसिक किती हा शेला० ]

अरसिक किति ही काया ॥ का दवडिसी मूढा घडि घडि वाया ॥ ध्रु० ॥ नरतनु दैवें मिळाली ॥ लक्ष चौऱ्यांशी योनी फिरुनी आली ॥ बहु पुण्यें तुज सांपडली ॥ ऐसी अपूर्व नरतनु त्वा वाळविली ॥ जन्मूनि जननी श्रमविली ॥ नाही प्रभुपदीं तव मती

कैसी रमली ॥ अर० ॥ १ ॥ बाळदशा ही सारी ॥ गेली हा हा म्हणता खेळ-कुसरीं ॥ तारुण्यमद हा भारी ॥ जासी मोहुनी स्त्री-पुत्र धन संसारीं ॥ अर० ॥ २ ॥ वेश्येपरि माया नारी ॥ थै थै नाचते तव देहपुरीं ॥ षड्रिपु हे तुझे वैरी ॥ घेरा देऊनि वेढिती तव काया सारी ॥ विवेका धरीं अंतरीं ॥ वैराग्यशस्त्रें त्या तूं निवारी ॥ ॥ अर० ॥ ३ ॥ सुबुद्धि सुंदर जाया ॥ तिच्या संगें राहें तूं मनोराया ॥ शरण जा सद्गुरुपाया ॥ हस्त ठेवूनी मस्तकीं उद्धरील काया ॥ विमान ये बैसाया ॥ आशा ठेवुनी कृष्णा रत गुरुपाया ॥ ॥ अर० ॥ ४ ॥

## गाणें ११२ वें.

[ चाल—ये धावत रामा० ]

आरति अश्वत्था दयाळा वारीं भवव्यथा ॥ ध्रु० ॥ तूंची ब्रह्मा तूंची विष्णु तूं गिरिजामाता ॥ ह्मणुनि उजळितें पुजा करूनी आ-रति मी आतां ॥ दयाळा० ॥ १ ॥ मत्तनु जाणें वृक्षि श्रेष्ठ ह्मा रे भगिनीकांता ॥ दशमाध्यायीं श्रीभगवंतें रणिं कथिलें पार्था ॥ ॥ द० ॥ २ ॥ शुक बक मैना कोकिळ यांतें तूं आश्रयदाता ॥ मधुर स्वरानें गायन करिती नाठवे मनिं चिंता ॥ द० ॥ ३ ॥ फिरति भोंवतीं ञिजविति पाया हरिसी तच्चिंता ॥ कोणा कन्या कोणा पुत्रा देशि कुणा वनिता ॥ द० ॥ ४ ॥ सत्कीर्तीनें ऐकुनि आलें पाळि वृंदा आतां ॥ संकट काळीं दुजा न वाली नमि कृष्णा ताता ॥ द० ॥ ५ ॥

# पंचायतनाच्या प्रदक्षिणांचे अभंग.

## गणपतीच्या प्रदक्षिणा.

पहिली प्रदक्षिणा, केली गजानना ॥ देईं माझ्या मना, सुबुद्धीतें ॥ १ ॥ दुसरी प्रदक्षिणा केली मोरेश्वरा ॥ चौऱ्याशींचा फेरा, शीघ्र सोडीं ॥ २ ॥ तिसरी प्रदक्षिणा, केली विनायका ॥ दावीं मोक्षलोका, शीघ्र मातें ॥ ३ ॥ चवथी प्रदक्षिणा, केली वक्रतुंडा ॥ क्रोध गजशुंडा, तोडीं माझी ॥ ४ ॥ पाचवी केली आतां, अंबीकेच्या पुत्रा ॥ दावी ज्ञानमित्रा, झणीं मातें ॥ ५ ॥ साहावी प्रदक्षिणा, ऋद्धि-सिद्धि-नाथा ॥ संसारात आतां, घालूं नको ॥ ६ ॥ सातवी केली आता, मोरयाच्या भोंती ॥ संसाराचें किती, दुःख सागूं ॥ ॥ ७ ॥ आठवी प्रदक्षिणा, माझी शूर्पकर्णा ॥ नको जन्ममरणा यातायाती ॥ ८ ॥ नववी केली भावें, मदनारी बाळा ॥ दावी विश्वपाळा, पाय तुझे ॥ ९ ॥ दहावी प्रदक्षिणा, चौदा विद्यावंता ॥ हरी माझी चिंता, संसाराची ॥ १० ॥ अकरा प्रदक्षिणा, झाल्या गणपती ॥ देईं मज मती, बारावीतें ॥ ११ ॥ बारा करुनीयां. पुढील तेरावी ॥ करितें हरावी, कुबुद्धि जी ॥ १२ ॥ तेरा झाल्या पुऱ्या, करितें नमस्कार ॥ होवो चिंता दूर, एकदंता ॥ १३ ॥ चौदा संपवूनी, घालीं लोटांगण ॥ देईं वरदान, प्रेमानंदें ॥ १४ ॥ पंधरावी चालली, माझी चिंतामणी ॥ सोसेना काचणी, प्रपंचाची ॥ १५ सोळा प्रदक्षिणा, करुनी नमन ॥ प्रार्थीं मी चरण, दावीं मज ॥ १६ सत्रा प्रदक्षिणा, केल्या मोरयाला ॥ दोष हरायाला, संचिताचे ॥ १७ अठरावी घालूनी, मागतसें तुला ॥ साह्य करो मला, राणी तुझी ॥ १८ विघ्नहरा तुज, एकुणीस केल्या ॥ वासना त्या गेल्या पळोनिया ॥ १९ ॥

वीस करूनीया, पाहिलें म्या मुख ॥ झालें बहु सुख, कृष्णा म्हणे ॥ २० ॥

---

## देवीच्या प्रदक्षिणा.

एकविसावी केली, करवीर क्षेत्रीं ॥ पाहिली म्या नेत्रीं अंबाबाई ॥ २१ ॥ बाविसावी केली, करवीरवासिनी ॥ नमितें विष्णुपत्नी, वारंवार ॥ २२ ॥ तेविसावी केली, तुज आदिमाये ॥ दावी मज पाये, आधीं तूझे ॥ २३ ॥ चोवीसावी करुनी, आलें लोटांगणीं ॥ पुरेना ती धणी, पाहायासी ॥ २४ ॥ पंचविसावी केली, देवीच्या देव्हारा ॥ सासरा माहेरा, सुखी ठेवीं ॥ २५ ॥ सव्विसावी करुनी, उभी अंबेपुढें ॥ मागतसें चूडे, अक्षयींचे ॥ २६ ॥ सत्ताविसावी केली, वाहतें फूलपत्ता ॥ मम मंगळसूत्रा, आयुष्य दे ॥ २७ ॥ अठ्ठाविसावी केली, चरणीं ठेवीं माथा ॥ मम कुळ गोता, दुःख नसो ॥ २८ ॥ केली प्रदक्षिणा, एकोणतिसावी तुज ॥ आदिमाये मज, उद्धरीं तूं ॥ २९ ॥ तिसावी करूनी उजाळितें पोत ॥ सर्व गणगोत, तूंचि माझें ॥ ३० ॥ एक्तिसावी करुनी, करितें प्रार्थना ॥ पुरवीं तूं वासना, सर्व माझ्या ॥ ३१ ॥ बत्तिसावी करुनी, बत्तिशीचा दिवा ॥ सौभाग्याचा ठेवा, वाढो माझा ॥३२॥ तेहतिसावी करुनी, आहे हें मागणें ॥ कुंकवाचें लेणें, नित्य देईं ॥३३॥ चवतिसावी करुनी, जोडितें मी कर ॥ सेवा निरंतर घडो तुझी ॥३४ पस्तिसावी केली, विष्णुवल्लभेसी ॥ काय तूं बघसी, अंत माझा ३५ छत्तिसावी केली, किती तुज गाऊं ॥ अंत नको पाहूं, अंबाबाई ॥३६॥ सदतिसावी केली, धरितें तुझ्या पाया ॥ पावन ही काया करीं माझी ॥ ३७ ॥ अडतिसावी करुनी, मत्कुलस्वामिनी ॥ पाहे सिंहासनीं, रूप तुझें ॥ ३८ ॥ एकोणचाळिसावी, करुनी तव ध्यान ॥ असे

उभी दीन, द्वारी तुझ्या ॥ ३९ ॥ चाळिसावी होता, गुण गाईं तुझे ॥ कृष्णा प्रार्थी माझें दुःख हरी ॥ ४० ॥

---

## श्री विष्णूच्या प्रदक्षिणा.

एकेचाळिसावी, केली केशवासी ॥ पुन्हां भवपाशीं, घालूं नको ॥ ४१ ॥ बेचाळिसावी झाली, पुरी नारायणा ॥ भानुज-यातना, चुकवीं तूं ॥ ४२ ॥ त्रेचाळिसावी केली, भावें म्यां माधवा ॥ आरंभिला धावा, संकटीं म्यां ॥ ४३ ॥ चवेचाळिसावी, केली म्यां गोविंदा ॥ तुजविण धंदा, दुजा नाहीं ॥ ४४ ॥ पंचेचाळिसावी, प्रदक्षिणा केली ॥ विष्णुप्रत होवो, पावन ती ॥ ४५ ॥ शेचाळिसावी केली मधुसूदनास ॥ कुळें बेचाळीस, उद्धरी तो ॥ ४६ ॥ सत्तेचाळिसावी केली त्रिविक्रमा ॥ देईं मज प्रेमा नामीं तुझ्या ॥ ४७ ॥ अठ्ठेचाळिसावी केली वामनासी ॥ झाली या मनासी उपरती ॥ ४८ ॥ एकोणपन्नासावी केली म्यां श्रीधरा ॥ उद्धार तो करा शीघ्र माझा ॥ ४९ ॥ पन्नासावी केली तुज हृषीकेशा ॥ वासना अशेषा दूर करीं ॥ ५० ॥ एकावन्नावी केली पद्मनाभास ती ॥ दुष्कृताची ग्रंथी नाश पावो ॥ ५१ ॥ बावन्नावी केली तुज दामोदरा ॥ चित्तीं वास करा नित्य माझ्या ॥ ५२ ॥ त्रेपन्नावी होतां माझी प्रदक्षिणा ॥ तुज संकर्षणा विनवीतें ॥ ५३ ॥ चौपन्नावी करितें तुज वासुदेवा ॥ संसारीं विसावा देईं मज ॥ ५४ ॥ प्रद्युम्नास केली पंचावन्नावी ती ॥ कष्ट दूर होती भवाब्धीचे ॥ ५५ ॥ छपन्नावी करुनी नमीं अनिरुद्ध ॥ भाव माझा शुद्ध राहो सदा ॥ ५६ ॥ सत्तावन्नावी ती पुरुषोत्तमा केली ॥ सर्व विसरली काया माझी ॥ ५७ ॥ केली अठ्ठावन्नावी मीं हीं अधोक्षजा ॥ वेकुंठींच्या राजा धाव वेगें ॥ ५८ ॥ एकूणसाठावी तुज नारसिंहा ॥ थेवो माझी जिव्हा

नाम तुझें ॥ ५९ ॥ साठावी ती फेरी, केली म्यां अच्युता ॥ कृष्णा ह्मणे आता, मुक्ति देई ॥ ६० ॥

---

## शंकराच्या प्रदक्षिणा.

एकसष्टावी करुनी, वंदिले शंकर ॥ काय ही किंकर, गाई तुज ॥ ६१ ॥ बासष्टावी केली, जोडितें मी हात ॥ तूंचि माझा तात हेंचि सत्य ॥ ६२ ॥ त्रेसष्टावी करुनी जोडिले म्यां पाणी ॥ असे तुझी राणी माय माझी ॥६३॥ चवसष्टावी करुनी पाहिलें त्वद्गात्र ॥ असे तुझा पुत्र बंधू माझा ॥ ६४ ॥ पांसष्टावी करुनी वंदीं सदाशीव ॥ आनंदला जीव पाहुनियां ॥ ६५ ॥ सासष्टावी केली तुज उमाकांत ॥ करीं माझा शांत अहंकार ॥ ६६ ॥ केली प्रदक्षिणा सदुसष्टावी शिवा ॥ सापडला ठेवा पूर्व पुण्यें ॥ ६७ ॥ अडसष्टावी केली प्रदक्षिणा आता ॥ तुज विश्वनाथा विनवीतें ॥ ६८ ॥ एकुणसत्तरावी झाली माझी फेरी ॥ राहो मदनारी चित्तीं माझ्या ॥ ६९ प्रदक्षिणा भावें केली सत्तरावी ॥ दिगंबरा द्यावी भेट आता ॥७०॥ एकाहत्तरावी भावें केली रुद्रा ॥ वासना अभद्रा हरीं माझ्या ॥७१॥ बाहत्तरावी प्रेमें प्रदक्षिणा केली ॥ होवो चंद्रमौळीं समर्पण ॥७२॥ त्र्याहत्तरावी फेरी माझी नीळकंठा ॥ वाटे देव मोठा हाचि मज ॥ ७३ ॥ चवऱ्याहत्तरावी, केली गंगाधरा ॥ दैवत माहेरा, हेंचि असे ॥७४॥ पंचाहत्तरावी, जगसंहारकास ॥ मज अर्भकास ज्ञान देईं ॥७५॥ माझी प्रदक्षिणा शाहत्तरावी झाली ॥ अवचित आली स्फूर्ती मज ॥ ॥ ७६ ॥ सत्याहत्तरावी केली उमापती ॥ होत माझ्या चित्तीं बहू हर्ष ॥ ७७ ॥ अठ्याहत्तरावी धरुनी मी मौना ॥ करिं प्रदक्षिणा पंचवदना ॥ ७८ ॥ पशुपतीस केली एकूणऐंशीवी ॥

मूर्ति ती वसावी, हृदयीं माझ्या ॥ ७९ ॥ ऐशींवी करुनी, राम-प्राणमित्रा ॥ जपी शिवस्तोत्रा, कृष्णा सदा ॥ ८० ॥

---

## सूर्याच्या प्रदक्षिणा.

एक्यायशींवी केली, भावें मीं मित्रासी ॥ ज्यानें या नेत्रांसी, ज्ञान दिलें ॥ ८१ ॥ ब्याशींवी करुनी, वंदुनी रविसी ॥ वर्णिता गुणांसी वर्णवेना ॥ ८२ ॥ त्र्यांशीवी करुनी, नमस्कार सूर्या ॥ अवस्थाही तुर्या, ओलांडण्या ॥ ८३ ॥ चौऱ्याशींवी करुनी, प्रदक्षिणा भानू ॥ टेंकूनियां जानू, अर्पी अर्घ्य ॥ ८४ ॥ पंचायशींवी करुनी, नमितें खगासी ॥ अज्ञानी दीनासी, उद्धरावें ॥ ८५ ॥ शायशींवी करुनी, नमितें मी पूष्णा ॥ हरो माझी तृष्णा, देहातील ॥८६॥ सत्याशींवी केली, हिरण्यगर्भासी ॥ दिली ज्ञानराशी, प्रेमें त्यानें ॥ ८७ ॥ अठ्याशींवी करुनी, वंदितें मरिचास ॥ करो तिमिरास, दूर माझ्या ॥ ८८ ॥ एकोणनव्वदावी, केली आदित्यास ॥ संसृतीचा पाश, तोडीं माझा ॥ ८९ ॥ नव्वदावी करुनी, वंदितें सविता ॥ देतो जो जगता, प्रकाशाशी ॥ ९० ॥ एक्याण्णवावी करुनी, वंदीला मीं अर्क ॥ वर्णितां कवितर्क, खुंटले ज्या ॥ ॥ ९१ ॥ ब्याण्णवावी करुनी, वंदीला भास्कर ॥ नवग्रहीं थोर, हाचि देव ॥ ९२ ॥ त्र्याण्णवावी फेरी, करुनी प्रभाकरा ॥ जोडितें मी करा घडोघडीं ॥ ९३ ॥ चवऱ्याण्णवावी केली, सहस्रकिरणा ॥ सर्वांच्या तो प्राणां, रक्षितसे ॥ ९४ ॥ पंचाण्णवावी केली सूर्यनारायणा ॥ येऊं दे करुणा, किंकरीची ॥ ९५ ॥ शहाण्णवावी करुनी, वंदीं दिनपती ॥ तुझे पायीं मती, नित्य जडो ॥ ९६ ॥ सत्याण्णवावी फेरी, केली तमोहरा ॥ ज्ञानोदय करा, देहीं माझ्या ॥ ९७ ॥ अठ्याण्णवावी करुनी, दोकर जोडिले ॥

अर्घ्यदान दिलें, प्रात काळीं ॥ ९८ ॥ नव्याण्णवावी करुनी, धरीं पाय तुझे ॥ हरीं दोष माझे कृपावंता ॥ ९९ ॥ पंचायतन देवा शत भावें केल्या ॥ कृष्णेनें या फेऱ्या, भ्रमनाशा ॥ १०० ॥ करी प्रदक्षिणा, शतावरि एक ॥ सद्गुरूची लेक, कृष्णाबाई ॥ १०१ ॥ करी प्रदक्षिणा, शतावरि दोन ॥ सद्गुरूचें सान, कृष्णाबाई॥१०२ करी प्रदक्षिणा, शतावरी तीन ॥ गुरुपदीं लीन, कृष्णाबाई ॥ १०३ ॥ करुनी प्रदक्षिणा, शतावरी चार ॥ पदीं मागें थार, कृष्णाबाई ॥ १०४ ॥ प्रदक्षिणा करी. शतावरी पांच ॥ मोक्ष मागे साच, कृष्णाबाई ॥ १०५ केल्या प्रदक्षिणा, शतावरी सहा ॥ दीन ह्मणे पाहा, कृष्णाबाई ॥ १०६ ॥ शतावरी सात. केल्या गुरुवरा ॥ मागें मोक्ष बरा, कृष्णाबाई ॥ १०७ ॥ करुनी प्रदक्षिणा शतअष्टोत्तर ॥ भजे निरंतर कृष्णाबाई ॥ १०८ ॥ माळेमध्यें एक, राहे मेरुमणी ॥ करी नो घेवूनी नमें रामा ॥ १०९ ॥

REFBK-0001692

समाप्त.

१६९२